प्रतिपदा, १२ एप्रिल '७५




# मधुकर वणवण फिरत करी गुन्जारवाला..


आर्थिक आलोक -
कुलगुरू-दाभोळकर पुणे विद्यापीठ समस्या.
उद्योग - डॉ.शेजवलकर, राजेंद्र पटवर्धन.
वित्त-प्रा. अविनाश जोशी.
बँकिंग-डॉ. वसन्तराव पटवर्धन.
महिला उद्योग- श्री राणे, मोहन निकम
सहकार-डॉ. गो. स. कामत
प्रश्न मंजूषा-डॉ. शरद वकील
श्रमिक एल. चंद्रकान्त
क्रिडा मंनोरंजन- दिनेश बर्वे, राजस परचुरे
प्राध्यापक वेतनश्रेणी-प्रा तारळेकर, प्रा गुणे प्राव
श्री वा. काळे

# अर्थ

संपादक : प्रा. कमलाकर परचुरे

वर्ष : पहिले  अंक : पहिला

किमत ३ रुपये  वार्षिक वर्गणी ३० रुपये


# आलोक

## जग

जगाची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. गेल्या २०–२५ वर्षात ती २७० कोटींवरून सुमारे ४०० कोटींपर्यंत वाढली आहे. त्याचबरोबर वस्तू, अन्नधान्य इत्यादींच्या उत्पादनातही, निदान प्रगत देशांत तरी समाधानकारक वाढ होत आहे.

(जागतिक उत्पादनाचे आकडे)

| | तांदूळ | कापूस | साखर |
|---|---|---|---|
| १९५० | १८० दशलक्ष टन | ५ दशलक्ष टन | ३० दशलक्ष टन |
| १९७४ | ३०० ,, | १३ ,, | ८० ,, |
| | क्रूड पेट्रोल | पोलाद | ॲल्युमिनिअम |
| | ५०० दशलक्ष टन | २२० दशलक्ष टन | १·८ दशलक्ष टन |
| | २५०० ,, | ६२० ,, | १० ,, |

गव्हाची किमत १९६५ मध्ये सरासरी २ डॉलरला १ बुशेल होती. १९७३ मध्ये ती ६ डॉलर–बुशेल म्हणजे तिपटीने वाढली. १९७४–७५ मध्ये गव्हाची जागतिक किमत थोडीशी उतरली आहे. गव्हाच्या जागतिक उत्पादनात रशियाचा वाटा सर्वात जास्त आहे. त्यानंतर अनुक्रमे आशिया, युरोप इत्यादी. गव्हाच्या निर्यातीत मात्र अमेरिका आघाडीवर आहे.

१९७४–७५ हे वर्ष 'चलनवाढीचे विक्रमी वर्ष' मानावे लागेल. जगातल्या सर्व देशांना त्याची झळ बसली आहे. इंग्लंड, अमेरिकेपासून तो रशिया–भारत–चीनपर्यंत सर्वांनाच महागाईला तोंड द्यावे लागत आहे. ब्रिटनमध्ये वीजटंचाई सुरू झाली व कुंठित–चलनवाढ (Stagflation) तीव्रतेने जाणवू लागली. उद्योगधंद्यांना उत्पादन करण्यास अडचणी आहेत. मात्र मजुरी व इतर उत्पादनखर्च भडकत चालले आहेत. थोडया फार फरकाने हीच स्थिती सर्वत्र आहे. एका बाजूने औद्योगिक उत्पादनात घसरण तर दुसऱ्या बाजूस लोकांजवळ वाढता चलनपुरवठा, त्यामुळे भावफुगवण, असा दुहेरी चिमटा चालू वर्षात, जगातल्या प्रत्येक नागरिकाला भासतो आहे. महागाईला अर्थशास्त्रज्ञ व क्रमिक पुस्तके नवनवी नावे देत आहेत. 'नफेखोरी + चलनवाढ', 'मंदी + चलनवाढ', 'उत्पन्न + चलनवाढ', 'मजुरी + चलनवाढ', 'किमत + चलनवाढ', 'भांडवली + चलनवाढ', 'विकासोद्भवी + चलनवाढ' इत्यादी. सामान्य नागरिकाला चलनवाढीची कारणे शोधण्यापेक्षा महागाई कोणत्याही मार्गाने एकदाची कमी व्हावी, एवढेच हवे असते. युरोप, आशिया, अमेरिका इ. देशांतील चलनांची क्रयशक्ती व बाह्य मूल्य घसरले आहे. पण ह्या तुलनेने साम्यवादी देशांत अत्यावश्यक उपभोग्य वस्तूंच्या किमती रोकण्यात बरेच यश लाभले आहे व त्यांचे बाह्यमूल्य बरेच स्थिर आहे.

महागाईची झळ आशियातील देशांना सर्वात जास्त प्रमाणावर भासत आहे. त्याची कारणे म्हणजे–(१) चलनपुरवठ्यात प्रचंड वाढ, (२) सरकारी खर्चात वाढ, (३) करवाढ, (४) जीवनावश्यक वस्तूंची खरी व कृत्रिम टंचाई, (५) लोकसंख्या, (६) विषम उत्पन्न–वाटणी, (७) तुटीचा अर्थभरणा, (८) परराष्ट्रीय व्यापाराचा असमतोल व त्यामुळे करावे लागणारे अवमूल्यन इत्यादी. गेल्या चार वर्षांतील चलनपुरवठ्याचे खालील आकडे पाहा– [दशलक्ष नाणी]

| देश | १९७० | १९७४ |
|---|---|---|
| अफगाणिस्तान | ५१९४ | ९७४४ |
| भारत | ६७·८ | ११२·६ |
| इंडोनेशिया | २४१·१ | ७००·० |
| इराण | १२८·३ | २४९·१ |
| जपान | २१३५८·० | ४०९९४·० |
| पाकिस्तान | १४·०२ | २२·४० |
| इराक | २१८ | ३३७ |
| कुवेत | ९९ | २०२·१ |
| श्रीलंका | १९४९ | २७८७·० |

(युनोचे मासिक पत्रक–जागतिक आकडेवारीचे) आशियाई काही देशांतील सार्वत्रिक किमतमानाचे निर्देशांक (पहा. आधारभूत वर्ष) १९७० = १००. (आधार–युनोचे पत्रक.)

| देश | १९६५ | १९७४ |
|---|---|---|
| भारत | ७५·९ | १७४·१ |
| पाकिस्तान | ८५·९ | १७५·७ |
| इराण | ९३·३ | १३४·८ |
| इराक | ८७·२ | १२१·८ |
| देश | १९६५ | १९७४ |
| इस्रायल | ८४·७ | १७२·५ |
| फिलिपिन्स | ७२·६ | २५५·९ |
| थायलंड | ८३·६ | १६०·८ |
| जपान | ८९·८ | १५६·४ |

## पेट्रोल–समस्या

गेल्या वर्षी चलनवाढीचा डोंब उसळण्याचे एक कारण अरब देशांनी निर्माण केलेली तेलाची नाकेबंदी. औद्योगिक उत्पादन, रसायन–उद्योग, वाहतूक–दळणवळण, प्लॅस्टिक्स, धुलाई, गॅस, खत–निर्मिती इ. विविध कारणांकरता पेट्रोलचा उपयोग होतो. पेट्रोलच्या किमती ५–६ पटीने भडकल्यामुळे साहजिकच उत्पादनाचा खर्च तितकाच वाढला व त्यामुळे इतर वस्तूंच्या किमती भडकल्या. अरब देशांचे परराष्ट्रीय उत्पन्न सुधारल्यामुळे जगातल्या इतर देशांचे चलनमूल्य घसरले. १७ ऑक्टोबर १९७३ ही तारीख जगाच्या इतिहासात नमूद करण्यासारखी आहे. ही मध्यपूर्वेकडील 'ऑक्टोबर क्रांती' होय! इस्रायलला मदत करणाऱ्या देशांविरुद्ध ही कारवाई होती. विशेषतः अमेरिका व जपान ह्या देशांना इंधन–टंचाई आधीपासूनच भासत होती. ह्या पवित्र्यामुळे तर त्यांची अर्थव्यवस्थाच डळमळली. युरोपातील ब्रिटन व इटली ह्या दोन देशांनाही ह्या भाववाढीचा जबरदस्त फटका बसला. पण आर्थिक परिणामांबरोबरच राजकीय गोष्टी घडल्या. मध्यपूर्वेत अरबांचा दबाव वाढला. इस्रायलला नमते घ्यावे लागले. अमेरिकेला अरबांशी जमवून घेणे अगत्याचे वाटू लागले. १९७२ मध्ये २ अमेरिकन डॉलरला १ बॅरल हा पेट्रोलचा भाव नोव्हेंबर १९७४ मध्ये १२ डॉलर झाला. पेट्रोलच्या उत्पादनात सर्वांत पहिला देश अजूनही अमेरिकाच आहे. अमेरिकेचे ५०० दशलक्ष टन, रशियाचे सुमारे ४०० दशलक्ष, सौदी अरेबियाचे ३५० दशलक्ष, इराणचे ३०० दशलक्ष आणि व्हेनिझुएलाचे २०० दशलक्ष टन असे अनुक्रमे उत्पादन आहे. अमेरिकेत गाड्या जास्त म्हणून उत्पादन जास्त असूनही त्यांना पेट्रोल–आयातीवर अवलंबून राहावे लागते. मिल्टन फ्रीडमन ह्यांच्या मते तेलकिंमती उतरतील अशी शक्यता आहे. ग्रॅलब्रेथ ह्यांच्या मते अमेरिका तिच्या स्वतःच्या तेलसाठ्यावर अवलंबून राहू शकेल. अरबांनी फारच ताणून धरल्यास त्यांच्या तेलखाणींच्या जागी फक्त वाळू राहील. पेट्रोलचा काटकसरीने उपयोग तसेच पेट्रोलला पर्यायी असे उपाय योजावे लागणे अटळ होईल.

## आग्नेय आशिया

आग्नेय आशियातील तणाव नुकतेच फार वाढले आहेत. कंबोडिआ व व्हिएटनाम ह्या देशांत प्रचंड मनुष्यहानी व वित्तहानी होत आहे. अफगाणिस्तान व पाकिस्तान ह्यांच्यातले संबंध स्वतंत्र बलुचिस्तान मागणीमुळे बिघडत चालले आहेत. पोर्तुगालमध्ये कम्युनिस्टांच्या मदतीने राजकीय नेतृत्वात बदल झाले आहेत. मंगोलियाच्या सरहद्दीवर चीनच्या लष्करी हालचालींमुळे मंगोलियाचे नेते युमजागिन ह्यांनी चिंता व्यक्त केली आहे. कंबोडिआची राजधानी नॉम पेन्ह वाचविण्याकरता अमेरिकन वायुसेनेला शर्थ करावी लागत आहे. जानेवारी १९७५ पासून आतापावेतो सुमारे १० हजार सैनिक म्हणजे एकूण सैन्यदलाचा पाचवा हिस्सा ह्या युद्धात कामी आला आहे. दक्षिण व्हिएटनाममधील परिस्थिती जास्त गंभीर आहे. सुमारे ५ लक्ष जखमी सैनिक व निर्वासित ह्यांचे लोंढे मिळेल त्या वाहनाने पळत आहेत. अध्यक्ष थिऊ ह्यांनी अर्ध्याहून अधिक भूभाग गमावला आहे. अमेरिकेला आग्नेय आशियांत बसलेला हा एक तडाखा आहे. कंबोडिआतील पीछेहाटीचा परिणाम दक्षिण व्हिएटनाममध्येही झाल्यास नवल नाही. एवढेच काय तर फिलिपिन्स, मलेशिया, थायलंड इत्यादी देशातही त्याचे पडसाद उमटू लागले आहेत. फिलिपिन्सचे अध्यक्ष मार्कोस ह्यांनी तसेच मलेशिया व थायलंड ह्यांनी चीनशी राजनैतिक संबंध जोडण्याचा विचार सुरू केला आहे. थायलंडचे पंतप्रधान कुक्रित प्रमोज ह्यांचा थायलंडमधील अमेरिकन सैन्य हळूहळू हलवावे असा विचार चालू आहे. 'अमेरिकन सैन्याच्या मदतीपेक्षा चीनशी मित्रत्वाचे संबंध असणे सुरक्षितपणाचे वाटू लागले आहे.' प्रेसिडेंट फोर्ड ह्यांचे मात्र मत असे आहे की, अमेरिकेने आपली लष्करी मदत ह्या दोन्ही देशांना अजूनही भरपूर प्रमाणात उपलब्ध करावी. कंबोडियात गेल्या ५ वर्षांत ७ लक्ष सैनिक मारले गेले आहेत.

तर अर्ध्याहून अधिक निर्वासित झाले. २२२ दशलक्ष डॉलरची मदत कंबोडियाला मंजूर करावी ह्याकरता प्रे. फोर्ड ह्यांनी सिनेटकडे मागणी केली आहे. कंबोडिआचे प्रेसिडेंट लॉन नोल ह्यांनी सेनाप्रमुख ले. जनरल फर्नेंडिझ् ह्यांचा राजीनामा घेतला आहे. कम्युनिस्ट खेमर संघटनेचे, नोल ह्यांच्या राजीनाम्याने आता समाधान होईल असे वाटत नाही. ही संघटना, क्रांतीनंतर सर्व राजकीय सूत्रे हाती घेईल.एकंदरीत मध्य पूर्वेपेक्षा आग्नेय आशियाकडे जागतिक अशांततेचा लंबक सरकला आहे.

## ब्रिटन

ब्रिटनमध्ये गेल्या तीन–चार वर्षांत २० टक्क्यांनी भाववाढ झाल्यामुळे, राजवाड्यातील ४९३ कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ करावी लागली. तसेच इतरही खर्च वाढले म्हणून राणीने २ दशलक्ष पौंडांवरून ३ दशलक्ष पौंड खर्चाला मंजुरी मिळावी म्हणून पार्लमेंटकडे मागणी केली होती. टोरी पक्षाच्या पाठिंब्याने पार्लमेंटमध्ये ही मागणी मंजूर झाली. १० लाख पौंडांपैकी सुमारे ३ लाख पौंडांचा खर्च स्वतःच्या खाजगी उत्पन्नातूनच भागवेन अशी राणीने इच्छा दर्शविल्याबरोबर राणीच्या खाजगी उत्पन्नाकडे लोकांचे लक्ष वेधले गेले. ब्रिटनमधील सर्वांत श्रीमंत व्यक्ती ब्रिटनची राणीच आहे. जमीनजुमला व शेअर्सच्या योगे तिचे वार्षिक उत्पन्न दरवर्षी ७½ लक्ष पौंड आहे.

## अमेरिका

प्रे. फोर्ड ह्यांनी 'भाववाढीला अमेरिकेचा शत्रू नं. १' असे म्हटले आहे. उद्योगधंद्यांवर मंदीच्या सावल्या पडल्या आहेत. बेकारांच्या संख्येत ह्यापूर्वी कधीही नाही इतकी वाढ झाली आहे. सप्टेंबर ७४ ते वर्षअखेर ५½ लक्ष लोक नोकरीला मुकले आहेत. हॅरिसच्या अंदाजाप्रमाणे ५२ टक्के कुटुंबांना मंदी व बेकारीची झळ लागली आहे. दुसऱ्या हेन्री फोर्ड ह्यांनी असे म्हटले की–' माझी कंपनी व देश ह्या दोहोंच्या बाबतीत मला इतकी अनिश्चितता व इतकी दुरवस्था ह्यापूर्वी कधीच भासली नाही.' आयकरामध्ये सूट मिळावी असे प्रयत्न उद्योगपतींच्याकडून होत आहेत. बेकारीचे प्रमाण ८.२ टक्के. एकूण श्रमिक संख्या ९ कोट. फोर्ड, क्रिस्लर, जनरल मोटर्स ह्या सर्व मोटर कंपन्यांना मंदीचा फार मोठा तडाखा बसला आहे.

## सोव्हिएट रशिया

सोल्झेनित्सिनच्या हद्दपारीनंतर रशियन भाषेत त्याचे साहित्य प्रसिद्ध होणार नाही असे वाटत होते. परंतु त्याचे एक नवीन रशियन भाषेतील पुस्तक नुकतेच पॅरिस येथे प्रकाशित झाले. पुस्तकाचे नाव "The Calf butted the Oak"–"वासरू आणि ओक वृक्ष." गेल्या १३ वर्षांच्या त्याच्या एकाकी झगड्याचे त्यात प्रतिबिंब आहे. त्याच्या सुखाच्या कल्पना अशा: 'एका शांत खेड्यात छोटेसे घर असावे. दहा ते २० वर्षांचे आयुष्य मिळावे, चांगले ग्रंथालय आणि साहित्यिकाचे सख्य, सामान्य जीवन उपभोगण्यास मिळावे.'

रशियाकडून २ लक्ष ६७ हजार टन खते ह्या वर्षी भारत खरेदी करणार आहे. रशिया आपल्याकडून ७ कोट रुपयांचे अभ्रक विकत घेईल. आपण रशियाला सर्वांत जास्त अभ्रक निर्यात करतो, म्हणजे एकूण निर्यातीपैकी सुमारे ३० टक्के. नुकतीच सोव्हिएट संरक्षणमंत्री ग्रेचको ह्यांनी भारतास भेट दिली.

## चीन

चीनचे उपपंतप्रधान चेन हिज्लिन ह्यांनी कलकत्ता येथील व्याख्यानात 'भारत व चीन ह्यांचे पारंपारिक मैत्रीचे संबंध सुधारतील' अशी आशा व्यक्त केली. भारतीय संरक्षण तज्ज्ञांनी नुकताच चीनच्या लष्करी सामर्थ्याचा आढावा घेतला. चीनवर अधिकारी भाष्य करणारे श्रीधर ह्यांचे मत असे आहे की, रशिया, अमेरिका व जपान ह्यांच्याशी आपला व्यापार वाढविण्यात भारतापेक्षा चीन वरचढ होण्याची शक्यता आहे.

चीनच्या राष्ट्रसभेची चौथी बैठक दहा वर्षांनी नुकतीच झाली. त्या सभेने चौ-एन्-लाय ह्याची निवड पंतप्रधान म्हणून केली. तसेच २९ मंत्री व महामंडळ ह्यांची नेमणूक केली. ह्यापूर्वी ४८ मंत्रालये व ८ मंडळे होती, ये चिन्–यिंग ह्यांची नेमणूक संरक्षणमंत्री म्हणून करण्यात आली. ते ७६ वर्षांचे आहेत. १२ उपपंतप्रधान आहेत. राज्यघटनेतही बदल करण्यात आला. राज्यप्रमुख हे पद रद्द करण्यात आले. सर्व सत्ता अध्यक्ष माओ ह्यांच्याकडे आहे. ते सैन्याचे देखील सर्वाधिकारी आहेत. लवचिक समाजवादी धोरण, पक्षाचे श्रेष्ठत्व, स्वावलंबन, कष्ट, सततोद्योग आणि काटकसर ही त्यातील काही प्रमुख तत्त्वे आहेत. उपपंतप्रधान चांग–चुन–चिओ ह्यांनी आर्थिक माहिती अशी दिली की लोकसंख्या ८० कोट झाली असून म्हणजे तिच्यात १९४९ पासून ६० टक्के वाढ झाली तथापी अन्नधान्यउत्पादन त्याच काळात १४० टक्क्यांनी वाढले आहे. कपाशीचे उत्पादन तर ४७० टक्क्यांनी वाढले आहे. १९६४ च्या तुलनेने शेतकी उत्पादनात ५० टक्के वाढ झाली असून औद्योगिक उत्पादनात त्याच काळात १९० टक्के

वाढ झाली आहे. रशियाच्या राजकीय हालचालींबद्दल चीनने नापसंती व्यक्त केली आहे. तसेच 'तैवान–मुक्ती' कार्यक्रम घेतला जाईल असेही स्पष्टपणे म्हटले आहे.

## पाकिस्तान

पाकिस्तान व भारत ह्यांच्यात समुद्रमार्गे जहाजवाहतूक पूर्ववत सुरळीत चालू करावी ह्याकरता पाकिस्तानचे एक शिष्टमंडळ नुकतेच भारतात येऊन गेले. इराणला लागून असलेल्या हद्दीवर अमेरिकेला सागरी व हवाई फौजेचा तळ देण्याची तयारी पाकचे महामंत्री भुट्टो ह्यांनी दर्शविली आहे.

## नेपाळ

२३ फेब्रुवारीला जगातील एकमेव हिंदू राजा बिरेंद्रसिंग ह्याचा राज्याभिषेक समारंभ झाला. भारताच्या मदतीने नेपाळमध्ये १ कोट रु. खर्चून काठमांडू ते गोदावरी खाणीपर्यंतचा रस्ता नुकताच तयार झाला. फुलचौकी येथे छोटा पोलाद कारखाना व संदेशवहन केंद्र सुरू करण्याची ह्यापुढे योजना आहे. नेपाळमधील गरिबी व निरक्षरता हे प्राधान्येकरून मुख्य प्रश्न सोडवण्यावर राज्याचा भर राहील. (१ कोट प्रजा, त्यातील १३% फक्त साक्षर.)

## ग्रीस

जगातील एक फार श्रीमंत व विक्षिप्त माणूस जॅकलिन केनेडीचा पती ॲरिस्टॉटल ओनॅसिस नुकताच मरण पावला. त्याच्या मालकीची अनेक जहाजे, विमाने, घरे, जमीन, जवाहिर व कलाकुसरीच्या वस्तु ह्यांची किंमत अब्जावधी डॉलर्स असेल— त्याचा अंदाज येत नाही. त्याची बरीचशी इस्टेट त्याच्या २४ वर्षाच्या मुलीस मिळेल. सध्या ती वडिलांच्या 'ऑलिंपिक हवाई कंपनी'ची व्यवस्था पाहते.

## भारत : केंद्रीय सरकारचे बजेट

१९७५–७६ चा अर्थसंकल्प २८ फेब्रुवारी रोजी श्री. सुब्रह्मण्यम ह्यांनी सादर केला. ह्यातील ४६४ कोटी रुपयांची तूट भरून काढण्याकरता २३९ कोट रुपयांचे नवे कर बाढविण्यात आले आहेत. ह्या वर्षात सरकारचा एकूण खर्च १०,७८८ कोटी रुपयांचा असेल तर जमेच्या बाजूस १०,५४३ कोटी रुपये अपेक्षित आहेत. केंद्रीय करांचे एकूण उत्पन्न रु. ५४५८ कोटी असेल. त्यात २९२१ कोट रुपयांचे केंद्रीय उत्पादन करांच्या रकमेचा समावेश आहे. आयात कर रु. १२८४ कोट, कंपनी कर रु. ७८१ कोट आणि आयकर २४७ कोट रुपये असे ढोबळपणे इतर मार्ग आहेत. अंतर्गत कर्ज रु. ३२५ कोट रुपये तर परदेशी कर्ज ६१३ कोट रुपयांचे उभे करावे लागेल. एकून खर्चापैकी विकासाच्या कामावर सुमारे ६००० कोट रुपये, संरक्षणावर २२७४ कोट आणि व्याज–देणी देण्याकरता ११८८ कोट रुपये, असे खर्च होणार आहेत. विकासाच्या कार्यात ३६७४ कोट रुपये रक्कम आर्थिक सेवाकरता खर्च होईल. अप्रत्यक्ष करांवर जास्त भर देण्यात आला आहे. साखर, खांडसारी सुटा चहा, सिमेंट, मोटर स्पीरिट, तंबाखू व तंबाखूचे पदार्थ, बिडी, कापड, रेऑन, टेरेलिन, वातानुकुलित व्यवस्था, फ्रिज व फ्रिजची यंत्रसामग्री, वीज उपकरणे, सौंदर्य–प्रसाधने, तिजोऱ्या, कृत्रिम रंग, चिनी मातीची भांडी, कॉकरी, काचपात्रे, वीजेच्या तारा व केबल, पंखे, ग्रामोफोन, रेकॉर्ड प्लेअर, मोटारींचे सुटे भाग इत्यादी. गरीब व मध्यमवर्गावर ह्या करांचा बोजा फार आहे. श्रीमंतांना आवडेल व गरिबांना भरडून काढणारे हे बजेट आहे. ह्याचे कारण प्रत्यक्ष करात–आयकर इत्यादी वाढ झालेली नाही, मात्र वस्तुकरात फार वाढ झाली आहे. मध्यमवर्गातील कुटुंबांच्या करपात्र रकमात काही अटींवर सूट केली आहे. उदाहरणार्थ एखाद्या घरातील मुलगा–मुलगी इंजिनीअरिंग, मेडिकल किंवा इतर तांत्रिक स्वरूपाच्या पदवीचे शिक्षण घेत असेल तर १००० रु. ची रक्कम सुटते. बचतीला उत्तेजन देण्याकरता प्रॉव्हिडंट फंड, विमा इ. करता करपात्र रकमेपैकी पहिल्या ४०००रु.वर १०० टक्के सूट व त्यानंतरच्या ६००० रुपयांवर ५० टक्के सूट दिली आहे. महागाईच इतकी वाढली आहे की इतक्या मोठ्या रकमा प्रॉ. फंड वा विम्यात बचत करणे केवळ अशक्य आहे. जे सरकारी कर्मचारी आपल्या प्रॉ. फंडातून रकमा उचलत नसतील अशांना वार्षिक बोनस देण्याचे ठरविले आहे. दरमहा ५०० रुपये पगार असणाऱ्यांना त्यांच्या प्रॉ. फंडाच्या ३ टक्के रक्कम बोनस मिळेल तर त्यापेक्षा जास्त पगार असणाऱ्यांना बोनस १ टक्का मिळेल. गुंतवणूक वाढावी ह्या दृष्टीने नव्या उद्योगांना करमाफी तसेच डिव्हिडंड उत्पन्नाबाबतीत धोरण शिथिल करण्यात येणार आहे.

मूळ पंचवार्षिक योजनेच्या संकल्पानुसार चालू वर्षी एकूण तूट रु. १२६ कोटींची असेल असे वाटले होते पण ही तूट ६२५ कोट रुपयांपर्यंत गेली, ह्याची प्रामुख्याने कारणे

म्हणजे– १) ५.५ दशलक्ष टन धान्याची परदेशातून आयात, २) अन्नधान्य उत्पादकांना संरक्षण,३) १२० कोट रुपयांवरून २३० कोट रुपयापर्यंत झालेली महागाईभत्त्यातील वाढ ४) संरक्षण खर्चातील वाढ, ५) दुष्काळी प्रदेशातील रोजगार इत्यादी.

| दृष्टिक्षेपात अंदाजपत्रक १९७५–७६— | | कोटी रुपयांमध्ये |
|---|---|---|
| आवर्ती | १९७४–७५ सुधारित बजेट | १९७५–७६ बजेट |
| जमा | ६४८५ | ६८७५ |
| खर्च | ५८६० | ६४९१ |
| शिल्लक | (+) ६२५ | + ३८४ |
| भांडवली | | |
| जमा | २९९७ | ३४२९ |
| खर्च | ४२४७ | ४२७७ |
| | (–) १२५० | – ८४८ |
| एकूण तूट | ६२५ | – ४६४ |
| नवी करवाढ | | + (२३९) |
| एकूण तूट | | – २२५ कोट रुपये |

## रेल्वे-बजेट १९७५–७६

२० फेब्रुवारी ७५ रोजी श्री. कमलापती त्रिपाठी ह्यांनी रेल्वेचा अर्थसंकल्प सादर केला. अन्नधान्याच्या, लोखंड व मँगॅनिज धातूच्या वाहतुकीवर अल्पसे कर बसवून जमा बाजूला ३९ कोट रुपयांचे उत्पन्न वाढणार आहे. उतारूंच्या प्रवासाचे तिकीट दर तेच राहणार आहेत. इतर वस्तूंच्या वाहतुकीचे दरही तेच ठेवले आहेत. अपेक्षा अशी आहे की खर्च वजा जाता यंदा रेल्वेची शिल्लक २३ कोट रुपये असेल. कामगार-संघटनेचे रेल्वेशी संबंध सुधारत आहेत. चालू वर्षीच्या पहिल्या ८ महिन्यात वाहतूक कमी झाली व त्यामुळे उत्पन्नही कमी झाले. संप आणि कोळशाची टंचाई ह्यामुळे गाड्या रद्द कराव्या लागल्या. आता वाहतूक व्यवस्था स्थिर होत चालले आहे.

| | १९७४–७५ | १९७५–७६ |
|---|---|---|
| एकूण वाहतूक उत्पन्न | १४०१.१५ | १६७०.८६ |
| खर्च | ११९१.५५ | १२९६.२८ |
| घसारा | ११५.०० | ११५.०० |
| पेन्शन फंड | १७.४६ | १९.६७ |
| एकूण | १३३०.२१ | १४४९.९५ |
| निव्वळ उत्पन्न | ६१.१४ | २२०.९१ |
| डिव्हिडंड सर्वसामान्य उत्पन्नाकरता | १८९.३३ | १९७.८८ |
| शिल्लक | –१२८.१९ | +२३.०३ |

## १९७४-७५ मधील देशाची आर्थिक परिस्थिती / अर्थ मंत्र्यांचे निवेदन NCEAR चा अहवाल

श्री. सुब्रह्मण्यम ह्यांनी गेल्या वर्षीच्या परिस्थितीचे सिंहावलोकन संसदेला २४ फेब्रुवारी ७५ रोजी सादर केले. मागील वर्षीची औद्योगिक उत्पादनवाढ २.५ टक्के होती ती ह्यावर्षी ३.५ पर्यंत वाढली. रब्बी पिकांचे उत्पादनही बरेचसे समाधानकारक होते व किंमती थोड्या प्रमाणात वर्षअखेर खाली आल्या. मात्र मजुरी–वस्तूंच्या किंमती वाढण्याची प्रवृत्ती आहे. पहिल्या सहामाहीत भाववाढीने जनता हैराण झाली. १९७५–७६ विषयी अंदाज व्यक्त करता ते म्हणाले की देशाची अर्थव्यवस्था व विकासाचा वेग प्रामुख्याने शेती-उत्पादनावरच अवलंबून आहे. काही उद्योगधंद्यात मंदी दिसते. पण त्याचे ते उत्पादन करतात त्या वस्तूंच्या किंमती अवाजवी नफ्याचे प्रमाण फार असल्यामुळे उपभोक्त्यांकडून त्यांच्या मागणीत घट झाली आहे. म्हणूनच बरीचशी यंत्रशक्ती पूर्ण-पणे उपयोगात आणली जात नाही. निर्यात उद्योगांना विशेष सवलती देण्याचे धोरण योग्य ठरेल. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या झालेली औद्योगिक प्रगती फार असमाधानकारक होती. योजनेचे उद्दिष्ट दरवर्षी ८.१०% होते तर प्रत्यक्षात औद्योगिक उत्पादन सरासरी ३.९ टक्क्याने वाढले. १९७३ चा वाढीचा दर तर ०.७ टक्केच होता. वीज, कोळसा व पोलाद ह्या साधनांचा तुटवडा हे त्याचे एक कारण आहे. सप्टेंबर १९७४ मध्ये किंमत पातळीने उच्चांक गाठला तो वर्षाच्या शेवटी ५ टक्क्याने उतरला. गव्हाची लेव्ही वसूल न झाल्याने हे झाले असावे. लोकसंख्यावाढीचा दर प्रतिवर्षी २.२% आहे. शेतकी उत्पादन मात्र त्या वेगाने वाढत नाही. संकरित बियाण्याची गुणवत्ता त्याचप्रमाणे रोगप्रतिबंधक औषधे ह्यात सुधारणा होणे आवश्यक. १९७३–७४ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात ३% ने वाढ झाली पण दरडोई उत्पन्नात ०.९% च झाली. वास्तविक उद्दिष्ट ५% च्या वर होते भाववाढीमुळे बचत व गुंतवणूक ह्या दोन्हीवर अनिष्ट परिणाम झाले. बँकांच्या पतवाढीवर नियंत्रणे घातल्यामुळे किंमती बऱ्याच रोखल्या गेल्या. ७३–७४ व ७४–७५ दोन्ही वर्षात निर्यातवाढ चांगली झाली. पण त्याचबरोबर इंधन, खते व धान्य महाग झाल्यामुळे आयातीवर जास्त खर्च करावा लागला. ७४–७५ मध्ये व्यापार तूट ४२५ कोट रुपयांची होती. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कर्जही उचलावे लागले. ते येत्या ३ ते ७ वर्षांत फेडावे लागले. ७५–७६ विषयी आशा बाळगून अर्थमंत्री म्हणाले की देशात जलसिंचनाच्या योजना वाढल्या आहेत तसेच सुधारित बियाण्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे म्हणून शेतकी उत्पादन

पृष्ठ ३४ वर पहा.



# पुणे विद्यापीठाची आर्थिक दुरवस्था

## कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोलकर यांची मुलाखत

१९७१–७२ पासून पुणे विद्यापीठाची आर्थिक स्थिती पार बिघडत चालली आहे. त्यासंबंधीचे समग्र विश्लेषण डॉ. मंगुडकर ह्यांच्या ७३–७४ व श्री. द्वा. रा. प्रधान ह्यांच्या ७४–७५ च्या अर्थसंकल्पाच्या भाषणात झाले आहे.

चालू वर्षाचा म्हणजे ७५–७६ चा अर्थसंकल्प नुकताच म्हणजे २६ मार्च १९७५ रोजी श्री. प्रधान ह्यांनी विधिसभेपुढे सादर केला. 'पुणे विद्यापीठास ५२ लाखांची तूट–ताबडतोब इलाज न झाल्यास परिस्थिती अधिकच कठीण,' हे २८ मार्च १९७५ च्या 'सकाळ'मध्ये छापून आल्यावर मी तत्काळ कुलगुरू प्रि. दाभोलकर ह्यांच्याशी संपर्क साधला. प्रि. दाभोलकर हे स्वतः अर्थतज्ज्ञ आहेत. त्यामुळे ह्या समस्येचा अभ्यास करण्यास त्यांच्याशी बातचीत करणे उपयुक्त होईल; तसेच विद्यापीठाचा आर्थिक पेचप्रसंग सोडविण्याचे आव्हान स्वीकारून त्यातून ते कोणता मार्ग काढतात हे जाणून घेण्याची आज सर्वांना जिज्ञासा आहे; या दृष्टीने ही मुलाखत घेतली आहे.

**पुणे विद्यापीठाची आर्थिक स्थिती नेमकी केव्हापासून बिघडली व तिची कारणे कोणती ?**

आवर्ती ( चालू ) खर्च व आवर्ती उत्पन्न ह्यात तफावत पडली म्हणजे तूट येते. अशी तूट प्रथम १९६२–६३ ह्या वर्षी आली. त्यानंतर ६७–६८ हे वर्ष वगळता दरवर्षीच अशी तूट येत गेली. १९६२–६३ मध्ये जेव्हा प्रथम तूट आली तेव्हा विद्यापीठाकडे सुमारे ९१ लक्ष रुपये शिल्लक होते. या शिल्की रकमेचा उपयोग पुढील आवर्ती खर्चातील तूट भरण्याकरिता झाला. ही शिल्की रक्कम कमी कमी होत ७१–७२ मध्ये ६३ हजार रु. वर आली. त्यानंतर ७२–७३ मध्ये ती संपून ७ लक्ष रुपयांची तूट आली. ७३–७४ मध्ये १२ लक्ष तूट, ७४–७५ मध्ये ११ लक्ष–चालू वर्षी म्हणजे ७५–७६ मध्ये ती २७॥ लक्ष रुपये; अशी सुमारे ५२ लक्ष रूपयांची संचित स्वरूपाची ही तूट आहे.

ह्या तुटीची कारणे म्हणजे : (१) ६२–६३ मध्ये शिवाजी विद्यापीठ झाले, त्यामुळे महाविद्यालयांची संख्या ६० वरून ३७ वर गेली. पण दरम्यान उत्पन्न बुडले तरी खर्चात वाढ होत राहिली. विशेषतः कारभार-यंत्रणा व सेवक वर्ग ह्यांच्यात फार वाढ झाली. उदा. ६२–६३ मध्ये हा खर्च ५ लक्ष तर ७२–७३ मध्ये २५ लक्ष इतका झाला. (२) परीक्षा विभागाकडील खर्च वाढत गेला. (३) गेल्या १० वर्षांत कर्मचाऱ्यांचा महागाईभत्ता सुमारे ५–६ वेळा वाढवावा लागला. (४) सरकारी अनुदानात मागील वर्षाच्या एकूण अनुदानावरील वार्षिक वाढ ६ टक्के ही ३ टक्क्यांवर आणली गेली. (५) अध्यापन व संशोधन ह्या विभागांवरचा खर्च ६२ सालचा सुमारे १८ लक्ष होता तो ७२–७३ साली ४७ लाखांवर गेला. त्याच काळात प्राध्यापकांची संख्या १०५ वरून २२८ तर कर्मचाऱ्यांची संख्या तर फारच वाढली आहे. (६) भांडवली कामावरील गेल्या १० वर्षांतला खर्च हेही एक प्रमुख कारण आहे. उदाहरणार्थ, परीक्षा विभाग इमारत, मुद्रणालयाचे

गुदाम, विज्ञान–रसायन–वनस्पतिशास्त्र विभागांची स्टोअर्स, तसेच एम्. बी. ए., वृत्तपत्रविद्या विभाग, संस्कृत अध्ययन केंद्र इ. वरील खर्च.

सारांश, खर्चात वाढ व उत्पन्नात घट असा दुहेरी चिमटा बसल्यामुळे तूट वाढत चालली आहे.

**ही तूट तूर्तास कशी भरून काढली आहे ?**

तूर्तास घसारा निधीतून सुमारे १२ लक्ष रु. तसेच शासनाकडून सुमारे १२ लक्ष तात्पुरते उसने आणून २५ लक्ष रुपयांची व्यवस्था झाली आहे. चालू वर्षी ह्या रकमा वजा जाता सुमारे २५ लक्ष रुपयांची तूट आहेच. पूर्वीचे उसने घेतलेले रु. १२ लाख सरकारने 'अनुदान' म्हणूनच रुपांतरित करावे, तसेच ७४–७५ ची तूट भरून काढण्यासाठी १७ लक्ष रु. चे जादा अनुदान द्यावे, अशी विद्यापीठाची मागणी आहे. त्याचप्रमाणे परीक्षा अनुदान ३ टक्क्यांवरून १० टक्के वाढवावे व स्थानिक भत्ता व घरभाडे यांचे सध्याचे ८० टक्के अनुदान १०० टक्के केल्यास विद्यापीठाची बरीचशी तूट भरून निघेल.

**विद्यापीठाच्या उत्पन्नाच्या ठळक बाबी कोणत्या ?**

(१) अध्यापन फी, (२) परीक्षा फी, (३) इतर संकीर्ण फिया, आणि (४) शासनाची अनुदाने ह्या विद्यापीठाच्या उत्पन्नाच्या प्रमुख बाबी आहेत. पहिल्या तीन गोष्टींवर विद्यापीठाचे नियंत्रण आहे, पण ४ थी बाब सरकारच्या आधीन आहे. पहिल्या ३ मिळून उत्पन्न ५५ टक्के आहे तर अनुदानाचे शे. प्रमाण ३१ टक्के आहे. फी वाढविल्यास विद्यार्थ्यात असंतोष होतो, ते अवघड दुखणे आहे. अनुदान वाढविण्यास सरकारकडे धाव घ्यावी लागते. ती धाव घेतल्यानंतर सरकारी यंत्रणेच्या नेहमीच्या पद्धतीने कामे होतात. त्याला वेळ लागतो. काही वेळा इतर अडचणींनी कामे अडून बसतात.

**विद्यापीठाचा खर्च कोणत्या गोष्टींवर होतो ?**

(१) अध्यापन–संशोधन, (२) परीक्षा–व्यवस्था, (३) सामान्य–प्रशासन, (४) ग्रंथालय, (५) आवार व्यवस्था, (६) मुद्रणालय ह्या गोष्टींवर प्रामुख्याने खर्च होतो.

**दृष्टिक्षेपात जमाखर्च ( आकडे स्थूल )**

| बाब | जमा ७४–७५ | ७५–७६ संकल्पित |
|---|---|---|
| अनुदाने | ६३ लक्ष | ६२ लक्ष |
| परीक्षा शुल्क | ७६ " | ८० " |
| शिक्षण शुल्क | ५ " | ५ " |
| इतर शुल्क | १५ " | १५ " |
| मुद्रणालय उत्पन्न | १२ " | १३ " |
| इतर | ... | ... |
| एकूण | १ कोटी ८४ लक्ष | १ कोटी ८७ लक्ष |

| बाब | खर्च ७४–७५ | ७५–७६ संकल्पित |
|---|---|---|
| सामान्य प्रशासन | २६ लक्ष | ३५ लक्ष |
| परीक्षा खर्च | ५७ " | ५६ " |
| अध्यापन–संशोधन | ५४ " | ५९ " |
| विद्यार्थी कल्याण | ५ " | ५ " |
| ग्रंथालय | ८ " | ९ " |
| बहि:शाल शिक्षण | १ " | १ " |
| मुद्रणालय | १४ " | १४ " |
| स्थावर विभाग | ६ " | ७ " |
| अनावर्ती खर्च | ८ " | १० " |
| इतर संकीर्ण | १५ " | १५ " |
| एकूण | १ कोटी ९८ लक्ष | २ कोटी १५ लक्ष |

**नव्या आकृतीबंधाचा (हायरसेकंडरी १०+२+३) विद्यापीठाच्या उत्पन्नावर काय परिणाम होईल ?**

हायरसेकंडरीमुळे विद्यापीठ परीक्षा फी च्या उत्पन्नात किमान ४०–५०% घट होईल. मात्र परीक्षा विभाग व कारभारयंत्रणेचा खर्च पगारांच्या रूपाने बांधलेला आहे. तो सुमारे प्रतिवर्षी ७५ लक्ष आहे. तेव्हा नव्या आकृतीबंधामुळे विद्यापीठाची तूट निश्चितच वाढेल.

**प्राध्यापकांना द्यावयाच्या नव्या वेतनश्रेणीच्या मागणीचा आर्थिक ताण विद्यापीठास जाणवेल काय ?**

पहिली पांच वर्षे नवीन स्केल घेतल्यामुळे जो अधिक खर्च होईल त्यातील ८०% केंद्र व २०% रकमांची राज्य सरकार तरतूद करणार आहेत. त्यानंतर राज्य सरकारने ह्याबाबतीत १००% जबाबदारी स्वीकारायची आहे अशी मूळ योजनेतील कल्पना आहे. मात्र ज्या तारखेपासून नवी वेतनश्रेणी अंमलात येईल त्यानंतर निर्माण झालेल्या पदांच्या पगाराची जबाबदारी विद्यापीठे व महाविद्यालये ह्यांच्यावर येईल. तेव्हा पाच वर्षानंतर राज्यशासनाने ह्या खर्चाचा समावेश केवळ Maintenance Grants मध्ये केल्यास त्याचा बोजा काही प्रमाणात विद्यापीठे व महाविद्यालये ह्यांना सोसावा लागेल.

विद्यापीठाचा प्रपंच चालविण्याकरता अर्थतज्ज्ञ म्हणून आपल्या काही खास योजना आहेत काय ? उदाहरणार्थ, उत्पन्नात वाढ करणे, अनावश्यक खर्चास कात्री लावून आता होणारा खर्च अधिक उपयुक्त व उत्पादक करण्याकडे आपण लक्ष पुरविणार आहात काय ?

अनावश्यक खर्च कमी करून काटकसर केली पाहिजे व त्या दिशेने विद्यापीठाचे प्रयत्न चालू आहेत. ह्या पद्धतीने काही खर्च कमी करता येतील. परंतु विद्यापीठाच्या आवश्यक

कार्यात कमतरता येईल. अशा पद्धतीने काटकसर करणे योग्य होणार नाही. विद्यापीठाचे उत्पन्न कसे वाढेल हा विचाराचा दुसरा प्रश्न. हे मुख्यत्वेकरून फी व सरकारी अनुदान ह्यातून मिळणारे असते. यंदाच्या अर्थसंकल्पाच्या भाषणात सांगितल्या-प्रमाणे ' शिकवणी फी व परीक्षा फी या वाढविल्या तर त्यांची झळ हल्लीच्या अतिशय महागाईच्या काळात गरीब स्थितीतल्या कुटुंबांना लागणारआहे. फी वाढ करणे ही व्यवहाराच्या दृष्टीने गोष्ट सोपीनाही. 'त्यामुळे विद्यापीठाला शासनाच्या अनुदानांवर अवलंबून राहणे अटळ आहे. महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्रातील विद्यापीठांची आर्थिक परिस्थिती समजून घेण्यासाठी व त्यावर उपाय काढण्यासाठी एक समिती १९७१ मध्ये नेमली आहे. त्या समितीचा अहवाल अद्याप तयार झाला नाही व प्रश्न अनिर्णित राहिला आहे.

ह्याखेरीज इतरही मार्गांनी विद्यापीठाला पैसा उभा करता येईल जसे–१) माजी विद्यार्थ्यांकडून देणग्या, २) धनिक वर्ग, कारखानदार ह्यांच्याकडून दान, ३) इतर काही उपक्रम इ. ह्याविषयी वेगवेगळ्या सुचना येत असतात, त्यांची व्यावहारिक उपयुक्तता तपासून पाहिली पाहिजे. ह्याविषयीच्या आणखीही काही सूचना तुम्हा मंडळींना सुचत असल्यास त्यांचेही स्वागतच होईल.

विद्यापीठाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांच्या सूचना आम्हाला जरूर कळवाव्या.

'सूचना करा– स्वागत होईल' म्हणणाऱ्या प्रि. दाभोलकरांना स्वतःला काहीच सुचत नसेल काय! पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे एक वैशिष्टच. सौजन्य व आर्जव ह्यांनी इतरांना आपलेसे करायचे, त्यांना बोलते करायचे, ऐकून घ्यायचे आणि त्यांना एखाद्या प्रश्नाचा सखोल विचार करायला आपल्यासांगाती घ्यायचे !

पुणे विद्यापीठाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाय योजना सुचविण्याचे त्यांनी आवाहन केले आहे. त्यांचे आवाहन वैयक्तिक आम्हाला उद्देशून नसून 'अर्थ'च्या वाचकमंडळींना आहे, हे सुज्ञासी सांगणे नलगे । ● ●


# REGIONAL PLANNING

**An Areal Exercise**

*by* Dr. M. D. Sathe

**' If more such plans were made, India would certainly be able to execute a national plan much easier than it does now.........a valuable contribution for Indian Economics '**

**From Foreword by Prof. Bert F. Hoselity of University of Chicago, Chicogo U.S.A.**

**Royal Octv. pp. xii + 229    Rs. 40.00**


# मोलसवर्थकृत मराठी–इंग्रजी शब्दकोश

**सुधारित पुनर्मुद्रण १९७५**

डॉ. न. गो. कालेलकर यांची नवी प्रस्तावना, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा पुरस्कार व मोलसवर्थ व त्यांचे सहकारी यांच्यावरील चरित्रात्मक टिपणासह.

पृष्ठे ९७० ● डबलडेमी सुवर्णाक्षरांकित संपूर्ण कापडी बांधणी ● किमत रु. १२५/–

**Shubhada–Saraswat Publication, 67 Patil Estate, Bombay–Poona Road, Poona 411 005.**



## उद्योग व्यवस्थापन

# औद्योगिक विश्व

डॉ. प्र. चि. शेजवलकर
डायरेक्टर, इन्स्टिटयूट ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट, पुणे.


**डॉ. शेजवलकरांनी सरकारी धोरणातील धरसोड वृत्ती व त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात निर्माण झालेल्या अडचणी ह्यांचे विश्लेषण ह्या लेखात केले आहे. ह्यातून मार्ग काढण्याकरिता प्रशासक, उद्योगपती व बुद्धिवंत ह्या तिघात सुसंवाद निर्माण व्हावा अशी त्यांची अपेक्षा आहे. औद्योगिक उत्पादनाशी प्रत्यक्ष संबंध असणाऱ्या व्यक्तींनी ह्या संदर्भात त्यांच्या प्रतिक्रिया पाठवल्यास 'अर्थ'च्या वाचकांना त्यांच्या अनुभवसिद्ध अभ्यासाचा लाभ होईल.**

औद्योगिक विश्व आणि बाहेरचे जग यांच्यामधील वैचारिक दळणवळण अगदीच कमी असते. एखाद्या कारखान्यात मोठा संप झाला की मग वृत्तपत्रांतून काही दिवस तो चर्चेचा विषय होतो. राजकीय पुढारी आणि अर्थशास्त्रातील प्राध्यापक मंडळी अधूनमधून औद्योगिक धोरणाबद्दल वक्तव्य करतात, त्याकडे देखील सामान्य लोक फारसे लक्ष देत नाहीत. सामान्यतः खाजगी उद्योगधंदा म्हणजे भरपूर नफा उकळणारे भ्रष्टाचाराचे आगर, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदा म्हणजे उधळपट्टी व अकार्यक्षमता यांचे द्योतक आणि सहकारी कारखाना म्हणजे स्थानिक राजकारणी लोकांनी निर्माण केलेला अड्डा एवढीच काय ती गोष्ट लोकांच्या मनात रुजलेली असते. त्यामुळे उद्योगधंद्यातील उत्पादनाचे नियोजन, बाजारपेठेतील अडचणी, व्ययचिकित्सा, व्यवस्थापनाचे तंत्र, मजूरविषयक प्रश्न इत्यादींबाबत कारखानदारांना भेडसावणाऱ्या समस्या बाहेरच्या जाणत्या मंडळींनाही नीट समजत नाहीत. औद्योगिक क्षेत्रातील अधिकारी मंडळीही आपल्या व्यापात आणि प्रतिष्ठेत इतकी अडकलेली असतात की, इतरांशी सुसंवाद करण्याचे त्यांना भान राहत नाही. शिक्षणक्षेत्रातील बुद्धिजीवी लोकांशी त्यांनी अधिक संबंध प्रस्थापित केल्यास लोकांना औद्योगिक घडामोडींची अधिक चांगली कल्पना येईल. कित्येक उद्योगधंद्यांमधील चांगल्या प्रथा, शिस्त, वक्तशीरपणा, नियोजन, अचूक आणि वेळेवर निर्णय घेण्याचे कौशल्य इत्यादी गोष्टी सामान्य लोकांपर्यंत पोहोचत नाहीत.

खाजगी क्षेत्रातील कारखानदारवर्ग विशिष्ट प्रकारची राजकीय मते मांडतो, हे गृहित धरूनही आर्थिक प्रश्नांचे व्यवहारोपयोगी विश्लेषण करण्याचा त्यांचा दृष्टिकोण बऱ्याच वेळा वाखाणण्यासारखा असतो. त्यांच्यातील अधिकारीवर्गाशी अनौपचारिक व मनमोकळे संभाषण करताना त्यांच्या प्रतिक्रिया अधिक चांगल्या समजू शकतात. शिक्षणाचेच उदाहरण घ्या. कारखान्यात किंवा बँकेत चांगली नोकरी मिळण्यासाठी आमचे पदवीधर धडपडतात. परंतु त्यांच्या शिक्षणाचा दर्जा खाजगी क्षेत्रातील अधिकारीवर्गास निकृष्ट वाटतो. आमचा पदवीधर त्यांच्या कामांच्या दृष्टीने निरुपयोगी ठरतो. तेथील शिस्त झटपट पास होण्याची किमया साध्य झालेल्या आमच्या तरुणांना मानवत नाही. आमचा अभ्यासक्रम कसा असावा म्हणजे आमचा पदवीधर त्यांना ताबडतोब उपयोगी पडेल, याविषयी कारखानदारांशी विद्यापीठाने विचारविनिमय करावयास हवा.

**औद्योगिक अडचण :** सरकारने निर्माण केलेल्या परिस्थितीमुळे उत्पादनवाढीत अडथळे कसे येतात, या विषयीही त्यांचे विश्लेषण केवळ पोथीनिष्ठ नसते. भारतात औद्योगिक उत्पादनाचे भैरवाजवी केंद्रीकरण झाल्यामुळे निर्माण झालेली आर्थिक विषमता दूर करण्याकरिता आपण समाजवादी ध्येयधोरण आखून त्याप्रमाणे कायदे केले. लहान उद्योगधंद्यांना आणि मागासलेल्या प्रदेशात जाऊन उद्योगधंदे काढणाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे, हा त्यामागील हेतू होता. परंतु प्रत्यक्षात धड लहान उद्योगधंदेही निघाले नाहीत, मागासलेला प्रदेशही विकसित झाला नाही आणि मोठ्या उद्योगधंद्यांना परवाने

नाकारण्यात आल्यामुळे उत्पादनात वाढ झाली नाही. जीवनोपयोगी वस्तूंची टंचाई जाणवण्याचे हेही एक प्रमुख कारण आहे. आज आर्थिक मंदीचे भय निर्माण झाले आहे, त्याचे कारण बाजारात मागणी कमी झाली आहे हे नसून उत्पादनाला चालना देणारे घटक अजिबात अनुकूल नाहीत. कच्चा माल पुरेसा व वेळेवर मिळत नाही, कच्चा माल भरपूर साठवून ठेवावा तर त्यासाठी पुरेसा कर्जपुरवठा होत नाही, वॅगन्स वेळेवर मिळत नाहीत, मजूरविषयक कायदे कामगार संघटनांचे प्रस्थ वाढविण्यास कारणीभूत होतात, महागाई भडकत चालल्यामुळे वेतनखर्च वाढतच जातो, श्रमिकांची उत्पादनक्षमता मात्र उत्तरोत्तर कमी होत जात आहे, यावर व इतर अनेक अडचणींवर उत्पादन वाढविणे कसे अशक्य होऊन बसले आहे याची खरी कल्पना कारखान्यातील अधिकाऱ्यांशी बोलल्याशिवाय येत नाही. मोठ्या औद्योगिक कंपन्यांना आता विशेष प्रोत्साहन दिल्याखेरीज आणि त्यांचा विस्तार त्यांना करू दिल्याखेरीज मूलभूत क्षेत्रातील औद्योगिक उत्पादन वाढणार नाही, याची केंद्रीय अर्थमंत्र्यांना परवा जाणीव झाली. गेली पाच वर्षे सरकारी औद्योगिक धोरण इतके परस्परविरुद्ध व गतिशून्य होते की, त्यामुळे ज्यांच्यात उत्पादन वाढविण्याची धमक होती त्यांना कोंडीत धरून ठेवल्यासारखे केले होते. १९७० मध्ये मूलभूत क्षेत्रातील उत्पादन वाढविण्यास प्रोत्साहन देणारे धोरण केंद्रसरकारने अमलात आणले. त्याप्रमाणे त्यांनी त्यात भांडवलही गुंतविले. परंतु त्याचवेळी त्यांचा व्यापारी क्षेत्रातील व्याप वाढविण्यास योग्य असे धोरण केंद्रसरकारने आखले नाही. मोठ्या उद्योगधंद्यांनी निर्यात वाढविली पाहिजे, हा सरकारने आग्रह धरला आणि निर्यातीस पोषक अशा सवलती जाहीर केल्या. परंतु त्याचवेळी मक्तेदारी नियंत्रण मंडळ स्थापन करून सरकारने कोणतीही नवी औद्योगिक हालचाल करताना खाजगी कारखानदारांना जागोजागी अडविले. नव्वद दिवसांच्या आत नवा औद्योगिक परवाना मिळेल, अशी कार्यपद्धती अमलात आणली. परंतु ज्या क्षेत्रात खाजगी कारखानदारांना कमी खर्चात उत्पादनवाढ करता येते ते क्षेत्र या कार्यपद्धतीत विचारात घ्यावयाचे नाही, असे प्रत्यक्षात धोरण आखले. उत्पादनखर्चावर मर्यादा घालावी, असा सरकारने उपदेश केला. परंतु त्याचवेळी वाढत्या निर्देशांकाप्रमाणे वाढते महागाईभत्ते जाहीर केले आणि सार्वजनिक क्षेत्रातून खाजगी क्षेत्राला पुरविला जाणारा माल वाढत्या किमतींना विकला. इंधनसमस्येचा तर परवा परवापर्यंत पंचवार्षिक योजनेच्या अहवालात सरकारने कोठेही विचारच केला नाही. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या मूलभूत गोष्टी उभ्या करण्याची जबाबदारी नियोजनाच्या संदर्भात सरकारने स्वतःच्या अंगावर घेतली. परंतु रस्त्यांची वाढ, ट्रक्सची आणि वॅगन्सची उपलब्धता, वीजपुरवठा, तांत्रिक प्रशिक्षणाची व्यवस्था अशा कितीतरी बाबतीत सरकारी नियोजन अपुरे पडले आणि अपयशीही ठरले. समाजवादी समाजरचनेची चौकट कायम ठेवूनही कित्येक आर्थिक निर्णय प्रथम उत्पादनवाढीसाठी पोषक ठरतील असे घ्यावे लागतात. ॲल्युमिनियम, रबरी टायर्स, खते, छोटी यंत्रे व यंत्राचे सुटे भाग, सिमेंट, पोलाद इत्यादी कितीतरी मूलभूत अशा क्षेत्रात वेळोवेळी पुरेशी उत्पादनवाढ करू देणारे धोरण न आखल्यामुळे आज त्याचा परिणाम त्यावर अवलंबून असणाऱ्या इतर अनेक उद्योगधंद्यांवर झाला आहे. परिणामी या क्षेत्रातील मालाची आयात वाढवावी लागून परकीय चलनावर मात्र आज ताण पडला आहे. या मालाची आयात करण्यापेक्षा या मालाचे उत्पादन करणाऱ्या खाजगी कंपन्या आकाराने मोठ्या झाल्या तरी चालतील, हा वास्तववादी विचार सरकारला का सुचला नाही, हा प्रश्न पडतो. मूल्यनियंत्रणाच्या धोरणाबाबतही अशीच व्यवहारशून्यता प्रत्ययाला येते. दहा-पंधरा वर्षांपूर्वीचे गुंतवणुकीचे आकडे लक्षात घेऊन सरकारने कित्येक क्षेत्रांत मूल्यनियंत्रण आणले. ते अवास्तव ठरल्यामुळे परिणामी मूल्यनियंत्रित माल काळ्या बाजारातून मात्र विकला जाऊ लागला. नवीन गुंतवणूक अशा क्षेत्रात होईनाशी झाली. चैनीच्या वस्तूंवर सरकारने प्रचंड आयात कर बसविला. परंतु प्रत्यक्षात त्याचा काय परिणाम झाला, तर आपल्याच देशातील चैनीच्या वस्तू तयार करणाऱ्यांना त्यामुळे आपोआपच संरक्षण मिळाले आणि चैनीच्या वस्तू तयार करण्याची आपल्या कारखानदारांची प्रवृत्ती वाढली. कारण चैनीच्या वस्तू कमी वापरण्याची प्रवृत्ती लोकांमध्ये निर्माण करण्यात सरकारला कधीच यश आले नाही. अशा कितीतरी गोष्टी औद्योगिक विश्वात फेरफटका मारल्यास अधिक मार्मिकपणे कळतात. अर्थशास्त्रातील आणि व्यापारशास्त्रातील ठराविक चाकोरीतील सिद्धांत नव्याने घासून पुसून मांडताना जाणत्यांनी औद्योगिक क्षेत्र आणि शिक्षण क्षेत्र यांचे साहचर्य वाढविण्याचा नवा प्रयत्न करावा तो यासाठीच. ● ●



# नवीन यंत्रे प्रक्रिया व प्रकल्प

'इलेक्ट्रॉनिका'चे

# श्री. प्रकाश रत्नपारखी ह्यांची मुलाखत

राजेंद्र पटवर्धन

पुणे शहराला सर्व अर्थांनी भूषणावह अशी गेल्या १० वर्षांतील घटना म्हणजे धडाडी, उत्साह, काम करण्याची हौस, निष्ठा, बुद्धिमत्ता असे गुण असलेल्या तरुण मराठी कारखानदारांचा उदय होय. अशा या भारताचे भविष्य घडवणाऱ्या वर्गाचे श्री. प्रकाश रत्नपारखी हे प्रतिनिधी होत. त्यांनी आणि त्यांच्या सहाध्यायांनी सुरू केलेल्या 'इलेक्ट्रॉनिका' या कंपनीला मराठा चेंबर ऑफ कॉमर्सने 'स्पार्क इरोजन डाय सिंकिंग मशीन'साठी १९७२ साली 'यशोदा रामचंद्र भिडे पारितोषिक' आणि १९७४ साली 'पारखे औद्योगिक मान पारितोषिक' अशी पारितोषिके देऊन त्यांचा गौरव केलेला आहे.

श्री. रत्नपारखी पुण्याच्याच नू. म. वि. हायस्कूलचे विद्यार्थी. १९६२ मध्ये ते महाराष्ट्राच्या एस. एस. सी. परीक्षेत बोर्डात पहिल्या पंचविसांत आले. नंतर अमेरिकन फील्ड सर्व्हिसतर्फे, अमेरिकेमध्ये एक वर्ष तेथील कौटुंबिक जीवनाचा अनुभव घेण्यासाठी, त्यांना शिष्यवृत्ती मिळाली. त्यांच्या पत्नी पूर्वाश्रमींच्या कु. शिरीष ओगले, ह्याही अमेरिकन फील्ड सर्व्हिसच्या स्कॉलर आहेत.

अमेरिकेतून परतल्यानंतर श्री. रत्नपारखी यांनी मुंबईच्या आय. आय. टी. मध्ये प्रवेश केला. तेथून ते बी. टेक्. ( इलेक्ट्रिकल ) उत्तीर्ण झाले. आपण स्वतःच्या उमेदीवर आणि तंत्रज्ञानावर काहीतरी स्वतः करून दाखवायचं या जिद्दीनं त्यांनी आणि त्यांच्या सहाध्यायांनी 'इलेक्ट्रॉनिका' ही कंपनी सुरू केली. या कर्तबगार, गतिमान आणि चैतन्यशील व्यक्तिमत्त्वाची वाचकांना ओळख करून देणारी ही मुलाखत पुणे विद्यापीठाच्या एम. बी. ए. कोर्सचा विद्यार्थी. राजेन्द्र प. पटवर्धन याने घेतलेली आहे. उद्योगधंद्यांतील यश हा काटेरी मुकुट कसा असतो, याची वाचकांना कल्पना येईल परंतु काही झालं तरी तो मुकुट असतो हेही तितकंच खरं !

**'तुम्ही जेव्हा हा उद्योगधंदा सुरू केलात, तेव्हा मार्गदर्शक तत्त्व तुमच्यापुढे कोणतं होतं? काहीतरी स्वतःचं असण्याची इच्छा, काहीतरी सर्जन करण्याची इच्छा का आर्थिक लाभ ?'**

'तेव्हा प्रबळ इच्छा हीच होती की, काहीतरी धंदा स्वतः काढावा. काहीतरी नवीन करून दाखवावं. काहीतरी क्रीएटिव्ह दाखवावं. पण तेव्हा मला हे कळलं नव्हतं की, उद्योगधंदा हा सर्जनशीलतेसाठी नसतो. वैयक्तिक समाधानासाठी नसतो. धंदा हा नफा मिळविण्यासाठी असतो. हे साधं तत्त्व मला कळायला सहा वर्षं लागली.'

**'म्हणजे धंद्याचं यश ठरवण्याची कसोटी नफा हीच होय ना ?'**

'अगदी, किंबहुना मराठी मनुष्य धंद्यात मागे याचं कारण त्याला 'धंदा' म्हणजे काय हे कळलेलंच नाही. अगदी आजही नव्वद टक्के मराठी कारखानदार आणि व्यापाऱ्यांविषयी मी हे सांगतोय्.'

**'मग आज इतकी बडी बडी प्रथितयश मराठी नावं उद्योगक्षेत्रात दिसतात त्यांचं काय ?**

'त्यांनी उद्योगधंदे चालविले, केलेले नाहीत. एका विशिष्ट वेळी एका विशिष्ट मालाला मागणी होती. तेव्हा त्यांनी कारखाने उभारले. चिक्कार पैसा मिळाला. सायकलीची गाडी झाली. घराची हवेली झाली. शेकडोंना नोकऱ्या मिळाल्या. पण म्हणून या कारखान्यांचे चालक खरे 'उद्योगपती' बनत नाहीत. त्यासाठी जो धंद्याचा दृष्टिकोण लागतो तोच त्यांना नव्हता. मराठी कारखानदारांनी फायदेशीरपणा म्हणजे काय हेच पाहिलं नाही. बहुतांशी मराठी कारखानदार हे धंद्याच्या

एका ठराविक मर्यादेपलीकडे गेलेले नाहीत. त्यांचा व्याप इतर कारखानदारांसारखा विश्वव्यापी झालेला नाही ( Business Empire ) याचं कारण हेच आहे. त्यांनी धंदा केलेलाच नाही.'

**'यामागची ऐतिहासिक पार्श्वभूमी काय असेल ?'**

'मराठी माणसाला भांडवल किंवा पैसा याचा अर्थशास्त्रीय अर्थच माहीत नाही. कर्ज म्हटलं की तो अजूनही डोक्याला हात लावून बसेल. 'आपला' पैसा म्हणजे 'चांगला' आणि 'कर्ज' म्हणजे 'वाईट' अशा हास्यास्पद भूमिका तो घेतो. धंद्याकडे पैशांची पर्यायी किंमत, भांडवलाची उत्पादकता हे निकष लावून डोळसपणे तो पाहतच नाही. धंद्याची गरज काय हे त्याला, कळतच नाही. एक उदाहरण घ्यायचं म्हटलं तर पाहा, मुंबईला नुसत्या पत्र्याच्या शेड्समध्ये चालणारे परंतु लक्षावधींची उलाढाल असलेले वर्कशॉप्स् आहेत. त्यांनी पॉश केबिन्स का ठेवली नाहीत ? कारण त्यांच्या धंद्याला अशा गोष्टींची गरजच नाही. ही जी व्यापारी दृष्टी आहे ती मिळवली पाहिजे आपण.'

**'तुमच्या व्यवसायात उत्पादन, व्यवस्थापन आणि विक्री यांमध्ये सगळयात जास्त महत्त्व कशाला आहे ?'**

'अहो, माझ्याच काय, पण सगळयाच भारतीय उद्योग-धंद्यात 'विक्री' सगळयात महत्त्वाची होऊन बसलीय्. दुर्दैवाने एवढंच नव्हे, तर विक्रीव्यवस्थेतही वैयक्तिक ओळखी हा भाग सगळयात महत्त्वाचा होऊन बसलाय्.'

**'म्हणजे प्रत्यक्ष मालाच्या गुणधर्मांव्यतिरिक्त ?'**

'छे। छे:, मालाच्या गुणधर्माला अर्थच उरला नाही अशी स्थिती आहे, तुमचा माल उत्कृष्ट प्रतीचा असेल, किंमत त्याची वाजवी असेल, त्याचं आयुष्य तुमच्या स्पर्धकाच्या मालाच्या तिप्पट असेल, तुमची 'आफ्टर-सेल्स सर्व्हिस' वाखाणण्या-सारखी असेल, इतकं असूनही तुमच्या स्पर्धक विक्रेत्यानं केलेल्या गोष्टी केल्या नाहीत—उदा. ग्राहकाच्या मित्राच्या बायकोची ओळख आणली नाही, झकासपैकी हॉटेलात पार्टी दिली नाही, कंपन्यांच्या पर्चेस मॅनेजरला भेटी दिल्या नाहीत—तर तुमचा माल खपणार नाही ! तुमच्या स्पर्धकाचा खपेल—मग तो निकृष्ट दर्जाचा, तिप्पट किंमतीस असो.'

**'नफ्याच्या मागे लागलं, म्हणजे अशा गोष्टी होणा-रच, नाही का ?'**

'नाही, नाही, नाही. मी जेव्हा म्हणतो की, धंद्यात नफ्या-कडे दृष्टी निष्ठुरपणे ठेवली पाहिजे, तेव्हा मी फॅक्टरीच्या चार भिंतींमध्ये बघतो. माझ्या मालाच्या प्रतीकडे, किंमतीकडे, नफ्याकडे बघतो. फॅक्टरीबाहेर धंद्याचे नैतिक नियम आहेतच. ते पाळले पाहिजेतच. पण तेही आज पाळले जात नाहीयेत.'

**'उदाहरणार्थ ?'**

'बेधडक खोटं सांगणं. अमुक अमुक मनुष्य आपला भागी-दार ( खरा तो स्पर्धक असतो ) आहे, आपला माल घेणं म्हणजे त्याचा घेण्यासारखंच आहे असं सांगून माल खपवणं. खपवलेला माल निकृष्ट असतो, तो काम देणार नसतोच. या सगळयामुळे स्वतःचा माल तात्पुरता खपतो; नंतर काही का होईना ! अशी अनैतिक वृत्ती आपल्या देशात भयंकर वाढ-लीय्. मला याचा फटका स्वतःला बसलाय.'

**'पण असं नाही का, की ज्यानं खोटं सांगितलंन् त्याच्या-कडून तो ग्राहक पुन्हा कधीच काही घेणार नाही ?'**

'न घेऊ दे, भारतात ५५ कोटी ग्राहक आहेत. सगळयांना सतत फसवण्याची गरजच नाही. या परिस्थितीचा मतलबी लफंगे लोक पुरेपूर फायदा उठवतात.'

**'या अनैतिकतेची कारणं काय असावीत ?'**

'मुख्य कारण हेच की, भारतीय ग्राहक हा विचारशून्य आहे. त्याला ब्रॅंडनेम्सचे विलक्षण आकर्षण आहे. यामुळं ग्राहक म्हणून त्यांची जी कर्तव्यं आहेत, ज्यांच्यामुळं त्यांचा फायदाच होणार आहे अशी कर्तव्यं आणि स्वतःच्या फायद्याच्या गोष्टी तो करीतच नाही. ग्राहकानं कारखानदाराच्या मागे असा धोशा लावायला पाहिजे की, तुझ्या मालाच्या गॅरंटीचा काल दुप्पट कर. आफ्टर-सेल्स सर्व्हिस दे, माझ्या लोकांना तुझ्या फॅक्टरीत शिक्षण दे इत्यादी. या सगळयांमुळे ग्राहकाचाच फार मोठा फायदा आहे. पण यांची त्याला आवश्यकताच वाटत नाही.'

**'इंपोर्टेड वस्तूंचे आकर्षण यातलाच एक भाग का ?**

'ते वेड तर आहेच. माझा माल इंपोर्टेड वस्तूच्या ⅓ किंम-तीला असला, मी इंपोर्टेडच्या तिप्पट गॅरंटी दिली, तरी तो इंपोर्टेडच घेणार. त्याला कारणं वेगळी आहेत हो. आज भार-तीय कारखानदार नवी यंत्रं घेतो, ती खूप वेळा यंत्रं पाहिजेत म्हणून नव्हे, तर डेव्हलपमेंट रिबेट मिळवण्यासाठी !'

**'या ब्रॅंडनेम्समुळे भारतीय कारखानदारांपुढे पेचप्रसंगच उभा असेल नाही ?'**

'तो सोडवण्याचे मार्ग आहेतच. जेव्हा उत्पादकाला खात्री असते की, त्याचा माल उत्कृष्ट प्रतीचा आहे. पण एखादं बाजारातल्या ब्रॅंडच लेबल लावल्याशिवाय तो खपणं अशक्य आहे, हे त्याला समजतं तेव्हा ते लेबल बेकायदेशीरपणे लावल्यावाचून त्याला गत्यंतर नसतं. असं केलं नाही तर त्याच्याकडे पगार द्यायला पैसा नसतो, त्याला जगायचं असते. अशा वेळी टिकण्यासाठी त्याला स्वतःला अप्रिय असे मार्ग वापरावे लागतात. आता याला तुम्ही अनैतिकता म्हणणार की

नैतिकता ? अनैतिकताच असली, तर ती त्याच्यावर ग्राहकानं लादलेली आहे हे खरं. '

**' या सर्व वातावरणामध्ये सरकारी धोरणांचा काय परिणाम होतो ? '**

' सरकारी धोरणामुळे भ्रष्टाचार नक्कीच फोफावतो. इंजिनीयर–कारखानदार प्रकाश रत्नपारखीला व्यक्ती म्हणून एक उत्कृष्ट वस्तू बनवण्यावर लक्ष केंद्रित करणं आवडेल. आज काय होतंय की, विविध तऱ्हेच्या कारण नसताना विचित्र केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी आपल्या हातून होते आहे की नाही हे पाहण्यातच त्याचा बराचसा वेळ जातो. इकडे शॉप–ॲक्ट आहे तर तिकडे इंपोर्ट परवाना आहे. इकडे या सरकारी डिपार्टमेंटचा क्लिअरन्स पाहिजे, तर तिकडे दुसऱ्याची फी भरल्याचा दाखला पाहिजे. किंबहुना आता अशी वेळ आलेली आहे, की उत्पादित मालाची किंमत काढताना **तीस टक्के खर्च** ' Government procedure ' **याच सदराखाली** घालायला पाहिजे. '


**' त्यातच परवाच्या अंदाजपत्रकात बसवलेला १% उत्पादन–कर भरीला म्हणून आलेला आहे. '**

' हा १% उत्पादन-कर बसवताना सरकारनं काय दृष्टी ठेवली आहे हे कळतच नाही. हा कर आकारण्यासाठी किती रेकॉर्डस् ठेवावी लागणार असून त्यात अनुत्पादक कामात आपलं किती मनुष्यबळ वाया जाणार आहे, याचा काही विचारच सरकारनं केलेला नाही. तुम्हाला पैसा हवाय ना ? मग घ्या ना. योग्य कर बसवा ना. मी म्हणतो, १% च काय पण ५% कर बसवा, पण तो धंद्याच्या उलाढालीवर ( Turnover वर ) बसवा आणि तो एकरकमी गोळा करा. तो गोळा करणं सोपं जाईल, उत्पादनावर परिणाम होणार नाही, उत्पादक त्रासून जाणार नाही.

' आज अशी परिस्थिती आहे की, अनेक छोट्या उद्योगधंद्यांवर टांगती तलवार आहे. ही १%एक्साइज मोजण्यासाठी लोखंडाच्या बार्सचा प्रत्येक फूट कसा वापरला गेला याची नोंद ठेवायला पाहिजे. इतकं रेकॉर्ड ठेवायचं म्हणजे छोट्या धंद्यांनी आपल्या उत्पन्नाचा केवढा मोठा भाग यात खर्च करायला पाहिजे, याचा काही विचारच केलेला नाही, माझ्या माहितीचे एक अत्यंत सचोटीचे उत्कृष्ट काम करणारे कारखानदार आहेत. त्यांच्यावर कारखाना विकण्याची पाळी आलेली आहे ! आणि हे उदाहरण काही एकमेव नाही. '

**' यावर काय उपाय आहे ?**

' आपल्याला स्वायत्त अर्थव्यवस्था पाहिजे. त्याशिवाय उत्पादक खऱ्या अर्थानं होणं शक्य नाही. तुमची सर्वांगीण ध्येय तुम्ही ठेवा, त्यावरहुकूम तुम्ही कर बसवा, पैसा मागा. पण त्यासाठी जीव टेकीला आणणारी नियंत्रणं आणि परवाने ठेवू नका. '



'इलेक्ट्रॉनिक'चे स्पार्क इरोजन यंत्र

**' धंद्याचा फायदेशीरपणा (Profitability) तुम्ही कसा ठरवता ?'**

ठोकळ नफा (Gross Profit) हा विक्री किमतीच्या ३०% पाहिजेच. '

' तुमचं यंत्र–' स्पार्क इरोजन डाय सिंकिंग मशीन ' हे उच्च पातळीच्या तंत्रज्ञानाचं तसंच भांडवली यंत्रसामग्रीमध्ये मोडणारं आहे. तेव्हा त्याच्या उत्पादनासाठी तुमच्या कारखान्याची मनुष्यबळाची गरज फार विशिष्ट असेल नाही ?'

' एक तर असं की, मला ' मजुरी ' अशी लागतच नाही. माझ्याकडे काम करणारे लोक हे नवीन परिभाषेप्रमाणे Knowledge workers आहेत. त्यापैकी बहुतेक सर्वजण इंजिनीयर आहेत. आमच्या कंपनीत ८ लोक आहेत आणि आमच्या यंत्रांचं काही उत्पादन केलं जातं अशा दुसऱ्या कंपनीत ७ लोक आहेत.

**' कारखान्याची रचना कशी केली आहे तुम्ही ?'**

' व्यवस्था, विक्री आणि उत्पादन असे तीन विभाग पाडले आहेत. प्रत्येक विभागावर स्वतंत्र मॅनेजर आहे. मी विक्री व्यवस्था पाहतो. माझे मामा श्री. पोफळे व्यवस्थापन पाहतात. माझे मोठे बंधू श्री. रत्नपारखी उत्पादन पाहतात. '

**' तुमची भागीदारीची कंपनी आहे म्हणा ना ?**

' हो, पार्टनरशिप फर्म आहे. आता धंद्याचा आकार वाढत जाईल, तसतशी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी काढण्याचा मानस आहे. '

**'स्पार्क इरोजन' विषयी काही सांगाल?'**

'स्पार्क इरोजन' हे एक नवीन सिद्धांतन आहे. 'डाय' बनवताना मनुष्याला जे कसब लागतं ते यंत्राकडे देण्यात आलेलं आहे. डायमेकिंगमधली जी साशंकता असते ती काढून टाकण्यात आलेली आहे.'

**'हे यंत्र हा तुमचा पहिलाच प्रकल्प का?'**

'हा प्रश्न मला स्वत:ला फार गंमतीचा वाटतो. कारण तुम्हाला आश्चर्य वाटेल, मी आजवर ६७ प्रकल्प करून पाहिले आहेत. मग त्यात करंट ट्रॅन्सफॉर्मर होते, निकेल कॅड्मियम सेल्स होते, शॅडोलेस लॅम्प्स होते. पण या इतक्या प्रकल्पात आर्थिक क्षमता आहे की नाही हे न पाहण्यामुळे ते उपयोगी पडले नाहीत. एवढं मात्र नक्की की, या ६६ वस्तू बनवताना मिळालेला अनुभव हा अमूल्य होता. त्याचा निरतिशय असा उपयोग मला हे यंत्र बनवताना झाला.'

**'हे स्पार्क इरोजनचें यंत्र तुम्ही साधारण किती वर्षांपूर्वी योजलं होतं?'**

'१९६८ ला मी मुंबई I I T मधून B. Tech. झालो. नंतर एका कंपनीमध्ये १॥ वर्ष नोकरी केली. नंतर ६ महिने प्राध्यापकाची नोकरी केली. हेतू हाच की, प्रॉडक्ट शोधणे आणि त्यासाठी अभ्यास करण्यासाठी भरपूर. वेळ मिळावा. डिसेंबर १९७० मध्ये प्रॉडक्ट ठरवला. १९७१ मध्ये त्यावर काम केलं. १९७२ मध्ये प्रत्यक्ष उत्पादन केलं. १९७३ मध्ये पहिली चीज विकली. १९७४ मध्ये रचनात्मक आणि संस्थात्मक स्वरूप दिलं. १९७५ मध्ये माझी चीज वेळापत्रका-प्रमाणे मार्केटला आहे.'

'म्हणजे तुमचं उत्पादनाचं वेळापत्रक यशस्वी झालं असं म्हणायला हरकत नाही.'

'मुळीच नाही.'

'हे स्पार्क इरोजन यंत्र भांडवली यंत्रसामग्रीपैकीच आहे. तेव्हा त्याच्या उत्पादनाचे नियोजन (Production Planning) करताना तुम्हाला काही अडचणी येतात का?

'भरपूर! आमच्या एका यंत्राची किंमत पाऊण लाखाच्या घरात आहे. तेव्हा एक चीज खपली किंवा खपली नाही हा आम्हाला जीवनमरणाचा प्रश्न असतो. बरं, यंत्र विकून त्याचे पैसे दोन महिन्यांनी येणार असले, तरी दैनंदिन liquidity चा प्रश्न भेडसावतोच.

'या समस्यांवर उपाय म्हणून आम्ही उत्पादनानंतर विक्री-ऐवजी विक्रीनंतर उत्पादन असा क्रम सुरू केला आहे. आर्थिक नियोजनासाठी आम्ही ऑफीस, फॅक्टरी आणि विक्री यांना एका साखळीत जोडून एकमेकांमध्ये सतत संदेशवाहन होईल अशी व्यवस्था केली आहे. यामुळे आमचे उत्पादनाचे पूर्व नियोजन अधिक यशस्वी होईल अशी आम्हाला खात्री आहे.'

'धंद्यातील समस्यांकडे तुम्ही कोणत्या दृष्टिकोनातून पाहता? सतत विवंचना करावी लागते काय?

'अशी विवंचना करीत बसलं म्हणजे हातून काही घडणारच नाही. परत असं आहे की, कोणी माझ्या घरी येऊन अक्षदा देऊन 'धंदा काढ' म्हणून मला आग्रह केला नाही. धंदा माझा मीच काढला. आता सबबी सांगणं म्हणजे गैरवाजवीच नाही का?'

**'तुम्हाला तुमच्या घराण्यात काही उद्योगधंद्याचा वारसा मिळाला?'**

'जरूर मिळाला. माझ्या वडिलांनी उद्योगधंदा केला. दुर्दैवाने काही कारणामुळे ते यशस्वी होऊ शकले नाहीत. परंतु त्यांची धडाडी आणि निष्ठा होती, त्यांचा मला फार मोठा वारसा मिळाला. तसंच त्यांच्या अपयशाला ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या, त्यांच्यापासून मी खूप शिकलो आणि शहाणा झालो.'

**'स्वत:चा उद्योग काढणाऱ्यांना खूप वेळा असा सल्ला दिला जातो की, पदवीधर झाल्यानंतर अनुभव मिळण्यासाठी १–२ वर्षं नोकरी करावी आणि नंतरच धंद्यात पडावं. हा सल्ला कितपत संयुक्तिक आहे?'**

'हा १–२ वर्षांचा 'अनुभव', 'अनुभव' म्हणजे काय असतो, हेच मला कळत नाही. बरं, धंद्यातल्या 'आतल्या' हिकमती कळून घेणं हा उद्देश असेल, तर खरा धंदेवाला त्याच्या नोकरांना १–२ वर्षांत त्या कधीच कळून देणार नाही. किंबहुना हिकमती कळू न देणं हीही एक हिकमतच असते.

'आता माझ्या मते, डिग्री मिळाल्यानंतर १–२ वर्षं नोकरी करावी, ती केवळ मजा म्हणून. पुढे स्वत:चा धंदा काढल्या-नंतर २४ तास त्याची कटकट असतेच. नितकी धडपड करण्याच्या आणि एवढी जबाबदारी आपल्या मागे लावून घेण्याच्या आधी १–२ वर्षं दुसऱ्याच्या पैशांवर मर्यादित काम करून तारुण्य उपभोगणं यासाठी नोकरी करावी. दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी नाही.'

**'सध्या लघुउद्योगधंद्यांना सवलती देण्याचं सरकारचं धोरण आहे, ते कितपत योग्य आहे?'**

'तत्वत: धोरण योग्य आहे यात वादच नाही, परंतु लघु-उद्योगाची व्याख्या ठरविण्याच्या कसोटया वस्तुस्थितीला धरून नाहीत. एखाद्याच्या धंद्याची उलाढाल १० लाख असेल, दुसऱ्याची १० हजारांची असेल. १० लाख उलाढालवाला दिल्लीला शंभर फेऱ्या घालील. १० हजारवाल्याला हे कसं

शक्य होईल ? सध्याचं सरकारी धोरण पाहिलं, तर दोघांना सारख्याच सवलती आहेत; कारण दोघांचं भांडवल सारखंच असेल. भांडवल सारखंच असून उलाढालीत इतका फरक असला, तर ज्या सवलती आहेत, त्यांचा उपयोग दोघांना सारखा कसा होईल ?'

**'तुमच्या या यंत्राचं व्यवस्थापनाच्या दृष्टीनं काही वेगळेपण आहे का ?'**

'वेगळेपण असं आहे की, यंत्राच्या विक्रीच्या किमतीमध्य आमच्या इंजिनीयर्सच्या बुद्धीचा फार मोठा भाग आहे. यामुळे कॉस्टिंगचे नेहमीचे ठोकताळे येथे लावून चालत नाही. मी तर आमच्या तंत्रज्ञांना भांडवली (Capital Assets) समजतो.

'तसंच, आमच्या यंत्राची विक्री (Selling) करून भागत नाही. त्यासाठी 'मार्केटिंग' करावं लागतं. प्रत्यक्षात विक्री हा मार्केटिंगचा शेवटचा टप्पा होय. ग्राहकांना आपल्या मालाचा कसा उपयोग आहे, हे पटवून देऊन त्याची प्रत, किंमत इत्यादी गोष्टी ग्राहकाला पटवणं, हे सर्व मार्केटिंगमध्ये येतं. म्हणजे तंत्रज्ञान आणि विक्री दोन्ही त्यांत आलं.'

**'एक थोडासा वैयक्तिक प्रश्न विचारू ?'**

'हो हो अवश्य.'

**'सध्या तुम्ही समाधानी आहात ?'**

'समाधानाला दोन बाजू आहेत. Job. satisfaction हेच जर समाधान असेल, तर हो, मी पूर्ण समाधानी आहे. अंगिकृत कार्य जे आहे ते करताना मला आनंद आहे. परंतु समाधान जर माझ्या उद्योगधंद्याच्या स्थितीविषयी अभिप्रेत असेल, तर त्याचं उत्तर खूपच वेगळं आहे. मला वाटतं की, जोपर्यंत मी फॅक्टरीमध्ये आहे, तोपर्यंत मी समाधानी कधीच होऊ शकणार नाही. धंदा हा सतत वाढत राहिला पाहिजे, तर तो धंदा होतो. जेव्हा धंद्याची वाढ संपली तेव्हा तो धंदा संपला, अशी वाढ सतत व्हावी, ही फॅक्टरीत असताना माझी सतत धडपड असणार. किंबहुना असायलाच हवी. त्या दृष्टीनं मी असमाधानीच राहीन. याउलट मी ज्या क्षणी घरी संध्याकाळी पोहोचेन, त्या क्षणापासून दुसऱ्या दिवशी फॅक्टरीमध्ये पाऊल टाकेपर्यंत समाधानी राहण्याचा प्रयत्न करीन. या दोन व्यक्तिमत्त्वांना मी जपू शकलो तर ते मी माझ्या धंद्याचं यश समजेन.'

**'स्वतःचा धंदा काढू इच्छिणाऱ्यांना काही संदेश वजा सांगाल ?'**

'एका वाक्यात सांगायचं म्हणजे मी आज इतकं बोलतो हे सहा वर्षं यांत घालवल्यावर बोलू शकलो.'

● ●


बँकेतील नोकरीसाठी उपयुक्त प्रात्यक्षिक अभ्यासक्रम

## बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स

विषय – बँकिंग, बुककीपींग, व व्यापारी पत्रव्यवहार

**संपदा सहकारी बँकेच्या सौजन्याने व सहकार्याने**

**प्रात्यक्षिक अनुभवाची अमूल्य संधी**

४७ वे सत्र दि. १४ एप्रिल १९७५ पासून सुरू

मुदत – २ महिने ● वेळ सकाळी ७ – ३० ते ९ – ३०

**डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स**

७१७, बुधवार, जिजामाता बागेसमोर, पुणे २.

# बजेटच्या निमित्ताने काही स्फुट विचार

**प्रा. अविनाश जोशी**

बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स,
सध्या–गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे

सध्या आपण सगळे खूपच गडबडीत आहोत. अर्थसंकल्प सादर झालेला आहे आणि त्यावर नियतकालिकांतून, अभ्यास-मंडळातून चर्चा होत आहेत. परीक्षांचा मोसम आहे आणि शिक्षकांनी कायदेशीर असहकाराची सुरुवात केली आहे. नवे कुलगुरू, पक्षाच्या शिस्तीत खीळ पाडण्याचे नवे पायंडे आणि जे. पीं. च्या आंदोलनाला फुटणारे नवे धुमारे याही गोष्टी आहेत. एकूण हवा गरम आहे.

विद्यार्थी भेटले की म्हणतात, 'सर, बजेटविषयी सांगा.' त्यांचं बरोबर असतं. परीक्षेत बजेटवर प्रश्न येईल, अशी त्यांची अपेक्षा असते. (शिवाय, उशीरा का होईना, परीक्षा होणारच, अशी त्यांची खात्री असते.) मी माझ्या विद्यार्थ्यांना सांगतोय् की, बजेटमध्ये फारसं काही नसतं; या वर्षीही नाही. असं सांगितल्यावर काही विद्यार्थी कटतात. जे थोडे शिल्लक राहतात ते विचारतात, 'सर, बजेटमध्ये काही नसतं तर सगळे सुशिक्षित लोक बजेटबद्दल बोलताना कसे दिसले असते ? तुम्हाला कंटाळा आला असेल तर तसं सांगा. आम्ही दुसऱ्या सरांना विचारतो.'

एक विशिष्ट प्रकारचा कंटाळा खरोखरच आला आहे. सुब्रह्मण्यमनी आपल्याला सांगितलं की, अमुक अमुक खर्च होईल, तमुक तमुक प्रकारे पैसा गोळा केला जाईल. इतका इतका जादा पैसा मिळू शकेल आणि त्यामुळे २२५ कोटींची तूट येईल. शेती, वीज वगैरेंना प्राधान्य देऊ. करांच्या बाबतीत अशा प्रकारच्या सवलती देऊ की, त्यामुळे बचत वाढेल, गुंतवणूक वाढेल, शेअर्सच्या किंमती सुधारतील. इतर कर असे असे वाढवण्यात आले आहेत; त्यांतले अमुक अमुक चैनीच्या वस्तूंवर आहेत. बाकीच्यांमुळे उपभोग कमी होईल, निर्यात वाढेल, किंमती रोखल्या जातील, वगैरे वगैरे वगैरे !

यात काय नवीन आहे ? यात विशेष नवीन काय असू शकणार आहे ? सुब्रह्मण्यम् काय किंवा आणखी कोणी काय–राज्यकर्त्यांनी आखून दिलेल्या चौकटीत, आतापर्यंत पडलेल्या चाकोरीतच त्यांना ज्या काय मारायच्या त्या कोलांट्या उड्या मारता येणार. त्यांनी असा काय मोठा फरक पडणार आहे ?

प्रश्न असा आहे की, आपल्याला आपली परिस्थिती खरोखर बदलावीशी वाटते की नाही ? या देशातल्या कोणत्याही नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अमुक अमुक १० किंवा २० वस्तू व सेवांच्या व्यतिरिक्त कोणत्याही वस्तू व सेवांचा समावेश पुढील २५–३० वर्षे तरी होणार नाही–अशाप्रकारचा आणीबाणीचा निर्णय घेण्याचा खंबीरपणा आपण दाखवू शकतो की नाही ? व्यक्तींच्या जीवनमानातील फरकांच्या कक्षा ठरवण्याचा कठोर निर्णय आपण घेऊ शकतो की नाही? या निर्णयानुसारच साधनसंपत्तीचा उपयोग वस्तूंच्या उत्पादनासाठी होईल–म्हणजेच बाकीच्या कोणत्याही गोष्टींचे उत्पादन या देशात होणारच नाही–असे आपण ठरवू शकतो की नाही ?

या स्वरूपाचे निर्णय जर आपण घेऊ शकलो, म्हणजेच पर्यायाने राष्ट्रीय जीवनात जर आपण शिस्त आणू शकलो तर बजेटसारख्या गोष्टींचं काय होईल ? विशिष्ट वस्तूंचं उत्पादन कमी–जास्त करण्यासाठी प्रतिबंध–प्रोत्साहन देणारे कर कमी किंवा जास्त करण्याची कसरत निरर्थक होईल. बजेटाच्या आधी निर्माण होणारी उन्मनावस्था नाहीशी होईल. बजेट हे एक, राष्ट्राने सुज्ञपणे घेतलेल्या निर्णयांची त्या विशिष्ट वर्षी कार्यवाही करणारे एक साधन होईल.

यातील काहीही आपल्याला नकोय्. या देशात ओबेरॉय शेरॅटन्स् बांधली जात राहणार, सिगारेटींचे नवे नवे ब्रँड्स् बाजारात येत राहणार, त्यांच्यावर जाहिरातींचा खर्च होत राहणार, जुन्या देवळांचा जीर्णोद्धार होत राहणार आणि नवी बिर्ला मंदिरं उठत राहणार, कचेऱ्यांचं वातानुकूलीकरण होत राहणार, मुलांना दूध मिळत नसताना दुधाचा उपयोग मिठाई बनवण्यासाठी होत राहणार, शहरं वाढत राहणार, त्यातली एम्. डी. आणि एम्. एस्. मिळवलेल्या डॉक्टरांची क्लिनिक्स्

वाढत राहणार, खुळचट सिनेमे दाखवणारी अलिशान थिएटरं बांधली जाणार, झोपडपट्टी वाढली की, आजूबाजूच्या बंगले–फ्लॅटवाल्यांना स्वस्तात मोलकरी मिळाल्याचा आनंद होणार.

हे सारं बहुसंख्य भारतीयांना हवंय्, असं वाटण्यासारखी परिस्थिती आहे. आज गरीब असल्याने ज्याला या गोष्टींबद्दल चीड येते तोही थोडा कमी गरीब झाला की ही चीड विसरतो आणि उपभोग–स्वातंत्र्याची भाषा बोलू लागतो. अमुक अमुक गोष्टींचा उपभोग घेणे या देशातील कोणालाही शक्य होता कामा नये, असा विचार व्यक्त झाल्यास, लोकशाहीची आठवण करून दिली जाते. सामाजिक जीवनात शिस्त आणणं म्हणजे हुकूमशाही असं समीकरण बांधलं जातं.

माझ्या काही विद्यार्थ्यांना हे सांगितलं की, मला कशा प्रकारच्या बजेटच्या चर्चेचा कंटाळा आला हे त्यांना समजतं. पण अर्थात त्यांना परीक्षा असते आणि परीक्षेत, नुकत्याच सादर केल्या गेलेल्या बजेटवर एका विशिष्ट पद्धतीने टीका–टिप्पणी करणं आवश्यक असतं. मी त्यांना आजकाल त्या प्रकारची फारशी मदत करू शकत नाही.

● ●

---

# सहज जाता जाता...

वस्तूंच्या किमती वाढत्या दराने द्याव्या लागल्या की आपला राहणीचा दर्जा उंचावला आहे अशी गोड समजूत करून घ्यावी.

☘

गाडी किती उशीरा आली हे समजावे, हा जसा वेळापत्रकाचा मुख्य उपयोग तसा ठरविल्यापेक्षा किती पैसा जास्त खर्च झाला ते समजावे हा अंदाजपत्रकाचा मुख्य उपयोग !

☘

**पुरुषांनो, सावधान !**

ह्या महिलावर्षात, घरकाम करणाऱ्या भारतातील तमाम महिला, त्यांच्या कामाबद्दलचे किमान वेतन ठरवून घेण्यासाठी आंदोलन करतील अशी एक शक्यता आहे.

☘

छोटयाशा प्रवासासाठीही अनेक कागदी चिटोऱ्यांची तिकिटे देणाऱ्या एस्. टी. ला कागदाचा प्रचंड भूमिगत साठा तरी सापडला असावा.

☘

रूआण्डा हा जगातील सर्वात गरीब देश आहे.

☘

रस्त्यावरील अपघातात बळी पडण्याबद्दल देण्यात आलेल्या नुकसानभरपाईची सर्वांत जास्त रक्कम भारतात रु. १,५५,००० इतकी असून ती न्या. मू. चैनानी यांच्या वारसाला देण्यात आली.

☘

भारतातील एक डॉक्टर भारत सोडून परदेशी स्थायिक झाल्यास देशाचे रु. ३,३०,००० इतके नुकसान होते.

☘

भारतात १९७३–७४ मध्ये वस्तूंच्या घाऊक किमतीत झालेली २२·७% वाढ, हा आतापर्यंत देशात झालेल्या भाववाढीचा उच्चांक आहे.

☘

चलन वित्त बँका विकास नियोजन

# राष्ट्रीयीकृत बँकांच्या प्रगतीला ह्यापुढे कोणते वळण मिळणे इष्ट ?

डॉ. वसन्तराव पटवर्धन
जॉइंट जनरल मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे.

**डॉ. पटवर्धन ह्यांनी राष्ट्रीयीकृत बँकांच्या कार्यात अधिक उपयुक्तता व क्षमता येण्याच्या दृष्टीने काही अभिनव कल्पना सुचविल्या आहेत. त्यातील काही; उच्च स्तरावरील धोरण ठरविणाऱ्या व्यक्तींना निश्चित स्वागतार्ह वाटतील व त्या अनुषंगाने बँकिंग कार्यपद्धतीत आवश्यक त्या सुधारणा होतील असा अंदाज आहे.**

राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर गेल्या साडेपाच वर्षांत बँका व बँकिंगवर इतक्या चर्चा व लिखाण झाले आहे की, तेवढ्या चर्चा व लिखाण भारतात बँकिंग सुरू झाल्यापासून झाले नसावे. याचा अर्थ एकच आहे आणि तो म्हणजे बँका व समाज यांचा अतूट संबंध आहे व दैनंदिन आयुष्यात प्रत्येकाला या सामाजिक सेवेसाठी चालणाऱ्या संस्थांबद्दल अत्यंत जिव्हाळा आहे. बँकेतील कारभार फक्त काही शहरी लोकांना व व्यावसायिकांनाच करावे लागतात, ही समजूत आता बदलली आहे, हा राष्ट्रीयीकरणाचा खरा फायदा आहे.

मात्र या बदललेल्या परिस्थितीचा जितका उपयोग करून घ्यायला हवा तितका तो करून घेतला जात नाही. राष्ट्रीयीकरणानंतर बँकांची प्रगती व त्यातील झालेले बदल याबद्दल बोलताना सरकारी बँकांच्या व वक्त्यांच्या, लेखकांच्या पातळीवर तेच ते मुद्दे, तीच ती आकडेवारी दिली जाते. त्यामुळे त्यात आता सुधारणांपेक्षा ठराविक कंठाळीपणाच आला आहे. बँकांत कुठे काही झाले की त्याचे पडसाद लोकसभेपासून गावातील सभेपर्यंत उमटत असतात. बँकांतील पगार, बँकांमधील भरती, बँकांतील निष्काळजीपणा, यावरच्या चर्चा ऐकून परदेशांतील व्यक्तींचा गैरसमज व्हावा, अशा त्या असतात. दुसऱ्या बाजूने बँकांवर टाकल्या जाणाऱ्या कामांचा बोजा, जबाबदाऱ्या बघितल्या की, राष्ट्रीयीकरणानंतर बँकिंग ही एक जादूची कांडी आहे असे वाटावे. दुष्काळ, आग, भूकंप, भाववाढ, कुठलेही प्रकल्प, नव्या नव्या निघणाऱ्या कॉर्पोरेशन्स, शेती, उद्योग, बेकारी, दलितांचे प्रश्न, नवे शिक्षण, लघुउद्योग, कंपल्सरी डिपॉझिटखाली रकमा गोळा करणे, यासारख्या कुठल्याही बाबींशी बँकांचा संबंध आणला जात नाही असे होत नाही.

पण कदाचित या प्रचंड ओझ्यामुळे असेल, नावीन्य ओसरल्यामुळे असेल किंवा अन्य काही कारणांमुळे असेल, बँकांमध्ये आणि सरकारी स्तरावरही नवीन विचारांचा पाठपुरावा असावा तितका होत नाही. बँकिंगबाबतच्या नियंत्रणांच्या अनेक तांत्रिक बाबी, वेगवेगळे कायदे, मागचे आलेले वारसे, नको तिथं, नको तेव्हा, नको त्याबाबतची प्रसिद्धी अशा अनेक अडचणी त्या संदर्भात आहेत. पण त्या मान्य करूनही हा जबाबदारीचा व्यवसाय जास्त प्रतिष्ठेचा, जास्त सामाजिक हित बघणारा, सगळ्यांनी ज्याची खरीखुरी काळजी वाहावी व राष्ट्रीय जीवनप्रवाहात जो एक महत्त्वाचा स्रोत बनावा असा असावा यासाठी चर्चांची खोडे उगाळत न बसता अनेक कोनांतून प्रयत्न व्हायला हवे आहेत.

बँकांतील मनुष्यबळाच्या साध्या बाबींपासूनच त्याची सुरुवात करता येईल. सरकारने बँकांतील कारकून व त्यांच्यावरील काही अधिकारी यांच्या नेमणुकीसाठी एक सर्व्हिस कमिशन नेमण्याबाबतचे बिल लोकसभेसमोर नुकतेच मांडले आहे. ते मंजूर झाले की दरवर्षी या श्रेणीत लागणाऱ्या तीसपस्तीस हजार कर्मचाऱ्यांची भरती या समितीतर्फे होईल. पण केवळ भरतीची पद्धत बदलून योग्य तऱ्हेचा कर्मचारी वर्ग मिळेल हे समजणे चुकीचे आहे. खरे पाहिले तर बी. ए. अर्थशास्त्र किंवा बी. कॉम. या परीक्षांसारखी एक **पदवी परीक्षा बँकिंग व विमा व्यवसायासाठी स्वतंत्रपणे काढायची नितांत जरूरी गेल्या दहा वर्षांपासून निर्माण झालेली**

आहे. चार वर्षांचा असा डिग्री कोर्स सुरू करून त्यात निष्णात बँक कर्मचारी तयार करावे हे कुठल्याही विद्यापीठाला वा महाविद्यालयाला सुचत नाही, हे दुर्दैवाचे लक्षण म्हटले पाहिजे. आपल्या इथे कॉलेजच्या पहिल्या वर्षात बँकिंग आहे. मग दुसऱ्या वर्षाला न घेता ते तिसऱ्या वर्षाला परत घेता येते. त्यात शिकवले जाणारे बँकिंग प्रत्यक्षात उपयोगी पडणारे ज्ञान या पद्धतीचे नसते. महाराष्ट्राला विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रात दरवर्षी जवळ जवळ दोन ते तीन हजार कर्मचारी या क्षेत्रात भरती होण्यासाठी लागतात. ते कार्य विद्यापीठांना करणे अशक्य का वाटते? खुद्द पुणे शहरात बँकिंग घेऊन नुसते उत्तीर्ण होणारे विद्यार्थी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेही नसतात. अकाऊंटस घेतल्याने नोकरी मिळते, बँकिंग घेतल्यावर खात्री नाही असे विद्यार्थी म्हणतात. हा गैरसमज दूर होणे आवश्यक आहे. असा डिग्री कोर्स नसल्याने पदवीधारकांचेही शिक्षण करण्यासाठी प्रत्येक बँकेला सुरुवातीच्या शिक्षणापोटीही लक्षावधी रुपये खर्च करावे लागतात. तिथेही इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स या संस्थेकडून ही परीक्षा असते. अन्य देशांत बँक असोसिएशनकडून असते. पण आपल्याकडील असोसिएशन हे काम करीत नाही. त्या संस्थेवरीलच अधिकारी असलेली परीक्षांसाठी दुसरी संस्था आपल्याकडे का आहे याचे पटणारे उत्तर मिळत नाही. या इन्स्टिटयूटच्या परीक्षेला, नोकरीसाठी गुणवत्ता मिळवण्यासाठी नव्हे तर नोकरी लागल्यावर बसावे लागते. सहा वर्षांपूर्वी नेमलेल्या बँकिंग कमिशनने तीन वर्षांपूर्वी जो अहवाल दिला त्यात या महत्त्वाच्या बाबीवर मूलभूत विचार नाही व दिग्दर्शनही नाही. या अहवालातील 'मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ऑफ बँक्स' हे चौदावे प्रकरण हे एक निराशाजनक प्रकरण! केवळ सर्व्हिस कमिशन 'ची सूचना आणि अन्य बरकड सूचना देण्याखेरीज या कमिशनने काहीही केले नाही. कदाचित अन्य देशांतूनही विद्यापीठातर्फे चार वर्षांच्या सखोल ज्ञानाच्या पदवीचा उपक्रम सुरू नसल्याने याचा विचार कसा करावा हाच प्रश्न कमिशनला पडला असावा! कारण त्यायोगे ही परीक्षा आम तरुण-तरुणींना उपलब्ध झाली असती! कदाचित बँकांच्या कॉलेजांनी व तत्सम N. I. B. M ;B. T. C. सारख्या संस्थांनी काय करावं हे सांगण्यापलीकडे आपल्या कक्षा नाहीत असंही त्यांना वाटलं असावं! म्हणून चौदावं प्रकरण खास ट्रेनिंगसाठी व बाविसावं प्रकरण सर्वसाधारण बँकिंग रिसर्च अँड एज्युकेशनसाठी घालून त्यांनी हा विषय संपवला आहे. आणि ते करताना सन १९३१ च्या इंडियन सेंट्रल बँकिंग इन्क्वायरी कमिटीनं 'बँकिंग एज्युकेशन' या विषयावर स्वतंत्र एक प्रकरण लिहून त्यांत 'No Co-ordination of effort exists at present between the Universities and the banks in India' असा उल्लेख केल्याचं मात्र नमूद केलं आहे.

राष्ट्रीयीकरणानंतर बँकांनी शेतीकडे मोठ्या प्रमाणावर लक्ष दिलं पाहिजे, अशी एक रास्त अपेक्षा निर्माण झाली आहे. बँकांनी त्याबाबत आपले कार्यक्षेत्र विस्तृत केले असून कर्जपुरवठ्याची गती वाढवलेली आहे. पण केवळ **कर्जपुरवठा वाढवून शेतीची सुधारणा होणार नाही.** बँकांनी आपल्या नोकरीत अनेक पदवीधर शेतकीत पदवी घेतलेले ठेवलेले आहेत. पण बऱ्याच ठिकाणी त्यांचा उपयोग कर्ज देण्याआधीची प्रकरणांची तपासणी व कर्ज दिल्यानंतरची तपासणी यांच्यासाठीच होते. या पदवीधारकांच्या ज्ञानाचा उपयोग शेतीतील नवीन सुधारणा, यशस्वी प्रयोग शेतकऱ्यांपर्यंत पोचवण्यासाठी व्हायला हवा. त्यासाठी ते देतील तो सल्ला योग्य आहे हे शेतकऱ्यांना मनापासून पटले पाहिजे, म्हणून या पदवी धारक तज्ज्ञांनी दर्शन परिणाम (Demonstration Effect) प्रभावी होईल असे बघितले पाहिजे. काही काही खेड्यांतून काही शेतावरचे यशस्वी प्रयोग पाहिल्यानंतरच आसपास संकरित ज्वारीबाजरी, सिट्रोनेला, सूर्यफूल, एरंडी, फळबागा लावण्याबाबत इतर शेतकरी उद्युक्त झालेले आहेत. त्या दृष्टीने बँकांनी आपल्या कृषिपदवीधारकांकडून केवळ असे यशस्वी प्रयोग करून शेतकऱ्यांना ते दाखवण्यासाठी सतत मेळावे, सहली आखल्या तरी त्याने खूप काम होईल, व हे करण्याकरिता कायद्यात दुरुस्ती करून बँकांना आपापल्या अग्रणी जिल्ह्यातून तरी सुमारे १०० एकर जमीन त्याकरता स्वतःच्या मालकीची घेता येईल असे बघितले पाहिजे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात अशा नमुनेदार शेतीचे उत्तरदायित्व या पदवीधारकांवर पडल्याने त्यांच्यावरील जबाबदारी वाढेल. त्यांच्या ज्ञानाचा प्रत्यक्ष उपयोग दाखवता येईल व त्या त्या जिल्ह्यातील हवामान, पाणी यावर आधारित अशा यशस्वी प्रयोगाचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दाखविण्यासाठी उपयोग झाल्याने त्यांच्यात बँकेबद्दलची आत्मीयता वाढेल. कर्ज फेडण्याची आज क्वचित टाळाटाळ दिसते ती नाहीशी होईल. हा प्रयोग सहकारी क्षेत्रातील बँकांनीही अजून केला नसल्याने त्याला एक अपूर्वाई आहे.

आज तरी अग्रणी जिल्हा योजनेबाबत कागदावर चर्चा आणि निष्कर्ष निघत आहेत. आणि त्यातील रस निघून गेलेला आहे, ती परिस्थिती व मरगळ यामुळे नाहीशी होईल. देशभर सुमारे तीनशे-साडेतीनशे प्रयोगशाळा निर्माण होतील. बँकांनी हे

करायचं का, शेतीत बँकांनी कर्ज देण्याऐवजी असे लक्ष घालायचे का असे प्रश्न कदाचित हे संपूर्ण नव्या पद्धतीचे विचार ऐकून विचारले जातील. पण आपल्याकडील राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकिंग क्षेत्राचा चेहरामोहरा बदलण्यासाठी असे प्रयोगच व्हायला हवेत. जोपर्यंत शेती इतक्या मोठ्या प्रमाणावर लोकशाही पद्धतीने सुधारायची आहे तोपर्यंत आणि बँकांकडून आताच या क्षेत्रात सुमारे ६०० कोटी रुपये व यापुढे दरवर्षी किमान १००–१५० कोटी रुपये वाढत्या श्रेणीने गुंतत जाणार आहेत तोपर्यंत बँकांच्या या शेतीच्या प्रदर्शनकेंद्रांची जास्त उपयुक्तता राहणार आहे. वेगवेगळ्या बँकांकडून संशोधनाची प्रात्यक्षिके करून घेण्याचा हा अभिनव प्रकार त्यांनाही स्फूर्तिदायक ठरेल. त्यायोगे बँकांनाही शेतकऱ्यांच्या अडचणी नीट कळतील.

बँकिंग कमिशनचा बँकांच्या पुनर्रचनेचा अहवाल आता मागे पडलेला आहे व सध्याच्या बँका तशाच राहणार आहेत. या बँकांच्या शाखा आता खूप वाढलेल्या आहेत. अगदी लहानात लहान राष्ट्रीयीकृत बँकेच्या शाखा आता चारशेच्या आसपास आहेत तर पहिल्या पाच बँकांच्याही शाखा प्रत्येकी हजारच्या जवळ पोचल्या आहेत. म्हणजे एका अर्थाने या बँकांमध्ये प्रत्येकी दोन ते पाच बँका अप्रत्यक्षपणे एकत्रित झाल्या आहेत. या शाखांपैकी निम्म्याहून शाखा ग्रामीण आहेत आणि निम्म्या शहरी आहेत. तिथे होणारी कामे, कामांची पद्धत वेगळी आहे. पण आज सर्वत्र एकच पद्धत, एकच वेळ लावली जात आहे. त्याबाबतचे बँकांतून दिले जाणारे शिक्षण, नंतर होणारी कामाची तपासणी (Inspection) यातील एकसुरीपणामुळे ग्रामीण शाखा आणि शहरी शाखा या दोन्ही भागांत कामे होत नाहीत. कर्मचाऱ्यांतही वैफल्याची भावना जास्त वाढीला लागते. शेती, निर्यात याबाबतच्या छोट्या छोट्या अभ्यासक्रमाला अधिकाऱ्याला पाठवलं की काम झालं अशी सध्याची पद्धत आहे. यापेक्षा प्रत्येक बँकेतच एक संपूर्ण ग्रामीण विभाग व एक संपूर्ण शहरी विभाग उघडून त्या त्या क्षेत्रासाठी प्रशिक्षण, भरती, तपासणी यांच्याबाबत एकसूत्र असणाऱ्या पद्धती लावल्या तर या दोन्ही क्षेत्रांची सरमिसळ सध्या होत आहे ती थांबेल. अशा विभागाइतक्या शाखा प्रत्येक बँकेजवळ आता आहेत. त्यामुळे ग्रामीण बँकेबाबत बँकिंग कमिशनने ज्या कल्पना मांडल्या होत्या त्या सध्याची चौकट न मोडता जास्त वास्तव पद्धतीने राबवता येतील. ही दोन क्षेत्रे पाहिजे तितकी अलग ठेवून पण वर कारभाराच्या सुसूत्रीकरणासाठी एकत्र करून बँका वेगळ्या पद्धतीने आपल्या कारभारातील मरगळ घालवू शकतील.

बँकिंगबाबत चौथ्या बाबतीत विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे स्पर्धेच्या नावाखाली त्यांच्याकडून होत असणारा जाहिरातीवरील अवास्तव खर्च. रिझर्व्ह बँकेने सर्वांना ठेवीवरील व्याजाच्या बाबतीत एकच नियम ठेवले असले तरी केवळ गणिताचा आधार घेऊन वीस वर्षांनी सातपट रक्कम घ्या, दरवर्षी ३० टक्क्यांवर व्याज घ्या, अशा जाहिराती बँकाकडून होत आहेत. कंपन्यांनी ठेवी गोळा करताना कशा प्रकारची जाहिरात केली पाहिजे याचा रिझर्व बँक आग्रह धरते. पण त्याच्या दसपटीने ठेवी गोळा करणाऱ्या, मध्यवर्ती बँकेच्या संपूर्ण नियंत्रणाखाली असणाऱ्या बँकांच्याबाबततीत डोळ्यावर कातडे ओढते, हे अनाकलनीय आहे. सामान्य मनुष्याला बारकावे कळत नाहोत. तो जाहिरातीवर भुलतो म्हणून तर वेगवेगळ्या प्रकारे फसतो. मग इथे रिझर्व बँकेचे नियम व व्याजाचे दर बदलले तर त्यानुसार या ठेवींचे दर पुढील उरलेल्या काळासाठी बदलतील अशी जाहिरात तरी किमान बँकांनी दिलीच पाहिजे. हे बंधन मध्यवर्ती बँकेला का घालता येऊ नये? वित्तमंत्रालयातील बँकिंग विभाग, इंडियन बँक्स असोसिएशन यानीही आपल्या अखत्यारीत हे करू नये हे बघितलं की सध्या नको तिथे नियम, आणि पाहिजे आहे तिथे दुर्लक्ष हा कारभार सगळ्यांच्या सोयीचा पडतो असे वाटते. खरी प्रगती यामुळे अडून बसते. तसे पाहिले तर राष्ट्रीयीकृत बँकांनी एकत्र येऊनच काही जाहिराती दिल्या व खर्च वाटून घेतला तर त्यायोगे कित्येक लक्ष रुपये वाचतील. सध्या बँकांतर्फे जाहिरातीवरील एकूण होणारा खर्च किमान अडीच कोटी रुपये असावा असा अंदाज आहे.

बँकांकडून यातील काही रक्कम घेऊन वित्तमंत्रालयाने भारतीय वार्तावित्राबरोबर दाखविण्यासाठी कृषिकर्ज, लघुउद्योग, ठेवी, याबाबत चांगल्या डॉक्युमेंटरीज काढल्या तर त्यायोगे लोकशिक्षण होईल. पाच वर्षांत बँका आता खेडोपाडी पोचल्या आहेत. आता जास्त जरूरी आहे लोकशिक्षणाची. सुशिक्षितांच्या मेळाव्यात, आकाशवाणीवर बँकांच्या कारभाराच्या चर्चा फार उपयोगी पडत नाहीत. जनतेच्या जिव्हाळ्याचा हा व्यवसाय जनतेपर्यंत पोचवल्यानंतर तो राबवून कसा घेतला पाहिजे, हेही तिला विविध माध्यमातर्फे सांगितले पाहिजे. दर पाच–सात वर्षांनंतर ध्येयधोरण, कार्यक्रम व अंमलबजावणी यापैकी कशात तरी बदल झाला म्हणजे नवीन चैतन्य निर्माण होते. १९६९ सालानंतर आता परत एकदा त्याची आवश्यकता आहे. त्याबाबत ध्येयधोरणात सध्या बदल जरूर नसल्याने कार्यक्रम व अंमलबजावणी व त्यासाठीचे व्यवस्थापन यात योग्य ते बदल येत्या पाच-सात वर्षांखाली झाले नाहीत तर हा व्यवसाय परत गतानुगतिकच होईल. ● ●

## राष्ट्रीकृत बँकांकडून स्वतंत्र रोजगार व व्यवसाय ह्याकरता तुम्हास कर्ज हवे असल्यास 'अर्थ' आपल्याला सर्व प्रकारचे मार्गदर्शन आणि शक्य तितकी मदत देईल

**तुम्ही खालील उद्योग–व्यवसाय करीत असाल तर उत्तम.**

# कर्ज कसे मिळेल?

१. शेती, डेअरी, पोल्ट्री, किरकोळ धान्यविक्री दुकान, घरगुती पापड, लोणची, मसाले तयार करणे, खादी, तेलघाणी, ताडगूळ, हातकागद, डॉक्टरी, वकिली, शिक्षक, इंजिनीअर, आर्किटेक्ट, टॅक्स सल्लागार, चार्टर्ड अकौंटंट, सुतार, लोहार, चांभार, शिंपी, धोबी, प्लंबर, इलेक्ट्रिशिअन, किरकोळ कंत्राट कामे, पत्रकार, लेखक, प्रकाशक, फेरीवाले, हातगाडीवाले हमाल, भाजीवाले, फळवाले, उसाचे गुऱ्हाळ चालविणारे, फिरते विक्रेते, चहावाले, फळांचे रस विकणारे, पानपट्टीवाले, रिक्शावाले, टॅक्सी, टेम्पो, माल ने-आण, मोटर, स्कूटर दुरुस्ती, सायकल दुरुस्ती, बैलगाड्या, मालट्रक, खत-विक्रेते, कुशल कारागीर, हॉटेल, रेस्टॉरंट, अगरबत्ती, कागदी फुले, शोभेच्या वस्तू, टोपल्या तयार करणे, वेतकाम, फर्निचर, बोहारी, भंगार, जुने डबे–बाटल्या घेणारे, बँडवाले, फोटोग्राफी, बिडी धंदा, बूटपॉलिशवाले, गोळ्या विक्रेते, कमर्शिअल आर्टिस्ट, टायपिस्ट, सायक्लोस्टाइलिंग फिरत्या लायब्ररी, कोचिंग क्लास, कोळसा वखार, सोनार, कापड–रंग व छाप, बाहुल्या, कुंभार, पिठाची गिरणी चालवणारे, होजिअरी, सलून, किल्लीकुलूपवाले, कल्हई, मंडप कॉंट्रॅक्टर, गाद्या, रेडिओ मेकॅनिक, बुक व पेपर स्टॉल, रद्दीवाले, पेंटर, मूर्तिकार, रेडिमेड कपडे, स्टॅंपव्हेंडर, स्टोव्ह दुरुस्ती, चंदनाच्या वस्तू, खेळणी, छत्री–डॉक्टर, वेल्डर, घड्याळ दुरुस्ती. (ह्याशिवाय इतर काही उद्योग, लहान प्रकारचा व्यवसाय, धंदा, रोजगार आपण करीत असाल तर आम्हाला कळवा. आम्ही त्याला कर्ज मिळते की नाही ह्याबद्दलची माहिती मिळवून देऊ.)

२. तुमच्या धंद्याची उलाढाल, विक्री, नफा, अनुभव व पात्रता ह्यांचा विचार करून कर्ज भरपूर प्रमाणावर दिले जाते.

३. व्याज फारच अल्प दराने आकारले जाते.

३. कर्जफेडीचे हप्ते खूप मिळतात. त्यामुळे आस्ते आस्ते थोड्या रकमेने कर्ज फेडता येते.

५. ह्या योजनेखाली जामीन, गहाण, इत्यादीचा त्रास नाही.

६. अर्ज दिल्यावर अगदी थोड्या दिवसात कर्ज मंजूर होते.

७. **खालील कारणांनी अर्ज नामंजूर होतात**—— त्याची आधीच दक्षता घ्या : चुकीचा पत्ता, कर्ज फेडण्याची असमर्थता पूर्वइतिहास, पूर्वीच्या कर्जाचे ओझे बरेच घेतले असल्यास, रोजगार निर्माण होत नसल्यास, धंद्याचा कमी अनुभव, राहण्याचे व व्यवसायाचे कायमचे ठिकाण नसल्यास, स्कीम-मध्ये बसत नसल्यास, कर्जाची अवाजवी मागणी केल्यास, इत्यादी.

८. नजीकच्या कोणत्याही राष्ट्रीकृत बँकेत जा व विविध सेवा योजने'ची माहिती करून घ्या. विशेषत: बेकार सुशिक्षित तरुण, उपेक्षित व दलित समाजातील कष्टकरी स्वतंत्र व्यावसायिक ह्यांना ह्या योजनेत प्राधान्य आहे.

९. नोकरी मिळत नाही म्हणून रडत बसण्यापेक्षा स्वाभिमानी व कष्टाळू तरुणांनी दिलेल्या यादीतील उद्योग–व्यवसाय सुरू केल्यास, त्यांना कर्ज मिळवून देण्यासाठी 'अर्थ' मासिक विशेष प्रयत्नशील राहील.

ह्या पुढच्या अंकात नोकऱ्या व व्यवसाय ह्यांची आर्थिक माहिती आम्ही देणार आहोत. उदा. व्यवसायात किती भांडवल लागते, विक्री किती होते, नफा किती होतो कोणत्या अडचणी येतात इत्यादी. त्यामुळे पूर्वअनुभव नसताही आपल्याला एखादा धंदा–व्यवसाय सुरू करता येईल, अशी अपेक्षा आहे.

## शेती ग्रामीण उद्योग सहकार

# सहकारी ग्राहक भांडारे मूळ का धरत नाहीत ?

डॉ. गो. स. कामत

वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ को-ऑपरेटिव्ह, मॅनेजमेंट पुणे.

---

**पुण्यात नुकतीच 'ग्राहक चळवळ' सुरू झाली आहे. न्या. छगला ह्यांनी अशा उपक्रमाचे कौतुक केले आहे. लवकरच टिळक रोडवर एक सहकारी भाण्डार-सुपर स्टोअर सुरू होत आहे. ग्राहक हा संघटित नसल्यामुळे इतर वर्गाकडून भरडला जात आहे व किंमती भडकत चालल्या आहेत, जीवनावश्यक वस्तू काळ्या बाजारात गडप होत आहेत, ह्याचा अभ्यास सुरू व्हावा ह्या दृष्टीने हा पहिला लेख संक्षिप्त स्वरूपात देत आहोत.**

---

### प्रारंभ

तसे पाहिले तर सहकारी ग्राहक भांडारांचा प्रारंभ भारतात सहकारी पतपेढीच्या प्रारंभाइतकाच जुना आहे. १९०४ च्या पहिल्या भारतीय सहकारी कायद्यान्वये प्राथमिक पतपेढ्यांखेरीज अन्य प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थापना व्हावी अशी अपेक्षा नव्हती. तरीही मद्रास येथे स्थानिय प्रगल्भ नेतृत्वामुळे पतपेढी म्हणूनच संस्थेची नोंदणी करून पहिल्या प्राथमिक ग्राहक भांडाराची स्थापना झालेली आढळते. आजही ही ट्रिप्लिकेन अर्बन कन्झ्युमर्स सोसायटी म्हणून ती अस्तित्वात आहे. आकार-व्यवहाराने वाढलेली आहे. पण हा बहुधा अपवादच आढळतो.

१९१२ च्या दुसऱ्या अखिल भारतीय सहकारी कायद्यान्वये अन्य प्रकारच्या सहकारी संस्था प्राथमिक आणि दुय्यम संघ पातळीवर स्थापन करण्यास अनुमती मिळाली. या ओघात अनेक ठिकाणी स्थानिय पातळीवर स्वेच्छेने प्राथमिक ग्राहक भांडारे उभारली गेली. १९१३-१४ च्या सुमारास पुण्याला सेवासदनच्या कै. गोपाळ कृष्ण देवधरांनी एक कापड दुकान सहकारी तत्त्वावर सुरू केल्याची माहिती मिळते.

तरीही पतपेढ्यांनी जेवढा प्रगतीचा वेग घेतला तेवढा ग्राहक भांडारांनी घेतला नाही हे खरे आहे. याचे एक कारण असे की, भांडार चालविण्यापेक्षा कर्जवाटपाचे कार्य तुलनेने सोपे होते. ( आजही ते खरे आहे असे दिसते ! )

सर्वसामान्य नागरिकांची ग्राहक भांडारे मात्र अद्यापि गरजा व प्रश्न लक्षात घेता पुरेशी सुरू झाली नाहीत. जेथे ती सुरू करण्यात आली तेथे ती यशस्वी झालेली नाहीत. काही अपवाद दिसून आले तरी एकंदरीत परिस्थिती गुंतविलेले भांडवल लक्षात घेता संतोषजनक नाही.

### तात्कालिक धोरणे

पारतंत्र्याच्या काळात युद्धासारख्या आणीबाणीच्या काळात सरकारी मदतीने एक सोयीस्कर वाटपाचे साधन म्हणून तात्कालिक दृष्टिकोणातून नागरी भागात सहकारी ग्राहक भांडारे सुरू करण्यात आली होती. ती घाईघाईने स्थापन झाली व आणीबाणी दूर होताच ती खचली व विसर्जितही झाली. त्याचे सोयरसुतक कोणास फारसे वाटले नाही. अर्थात गरज नव्हती असे मात्र नाही. पण प्रस्थापित व्यापार-व्यवहाराची घडी मोडून अथवा त्यातील सधनांचा रोष ओढवून सहकाराला प्रोत्साहन देण्याची पोटतिडीक सरकारला वाटत नव्हती हेही खरे आहे. म्हणून जेथे स्थानिक नेतृत्व सामाजिक, नैतिक ध्येयांनी भारलेले होते तेथे त्यांनी प्रतिसाद मिळवून काही प्रयत्न जारी ठेवले.

या एकूण प्रयत्नामागे नियोजन नव्हते हे स्पष्टपणे जाणवेल. स्वातंत्र्यानंतर विकासाचा एक अपरिहार्य भाग सामाजिक उद्देशांची पूर्ती करण्याचे एक साधन म्हणून सहकारी भांडार स्थापनांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. विदेशातील संघरचनांचा अनुभव आधारभूत धरून येथेही ती योजनेचा एक भाग बनवून ती लगोलग सलग निर्माण करण्यात आली.

पण हे प्रयत्न एवढेच मर्यादित राहिलेले दिसतात. बाकी काळ वाढत गेला तसतसे धोरण स्थिर राहिलेले दिसत नाही.

त्यामुळे पद्धतीत बदल झाला नाही व भांडारांचे भवितव्य सुनिश्चित व सुस्थिर होऊ शकले नाही. आजही याबाबतीत विशेष फरक पडलेला आहे असे म्हणवत नाही. अर्थपुरवठा ( भांडवल, कर्ज, सबसिडी ) सढळपणे मिळाला तरी यशासाठी आवश्यक असलेला व्यवहार त्यांना उपलब्ध नाही. व्यवस्थापन अकार्यक्षम आहे व रचना विस्कळीत राहिलेली आढळते. त्यामुळे सामान्य जनतेला **भारतीय सहकारी भांडारे सरकारी दुकानांपेक्षा भिन्न वाटत नाहीत. दुर्मिळ वस्तू नियंत्रित किंमतीत मिळण्याचे एक ठिकाण असेच त्यांचे चित्र ( इमेज ) समाजापुढे आजही दिसते.** ही काही वांच्छनीय गोष्ट नाही. सहकारी भांडाराची कल्पना एवढीच नाही. आणि त्यांची समाजाला गरज नाही असाही निष्कर्ष यावरून काढणे बरोबर होणार नाही.

सहज अवतीभवती पाहिले **तरी सामान्यांची दैनंदिन गरजांच्या वस्तूंबाबत होणारी पदोपदी होणारी फसवणूक-नाडणूक** दिसेल. किंमत, दर्जा, वजन या सर्वच बाबतीत बहुसंख्य लोक अगतिक असलेले दिसतील. निरनिराळ्या सामाजिक-आर्थिक वर्गातून ते विखुरलेले असल्यामुळे एकसंघ प्रतिकार करणारी ग्राहक संघटनाही ( रेझिस्टन्स मुव्हमेंट ) सर्वव्यापी व सबल अशी उभी राहू शकलेली नाही.

**समन्वयकारी सातत्यशील धोरणाचा अभाव**

अलीकडे तर सहकारी ग्राहक भांडारांचा विषय संपूर्णतः राज्याच्या कक्षेत आणला गेला आहे. त्यामुळे देशभर **एकसूत्री धोरणाची अपेक्षा करणे अवघड होऊन गेले आहे.** जेथे देश ही एक अविभाज्य बाजारपेठ अनेक मूलभूत गरजांच्या वस्तूंबाबत बनलेली आहे, तेथे भारतीय ग्राहकाला सर्वदूर न्याय व शक्ती पुरविणारी ग्राहक चळवळ सुसंघटित अशी उभी राहणे अवघड आहे. खासगी व्यापार-उत्पादकांची पाळेमुळे व साखळी देशभर विखुरलेली आहे. त्याला तोडीस तोड अशी ग्राहक सहकारी संरचना अलग अलग उभी करून कसे चालेल? अलीकडे वारंवार चर्चिल्या जाणाऱ्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये ( पब्लिक डिस्ट्रिब्यूशन सिस्टिम ) सहकारी भांडारांचे काय स्थान राहणार आहे हे सुस्पष्ट नाही. त्यामुळे या क्षेत्राचे भवितव्य अजूनही अस्थिर आहे, असे म्हणणे भाग आहे.

**संरचना बदलली पाहिजे**

सहकारी ग्राहक भांडारांची जी संरचना ( स्ट्रक्चर ) आज अस्तित्वात आहे तिच्याकडेही पुन: एकदा लक्ष देण्याची गरज आहे. किरकोळ व्यापाराचा आकार-प्रकार, विविधता सर्वत्र वाढत असताना छोटी छोटी भांडारे एकाकीपणे चालविण्याऐवजी त्यांचा आकार वाढवून क्षमता वाढविणे अत्यावश्यक झाले आहे. वस्तू, सेवक, निधी या सर्वांत वाढ करण्याची गरज आहे. नागरी भागात या संस्थांचा आकार वाढविल्याखेरीज हे साध्य करणे अवघड आहे. ढोबळ मानाने असे सुचविता येईल की, राज्यपातळीवर द्विस्तर ( टू टायर ) रचना ग्राहक भांडारांची करण्याची गरज आहे. म्हणजे आजची ठोक भांडारे प्राथमिक करून ह्यांची राज्य संघ संस्था ही ठोक भांडार बनविता यावी व त्यांनी राष्ट्रीय संघ संस्थेशी घनिष्ठ पूरक व्यापारिक व्यवहार प्रस्थापित करावेत. प्रसंगी शक्य तर उत्पादन हाती घ्यावे. सर्वव्यापी प्रसिद्धी-प्रवर्तनाचा कार्यक्रम आखावा व खासगी क्षेत्रातील साखळी भांडारांप्रमाणे देशभर सहकारी ग्राहक भांडारांचे समान ' चित्र ' साकारावे. स्वीडनमध्ये हे करण्यात आलेले आहे. ब्रिटनमध्ये त्या दृष्टीने पुनर्रचना सुरू आहे. आपल्या स्थानीय परिस्थितीच्या संदर्भात हा कल जमेस धरावयास हरकत नाही.

थोडक्यात **सहकारी भांडारांना आधुनिक दृष्टी, व्यवस्थापनाचा स्पर्श करून देण्याची गरज आहे. सार्वजनिक क्षेत्राशी** पूरक पण तुल्यबल संरचना उभी करूनच खासगी क्षेत्राकडून ग्राहकाची होणारी नाडणूक-फसवणूक टाळता येऊ शकेल.

**' बायिंग ग्रूप्स 'चे भवितव्य**

अलीकडे ' बायिंग ग्रूप्स ' ( ग्राहक अनौपचारिक गट ) शहराच्या विविध पेठांतून स्थापन होताना दिसत आहेत. त्यांचाही उल्लेख जाता जाता केला पाहिजे. यांचा आकार-प्रकार छोटा आहे. त्यांची संख्या जास्त भासली तरी सांख्यिक स्वरूपाच्या अभावी सातत्याची हमी देता येत नाही. प्रतिक्रिया म्हणून त्याचे स्वागत जरूर होईल. संभवशक्ती त्यांची मूलग्राही नाही. पण येथे सहकारी कार्यवाहीची बीजे आहेत. त्यांना औपचारिक आधुनिक सहकारी भांडारांची संस्थात्मक जोड देणे आवश्यक आहे. एकाकीपणे हे **खरेदीदारांचे गट फार दूर जाऊ शकणार नाहीत. फार काळ तग धरू शकणार नाहीत** जोवर विधायक तळमळीचे नेतृत्व उपलब्ध आहे तोवर ते प्रभावी ठरतीलही, पण ' पद्धत ' म्हणून काही अस्तित्वात यावयाचे असेल तर संस्थात्मक आकार-प्रकार त्यांना देणे अपरिहार्य मानले पाहिजे. ही घडामोड म्हणूनच अनुकूल वातावरणाचा भाग मानून त्यातून सहकारी संघटित ग्राहक क्षेत्र उभे करण्याचा प्रयत्न झाल्यास ती एक उल्लेखनीय प्रगती ठरेल, असा विश्वास वाटतो. अन्यथा त्यांची उपयुक्तता केवळ मर्यादित राहील आणि प्रगती असमतोल होईल.

●●

"प्राध्यापकांची सुधारित वेतनश्रेणी व परीक्षांवरील बहिष्कार" ह्या निमित्ताने

# तीन मुलाखती

**प्रा. सौ. नलिनी तारळेकर** **प्रा. श्रीधर गुप्ते** **प्रा. एस् एस्. काळे**

**भाग १ :**

'अर्थ'च्या वाचकांस वरील प्रश्न व त्यासंबंधीचे विविध दृष्टिकोन समजून घेण्यास मदत व्हावी म्हणून आम्ही तीन विविध अधिकारी व्यक्तींची भेट घेतली. त्या म्हणजे–
१. प्रा. सौ. नलिनी तारळेकर, २. प्रा. श्रीधर गुप्ते, व ३. प्रा. शिवराम श्रीधर काळे.
प्रा. सौ. नलिनीबाई ह्या गेल्या वर्षात प्राध्यापक संघटना बांधण्याच्या त्यांच्या जिद्द व तळमळीने प्रसिद्धीच्या झोतात आल्या आहेत. त्या 'पुक्टो' ह्या संघटनेच्या अध्यक्षा आहेत. धुळे, संगमनेर, अंमळनेर इत्यादी कॉलेजमध्ये काही प्राध्यापकांच्यावर ज्या वेळी अन्याय झाले त्या त्या वेळी त्यांनी त्यांना संघटनेच्या ताकदीने संरक्षण मिळवून दिले. सध्याचा बहिष्कार घडवून आणण्यात त्यांचा प्रमुख वाटा आहे. धुळयाच्या त्यांच्या संघटनेने पुण्यातल्या संघटना तसेच महाराष्ट्रातल्या इतर संघटनांशी संपर्क साधून सार्वत्रिक व संघटित बहिष्कार उभा करण्याचे अघटित काम केले. कोणत्याही खेडगावचा व शहरातला प्राध्यापक आपल्यावर अन्याय झाल्यास कुलगुरू, विद्यापीठ कार्यकारिणी याचप्रमाणे सौ. तारळेकर ह्यांच्याकडे धाव घेतो एवढा विश्वास त्यांनी संपादन केला आहे. बहिष्कार मागे घेणे वा चालू ठेवणे हे निर्णय घेण्यात देखील त्यांचाच वाटा महत्त्वाचा राहील. ह्याचे कारण अप्रस्थापित व शोषित प्राध्यापकांना त्यांचे नेतृत्व हा एक मोठा आधार वाटतो, ही निदान आज तरी स्थिती आहे. प्रा. तारळेकर ह्याही सिनेटवर कलाशाखेवर निवडून आल्या आहेत.
त्यांच्या निवेदनानंतर मुद्दाम इतर दृष्टिकोन देखील समजावून घ्यावे, ह्या दृष्टीने प्रा. गुप्ते व प्रा. काळे ह्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. प्रा. गुप्ते व प्रा. काळे ह्यांचा परिचय त्यांच्या मुलाखतीआधी दिला आहेच.
प्रा. तारळेकर ह्यांची मुलाखत विस्तृत स्वरूपात दिली आहे व पुनरुक्ती टाळण्याकरता इतर दोघांच्या मुलाखतीचा सारांश संक्षेपाने एकत्र गुंफला आहे.

¤

प्राध्यापकांची संघटना बांधताना सामान्यपणे कोणत्या अडचणी येतात ?

प्राध्यापकांची संघटना बांधताना सर्वात प्रथम अडचण भासली ती प्राध्यापक आणि संघटना (club किंवा असोसिएशन या शब्दांचा taboo नव्हता) हे दोन शब्द एकत्रित आणणे विद्यादानाचे पवित्र व उदात्त कार्य करणाऱ्या समाजातील या घटकाला शोभण्यासारखे आहे का ? अशी समाजातील इतर घटकांचीच नव्हे तर खुद्द प्राध्यापकांचीही भावना होती. प्राध्यापकांनी एकत्र यावे ते फक्त शैक्षणिक परिसंवाद चर्चा वगैरेसाठीच ! पण आपल्या आर्थिक, भौतिक मागण्यासाठी एकत्र येणे म्हणजे आपल्या पवित्र कर्तव्याशी प्रतारणा करणे ही भावना ! याबाबतीत प्रथम समाजाचंच नव्हे तर प्राध्यापकांचंच मतपरिवर्तन करणं आवश्यक ठरेल. कोणे एके काळी या गुरुजीला समाज व्यवस्थेत फार मोठं स्थान होतं आणि भारतीय परंपरेचा तो एक मानबिंदू समजला जातो. त्यामुळे प्राध्यापकांची संघटना बांधणं कितपत योग्य ठरेल हा मोठा सवाल ! परंतु याबाबत महाभारताचा पुरावा याच्या उलटच वाटतो. मोठया संपन्न राजाच्या पुत्रांना शिक्षण

देणाऱ्या आचार्यांच्या घरी त्यांच्या मुलासाठी हजारो गाईंच्या खिल्लारातील एखादी गाय देण्याची साधी कल्पनाही त्या बलाढ्य राजाला शिवलेली दिसत नाही! म्हणूनच त्याच्या पत्नीला पिठात पाणी घालून फसवणूक केल्या गेलेल्या पुत्राचा दूध प्याल्याचा आनंद आवंढा गिळून पहायला लागला! बरं, त्यांना त्यांचे विद्यार्थी किती मान देत? राजगुरूंना दरबारात काय स्थान होतं? तर राजघराण्यातील (समाजाच्या खालच्या थराचा विचारच नको) एका स्त्रीचा सत्तांध विद्यार्थी भर दरबारात मानभंग करीत असता श्रेष्ठ मुनिवरांना खाली मान घालून सहन करावे लागे! हे पाहून कोणत्याही शिक्षकाचा आपल्याला सामाजिक स्थान काय आहे. याबाबतीत भ्रमनिरास व्हावा. ही परंपरा आजही चालू असून मंत्री, शासनाधिकारी वगैरे पदे भूषविणाऱ्या विद्यार्थ्यांना भ्रष्टाचारापासून दूर ठेवण्याच्या बाबतीत प्राध्यापक काय करू शकतो याचाही विचार व्हावा. आपल्या श्रेष्ठ स्थानाच्या स्वप्नातून त्यांना जाग आणणं कठीण! उलट, आर्थिक अडचणी, सेवासुरक्षिततेचा अभाव, समाज व संस्थाचालक यांच्याकडून मिळणारी वागणूक, शासनाची उदासीनता आणि विद्यापीठाची निष्क्रियता यांनी गांजलेला प्राध्यापक दुबळ्या, असहाय्य मनोवृत्तीने पछाडलेला. त्यातून त्याला बाहेर आणून त्याच्यात आत्मविश्वास निर्माण करणे व संघटनेद्वारा त्याच्या अडचणींना तोंड फोडणं हे महत्त्वाचं परंतु कठीण काम होतं.

¤

**प्राध्यापकांच्या मागण्या नेमक्या कोणत्या? प्रत्येक मागणीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन द्या.**

प्राध्यापकांच्या मागण्यांचा क्रमवार विचार करू.

(अ) १ जानेवारी १९७३ पासून ७००–१६०० ही केंद्राने मान्य केलेली वेतनश्रेणी लागू करावी. पश्चिम बंगाल, गुजराथ, बिहार, दिल्ली, यु. पी. यांनी लागू केली आहे व तामिळनाडू, पंजाब येथे मान्य होण्याच्या मार्गावर. केरळ, एम. पी., हरियाना, राजस्थान वगैरेंची तीच गत आहे. परंतु सर्वांत पुढारलेले राज्य असा स्वतःचा गौरव करून घेणारे महाराष्ट्र शासन याबाबतीत उलटा विचार करीत आहे. राज्यमंत्री पांडे यांनी U. G. C. स्केल शासनाने मान्य केले आहे असे विधान केले आहे, परंतु ते प्राध्यापकांनी नाकारण्याचं कारण त्याला ज्या अटी जोडल्या आहेत त्यामुळे. हा मुद्दा पुढे स्पष्ट होईल.

(ब) १०–२–३ हा नवा आकृतिबंध अमलात आल्यावर शिक्षकाची कपात अथवा पदावनती होणार नाही, याची स्पष्ट हमी मिळावी. हा आकृतिबंध शैक्षणिकदृष्टचा योग्य असूनही प्राध्यापकांचा त्याला विरोध आहे, असा त्यांच्या विरुद्ध प्रचार. ज्या कोठारी कमिशनच्या शिफारशींवर वरील आकृतिबंध स्वीकारला गेला आहे, त्यामध्ये सध्या उपलब्ध असलेल्या सर्व साधनसंपत्तीचा परिपूर्ण उपयोग करून घेऊनच तो अमलात आणावा अशी शिफारस आहे व त्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांचे काही प्रमाण निश्चित असावे व ते केल्यास शिक्षकांना काढून टाकण्याची गरज पडणार नाही. तो आकृतिबंध तसाच अमलात येणार असेल तर आमचा विरोध नाही पण शिक्षकाच्या हितसंबंधास धोकादायक असे त्यात बदल करून तो राबविण्याच्या प्रयत्नास आमचा तीव्र विरोध राहील.

(क) डेमॉन्स्ट्रेटर्स, टचूटर्स व मेथड मास्टर्स यांना पदोन्नती देऊन लेक्चरर्सचा दर्जा द्यावा. ज्यावेळी पहिली डिग्री हीच शैक्षणिक पात्रता या पदासाठी होती, त्यावेळी हा वर्ग वेगळा ठेवणं योग्य असलं तरी सारख्या शैक्षणिक पात्रतेच्या दोन व्यक्तीत हा भेद कायम ठेवणे संपूर्ण अन्यायाचे आहे. लेक्चररची पात्रता मागायची व स्केल व त्याहीपेक्षा वागवणूक अत्यंत अपमानास्पद द्यायची, याला आमचा विरोध; म्हणून ही तिसरी मागणी.

(ड) ग्रंथपाल व डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन याचेही काम तेवढ्याच योग्यतेचें व जबाबदारीचें. त्यांच्या बाबतीत लौकर निर्णय होऊ नये ही खेदाची गोष्ट आहे. त्यांनाही लेक्चररचा दर्जा द्यावा.

(ई) सेवासुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यापीठाच्या नियमात तरतूद व्हावी. यासाठी प्रत्येक विद्यापीठात Statues होऊन ते काम पुरे व्हायला वेळ लागणार आहे. दरम्यान शासनाचं परिपत्रक आले तरीही न जुमानणाऱ्या संस्था असल्यास यंदा प्रत्येक विद्यापीठात १५० च्यावर प्राध्यापकांना सेवामुक्तीच्या नोटिसा मिळाल्या आहेत. एका संस्थेने तर (पुणे विद्यापीठ कक्षेतील) ६९ प्राध्यापकांना मुक्त केल्याची आमची माहिती आहे. याचाच दुसरा प्रकार दरवर्षी नोटीस देऊन दरवर्षी नव्याने लावून त्यांना वर्षानुवर्षे Temporary ठेवणे आणि त्याहीपेक्षा चाणाक्ष चालक असतील तर एक–दोन दिवसांचा 'ब्रेक' देऊन ती नोकरी 'तात्पुरती' करायची. याला आळा हा बसलाच पाहिजे. व २ वर्षांचा उमेदवारीचा काळ (Probation) संपल्यावर प्राध्यापक कायम व्हावा ही मागणी. वर्षात चुकार माणसाला त्याच्या नोकरीच्या काळात प्रथम तोंडी नंतर लेखी समज द्यायला हवी. बाजू मांडण्याची योग्य संधी द्यावी आणि सबळ तक्रार असल्या-

खेरीज काढण्यात येऊ नये म्हणून या सर्व नोटिसा मागे घेण्याबद्दल सरकारने कारवाई करावी.

(फ) कायम सेवा स्थगिती कायद्यामुळे शेकडो प्राध्यापकांचे नुकसान शासनाने केले आहे, तर अनेकांना गेल्या वर्षीच नोकरीस मुकावे लागले. हा कायदा आता १२ फे. पासून मागे घेण्यात आला आहे. पण त्याला retrospective effect नसल्याने प्राध्यापक १२ फे. १९७५ पासून कायम धरले जातील. परंतु आमची मागणी ही की, हा कायदा नसता तर जे प्राध्यापक ज्या तारखेपासून कायम झाले असते त्या तारखेपासून ते कायम समजून त्या सर्व सवलती त्यांना मिळाव्या.

(ज) परीक्षेच्या कामाचा मेहनताना वेळेवर मिळावा ही मागणी चमत्कारिक वाटली तर वर्ष दीड वर्ष लोकांना ती मिळत नाही, या चिडीतून ती निर्माण झाली आहे व त्याबद्दल विद्यापीठ मख्खपणे उदासीन राहते म्हणून. S. S. C. Board मध्ये अशी परिस्थिती आली त्यावेळी निदान त्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून लौकर पैसे पाठविण्याबद्दल बोर्ड प्रयत्नशील राहील असे संबंधितांना कळविण्याचा शिष्टाचार तरी त्यांनी पाळला होता.

या सर्व मागण्यांसाठी निषेध दिन, लाक्षणिक हरताळ, मूक व घोषणा मोर्चे ( विधानसभा, संसद यांवर ) इत्यादी प्रत्यक्ष कृतींचा अवलंब थकल्यावर निर्वाणीचा मार्ग म्हणून बहिष्काराचे पाऊल.

ट्रेझरीमधून आमचा पगार मिळावा या मागणीबद्दल कोणतीही चर्चा करण्याचं कारण नाही. कारण, आहे तोच पगार वेळेवर व पूर्णपणे फार मोठ्या प्रमाणात अनेक ठिकाणी होत नाही व अनेक ठिकाणी त्यात भ्रष्टाचारही आहे. म्हणून त्याची निकड वाटते. ¤

संघटनेने सुधारित वेतनश्रेणी कोणत्या कारणांसाठी मागितली आहे ?

शिक्षकांच्या वेतनश्रेणी १९६६ साली सुधारित केल्यानंतर तब्बल नऊ वर्षांनी हा प्रश्न विचाराधीन आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाचे (U. G. C.) म्हणणे आहे की दर पाच वर्षांनी राहणीमानाच्या निर्देशांकाप्रमाणे वेतनश्रेणीत वाढ करावी. म्हणजे १९७१ साली ती व्हावयास हवी होती. आणि केंद्राने १९७३ ला ती मान्य करूनही ७५ साली प्राध्यापकांना त्यासाठी लढा द्यावा लागत आहे, हे शासनास खासच शोभनीय नाही. म्हणून नऊ वर्षांनी सुधारल्या जाणाऱ्या वेतनश्रेणीत प्रत्येक प्राध्यापकास कमीत कमी रु. १५० चा फायदा मिळून ती अंमलात यावी ही मागणी आहे. समाजातील इतर घटकांकडे पहाण्याचा सल्ला प्राध्यापकांना दिला जातो. त्यासाठी पुढील माहिती उपयुक्त ठरेल.

L. I. C. मधील रेकॉर्डक्लार्कला एकूण पगार सुरुवातीला रु. ४५० व जास्तीत जास्त रु. १११५ मिळतो, तर असिस्टंट व स्टेनो यांना अनुक्रमे ५२२ ते १६४५ आणि रु. ६१७ ते १७६७ मासिक पगार. उच्चश्रेणीतील असिस्टंट व अधिक्षक यांना तर रु. ७६६ ते २०५१ आणि रु. १०५९ ते २३०९ पर्यंत वेतन मिळते ! (आणि या सर्व वेतनश्रेणींसाठी शैक्षणिक पात्रता काय तर मॅट्रिक किंवा S. S. C. ! ) सी. सी. ए., घरभाडे, महागाईभत्ता (१७%) वगैरे यात आहे. शिवाय मूळ वेतनाच्या १५% बोनस !

राष्ट्रीयकृत बँकात कारकूनास सुरुवातीस रु. ५९३ व दहा वर्षांनी रु. ११०० वेतन तर नव्या अधिकाऱ्यास सुरुवातीस रु. ११९४ व दहा वर्षांनी रु. १६०० वेतन मिळते. या शिवाय बोनस, आजारीपणाची रजा व खर्च, रजेचे पैशात रूपांतर, थंड हवेच्या ठिकाणची निवास सोय, घरबांधणीस कर्ज (४% व्याजाने), ठेवीवर जादा व्याज इ. अनेक फायदे व सवलती आहेतच ! अशाच अनेक सोयी व सवलती बेस्टमधील कर्मचाऱ्यांनाही मिळतात !

या उलट डेमॉन्स्ट्रेटरला वेतनश्रेणीच्या टोकाला सध्या जास्तीत जास्त रु. ७९३ तर प्राध्यापकाला (लेक्चरर) रु. ११०० मिळतात. त्यांना इतर कोणत्यही सोयी, सवलती नाहीतच. पण शैक्षणिक पात्रता मात्र पदव्युत्तर पदवी (M. A., M. Sc. वगैरे) किमान द्वितीय श्रेणीत मिळवलेली असावी लागते ! उद्योगधंद्यातील – विशेषतः परकियांशी बांधून घेतलेल्या तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांपेक्षाही या सुशिक्षितांचे वेतनमान कमी आहे ! प्राध्यापकांच्या शैक्षणिक पात्रतेचीच माणसे इतरत्र सुरुवातीस रु. ९०० ते रु. ३००० वेतन घेतात ! म्हणूनच या क्षेत्रातून ' brain drain 'ला उत्तेजन मिळते व उत्तम गुणवत्तेची माणसे खेचण्यास हे क्षेत्र असमर्थ होत आहे. ¤

शासनाची त्या संबंधातील भूमिका कोणती आहे ?

शासनाची भूमिका बोलण्यात अत्यंत समंजस, महानुभूतीची व कृतीत कमालीची उदासीन आणि कायदेशीर. आमची प्रत्येक मागणी दीर्घकालीन, न्याय्य व समंजसपणाची हे सर्वांना एकदम मान्य. पण ह्या मागण्या मान्य करण्यात अनेक शासकीय, आर्थिक, तांत्रिक अडचणींचा बागुलबुवा. परीक्षांवरील बहिष्कार मागे सरावा याबद्दल कमालीची आस्था !

पण त्याबाबत प्राध्यापकांनीच आपल्या सामाजिक व शैक्षणिक जबाबदारीची जाणीव ठेवून हट्ट करू नये अशी साधारणपणे भूमिका !

¤

### शासन कोणता मार्ग काढील असे वाटते ?

वेतनश्रेणीत वेगळीच वेतनश्रेणी गळी उतरविण्याचा प्रयत्न ज्या पगार व दर्जातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेबद्दल आमचा तीव्र आक्षेप तोच पुन्हा आमच्यावर लादला जात आहे व सलग वेतनश्रेणी की ज्यामुळे प्राध्यापकातील भेद नष्ट होऊन एकजिनसी वर्ग निर्माण होऊ नये अशी खबरदारी U. G. C. पात्रता असलेल्यासाठी 480–40–1000–50–1200–60–1500 (D P. min. 214 max. 100/–), विद्यापीठमान्य पात्रता असलेल्यांसाठी ४३०–५० ७५०–५०–११०० +D. A ही अर्हता नसलेल्यांसाठी ३००–६०० चे. शिवाय डेमॉन्सट्रेटर्सची वेगळी ग्रेड. अशा ग्रेडस–प्राध्यापकांशी बोलणी करताना लावण्यात आजच (४–४–७५) झालेल्या शिक्षणमंत्र्यांच्या निवेदनात U. G. C. अर्हता असलेल्यांना U. G. C. ग्रेड देण्यात आल्याच्या घोषणेने आमचे बिलकुल समाधान झालेले नाही. कारण सुधारित वेतनश्रेणी लावताना त्या क्षेत्रात अनेक वर्षे काम करीत असलेल्यांना सुधारित शैक्षणिक पात्रता लावणे योग्य नाही. Revision of Scale होत असताना ती revision पात्रतेची नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे. सेन कमिटीच्या रिपोर्टात ती पात्रता Seleclion साठी ठेवली आहे ती त्या नवीनच क्षेत्रात येणाऱ्यांना लागू करता येईल, जुन्यासाठी बिलकुल नाही, हा प्रा. संघटनेचा दृष्टिकोण स्पष्टपणे शिक्षणमंत्र्यांपुढे मांडण्यात आला असल्याने या निवेदनामुळे आमच्या भूमिकेत बदल करण्याचे काहीही कारण नाहीं. आता इतर मागण्यांबद्दल त्या काय म्हणाल्या हे पूर्ण कळल्यावरच त्यावर बोलता येईल. शासनाने हा मार्ग वाटाघाटीत मांडला त्यावेळी तो फेटाळण्यात आला होता.

¤

### त्यातल्या त्यात कोणत्या मागण्या मान्य कराव्या ?

ज्यासाठी बहिष्कार घालावा लागला त्या सर्व मागण्या इतर मागण्यांपेक्षा निकडीच्या म्हणूनच त्यांचा निर्देश केला आहे. त्यामुळे या सर्व मागण्या एकत्रित मांडल्या आहेत व कोणतीही एक मागणी अलग करून तडजोड मान्य करण्यात येणार नाही.

¤

### मागण्या मान्य करण्यात कोणत्या अडचणी आहेत ? किती आर्थिक बोजा वाढेल ?

या मागण्या मान्य करण्यास सरकारपुढे एकच अडचण, ती म्हणजे समाजातील आजपर्यंत असंघटित असलेल्या या वर्गाच्या मागण्या कशा स्वीकाराव्या ? कारण ३ कोट रुपयांचा आर्थिक बोजा पडणार आहे असे सांगून जनतेत घबराट निर्माण करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. एक तर सर्वांनाच ३०० वरून ७०० वर न्यायचे नाही. काहीजण त्याहीपुढे गेले आहेत. शिवाय हे ३ कोट ५ वर्षात लागणार आणि त्यांतील ८०% केंद्र देणार. मग स्टेटवर २० टक्केच बोजा. ६० लाख रुपयेच ५ वर्षांत महाराष्ट्र शासनाला खर्च करावे लागणार. म्हणजे वर्षाकाठी फक्त १२॥ लाख रुपये जवळजवळ १५००० प्राध्यापकांवर शासन खर्च करणार. पंतप्रधान पुण्यात फक्त पदवी घेण्यासाठी येऊन गेल्या तेव्हा लाखावारी खर्च बंदोबस्तासाठी-व्यवस्थेसाठी करणाऱ्यांनी कार्यरत committed शिक्षकांवर हा खर्च करण्यासाठी खळखळ करावी, ही खेदाची गोष्ट आहे. १०।१० वर्षे प्रा. टेंपररी राहतात याबद्दल शासनाला सहानुभूती आहे. हा गंभीर प्रकार आहे. हे थांबले पाहिजे. त्यांना आहे तो पगार पूर्ण वेळेवर मिळावा याबद्दलही त्यांना कळकळ आहे. पण हे तत्त्वत: सुद्धा मान्य करण्याची तयारी नाही. एका वटहुकुमाने कायमस्थगिती कायदा अमलात आणताना विद्यापीठाच्या स्वायत्ततेचा विचार न करणाऱ्या (ती गोष्ट संस्थाचालकांच्या हिताची असल्याने व बहुसंख्य चालक कोण आहेत हे लक्षात घेऊन) शासनाला प्राध्यापकांना बेगुमानपणे कारण नसताना काढू नये, Probation नंतर कायम करावे असा आदेश द्यायला मात्र स्वायत्तता आड येते. प्राध्यापकांना काढताना कामाबद्दल तक्रार नसताही जात, धर्म, भाषा, खाण्याच्या सवयी, चालकांना नमस्कार न करणे अशा कारणासाठीही बडतर्फी झाल्यास शासन काहीही करण्यास असमर्थ आहे. एका temple charitable trust च्या कॉलेज–चालकांना एका पार्टीत मासे खाल्ल्याबद्दल नोकरीवरून दूर केल्याचे उदाहरणही मुंबईच्या फेडरेशनच्या सभेमध्ये Aifucto चे कार्यवाह कुमरेश चक्रवर्ती यांनी दिले.

¤

### उभयपक्षी कोणती भूमिका घ्यावी ?

हा पेचप्रसंग संपवण्याचा एकच मार्ग म्हणजे बहिष्कारासाठी दिलेल्या सर्व मागण्या केल्याबद्दल शासनाचा कोणत्याही प्रकारचा विरोध नाही. त्या मान्य करणे यामुळे शासन–समा-

जातील या महत्वाच्या घटकाबद्दल जागृत आहे व शिक्षकाला योग्य तो मान द्यायला तयार आहे, हे सिद्ध होईल. शिक्षक प्रा. रस्त्यावर येणे हे कोणत्याही शासनाला भूषणावह नाही. यामुळे सौहार्द निर्माण होईल, व शिक्षक—समाज शिक्षक—शासन, शिक्षण—विद्यार्थी या सर्वांमध्ये विद्यार्थी यास जितका कमी वेळ लागेल तितके कटुत्व कमी.

¤

चळवळीचे ह्यापुढचे स्वरूप कसे राहील ?

प्रा. आता जागा झाला आहे व संघटित झाला आहे. अत्यंत लहान गावातील लहान महाविद्यालयाचे मूठभर प्राध्यापकही लढाई जिंकून टेबलावर ती हरणाऱ्या राष्ट्र-नेत्याप्रमाणे न वागण्याचा इषारा नेत्यांना देत आहेत व नेतृत्वाने दिलेल्या हाकेला सर्व पणाला लावून साथ देण्याचा निर्वाळाही देत आहेत. म्हणून धरणे, मोर्चा, सत्याग्रह या मार्गांचा वेळ पडल्यास अवलंब केला जाईल. सत्याग्रहींची नोंद करण्याचे काम मुंबईत सुरूच झाले आहे.

¤

चळवळीला विद्यार्थी व समाज ह्यांच्याकडून पाठिंबा मिळेल काय ?

या लढाऊ भूमिकेचे विद्यार्थ्यांनी सुप्त स्वागतच केले आहे. कारण वरिष्ठांच्या लाथा खाणाऱ्या, अन्याय गिळणाऱ्या शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांना अभिमान–प्रेम कसे वाटणार ? अन्यायाविरोधी आवाज उठवून स्वाभिमानाने लढा देण्यास उद्युक्त झालेल्या प्राध्यापकांना त्यांचा पाठिंबा निश्चित आहे. ' It is heartening to note that teachers have stood in protest against the antiteacher policies of the Govt....It is only the beginning of the struggle...' असे सांगून solidarity of students support आहे अशी अनेक पत्रे आम्हाला येऊ लागली आहेत. या लढ्याने विद्यार्थी व शिक्षक हे जास्त जवळ आले आहेत. याचा अर्थ असा नव्हे की, शिक्षकांनी चिथावणी दिली. पण तरुण रक्ताला ही लढाऊ भूमिका मान्य असल्याने आपणहून त्यांनी ही भूमिका घेतली.

रणशिंग फुंकलेले आहे—लढा सुरू आहे—यशापयश ताकदीवर; ...परंतु यामुळे प्राध्यापक जातपात–धर्म, स्थानिक अभिमान—शहरी–ग्रामीण हे सर्व भेदभाव विसरून एकमेकांच्या समस्या समजून घेण्यासाठी व एकजुटीने त्या सोडविण्यासाठी एकत्रित आला. हा फार मोठा फायदा असा आहे की, त्याची तुलना इतर कोणत्याही फायद्याशी होऊ शकणार नाही. प्राध्यापकही आपले स्वप्नातील स्थान विसरून आपणही एक वेगळ्या क्षेत्रा-तील पण वेगळ्या प्रकारचे काम करणारा आहे, त्याबाबत अन्य कांही कल्पना बाळगायचे कारण नाही, याची जाणीव नवीन प्राध्यापकांना निश्चित झालेली आहे. जुन्या पिढीतील जुन्या कल्पना उराशी बाळगून बसणारे प्राध्यापक या नव्या प्रवाहाशी समरस होऊ न शकल्याने आपोआप बाजूस पडून, काळाची गरज ओळखून समाजाच्या केवळ सहानुभूतीवर अवलंबून न राहता, आपल्या बळावर, स्वाभिमानाने आपले स्थान मिळवू इच्छिणारे नवे नेतृत्व यातून उदयाला येत आहे. याचाच परिणाम म्हणून सर्वांगीण समाजजीवनापासून अलग पडलेला हा घटक नव्या जाणीवेने समाजजीवनाशी समरस होऊन सामाजिक, शासकीय, वगैरे अन्यायांविरुद्ध उभे राहा-णाऱ्या सर्व घटकांबरोबर आघाडीस राहील, असे चित्र निर्माण होण्याची शक्यता या लढ्यामध्ये झाली आहे. आम्ही धुळ्याला काढलेल्या पहिल्या मोर्चाला सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना, I. T. I. च्या कर्मचारी संघटना वगैरेंचाही पाठिंबा मिळविला होता व त्यांनाही आम्ही दिलेला आहे. या सर्व घटनांचे स्वागतच होईल.

शिक्षकांच्या लढ्याने आपल्या शैक्षणिक क्षेत्राचे सत्यस्वरूप उघडे केले आहे. (प्रगतीचा वेग भयानक आहे. हिंदुस्थानची लोकसंख्या १९५१ मध्ये ३६१ दशलक्ष; १९७१ मध्ये ५५४ दशलक्ष आणि याच वर्षी Census Commissioner च्या रिपोर्टप्रमाणे निरक्षरांची संख्या ३८१ दशलक्ष आहे म्हणजे २५ वर्षांच्या रौप्यमहोत्सवाच्या काळात ५१ सालची सर्व लोकसंख्या निरक्षरांत रूपांतर करण्यात आपण यशस्वी झालो आहोत.) primary education कडे दुर्लक्ष होऊन हायस्कूल व कॉलेज हे राजकीय प्रतिष्ठेसाठी काढून प्राध्यापकांची दुर्दशा करण्यातच पुढाऱ्यांनी यश मिळविले आहे.

¤

## भाग २

पुक्टोच्या अध्यक्ष प्रा. सौ. नलिनी तारळेकरांबरोबरच इतर संघटनांचे प्रतिनिधी म्हणून आम्ही प्रा. गुप्ते व प्रा. एस्. एस्. काळे ह्यांची भेट घेतली. प्रा. गुप्ते हे पुणे विद्यापीठात भूगोल विषयाचे अध्यापन करतात. डॉक्टरेटसाठी त्यांनी 'गोव्याच्या आर्थिक भूगोलावर' प्रबंध सादर केला

आहे. पुणे विद्यापीठातील टीचर्स फोरमचे ते एक कार्यकर्ते असून विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षण मतदारसंघातून सिनेटवर शास्त्रशाखेचे प्रतिनिधी म्हणून नुकतेच निवडून आले आहेत.'

प्रा. शिवराम काळे हे पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र वाणिज्य कॉलेजचे एक ज्येष्ठ प्रा. आहेत. पुटा (पुना युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन) च्या संस्थापनेपासून तिच्या संवर्धनापर्यंत त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्रातील उच्चशिक्षणाच्या वित्तीय प्रश्नांचा त्यांनी विशेष अभ्यास केला आहे. एन. सी. सी., वाणिज्य अध्यापन इत्यादींवर सल्ला घेण्याकरता शासनाने त्यांची विविध समित्यांवर नेमणूक केली आहे. नुकत्याच झालेल्या पुणे विद्यापीठाच्या सिनेटच्या निवडणुकीत ते वाणिज्य शाखेचे प्रतिनिधी म्हणून निवडून आले आहेत. प्रा. गुप्ते व प्रा. काळे ह्यांच्या प्रतिक्रिया आम्ही एकत्र गुंफल्या आहेत. प्राध्यापकांच्या वेतनश्रेणी व बहिष्कार ह्यासंबंधी प्रश्न समजावून घेण्यास ह्या तिन्ही अधिकारी व्यक्तींची भाष्ये उपयुक्त होतील.'

¤

**प्राध्यापकांची संघटना बांधताना सामान्यपणे कोणत्या अडचणी येतात ?**

प्रा. गुप्ते–प्राध्यापक हा उत्पन्न व सेवाप्रकाराच्या दृष्टीने मध्यमवर्गीयात मोडतो. संघटना बांधण्यास नाखूष. बहुविध विचारसरणींच्या अभ्यासामुळे व स्वतंत्र चिकित्सक वृत्तीमुळे व्यक्तित्ववादी, संघटनकार्याबद्दल साशंक, अनुत्सुक नैतिक मूल्ये, प्रतिष्ठा ह्यांना जास्त जपतो; रस्त्यावर येणे, संघटना बांधणे त्याला कमीपणाचे वाटते त्यामुळे समाज व शासन ह्यांना तो निरुपद्रवी वाटल्यास नवल नाही.

प्रा. काळे– प्राध्यापक आत्मसंतुष्ट, आत्मकेंद्रीत दुसऱ्याच्या मताविषयी तुच्छता दाखविणारा, दुसऱ्याला समजून घेण्याची तयारी नसलेला असा असतो. त्याला सामाजिक जबाबदारीची जाणीव कमी. एकंदर अध्यापनकार्यात सामाजिक ऋण ठेवून ध्येयवादाने काम करण्याचा अभाव. संघटना बांधताना त्यामुळे त्रास होतोच. पण संघटनेचे कार्य सुरळीतपणे व एकसूत्रीपणाने चालण्यातही आत्यंतिक वैयक्तिकतेची अडचण येते.

¤

**प्राध्यापकांच्या मागण्या नेमक्या कोणत्या ?**

प्रा. गुप्ते व प्रा. काळे– १. सेवा-सुरक्षितता २. विद्यापीठ अनुदान मंडळाने शिफारस केलेली वेतनश्रेणी लागू करणे. ३. ट्रेझरीमार्फत पगार वाटप ४. डेमोन्स्ट्रेटर्संना पदोन्नती. ५. पेन्शन, प्रा. फंड इ. योजना ६. परीक्षेच्या कामाचे वेतन लवकर मिळावे इत्यादी.

¤


## वर्गणी : जाहिरात दरपत्रक

अर्थ मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३०/–

किरकोळ अंक रु. ३/–

| जाहिरात दर– | | |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ २ | ३५० रु. |
| | मलपृष्ठ १ | ३०० रु. |
| | मलपृष्ठ २ | ४०० रु. |
| | आतील पान | २०० रु. |
| | ,, अर्धे पान | १२५ रु. |
| | ,, पाव पान | ७५ रु. |

वर्गणी चेक किंवा मनीऑर्डरने पाठवावी.

बाहेरच्या चेकला १ रु. वटणावळ अधिक.

ह्या सर्व मागण्या शासनाने मान्य केल्या आहेत का ?

**प्रा. गुप्ते व प्रा. काळे**— होय. ढोबळपणे ह्या बहुतेक मान्य झाल्या आहेत. ◘

त्यातल्या त्यात कोणत्या मागण्यांना तूर्तास प्राधान्य द्यावे

**प्रा. गुप्ते**— सेवासुरक्षितता ही फार महत्त्वाची. प्राध्यापकाची विद्याव्यासंग, संशोधन व अध्यापन ह्या कार्याला हे फार आवश्यक आहे. दुसरे म्हणजे वेतनश्रेणी. उ. प्रदेश, बंगाल, गुजराथ इ. राज्यांनी ती मान्य केल्यावर महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याने हे का करू नये ? तसेच नव्या वेतनश्रेणीचा ८० टक्के बोजा केंद्र सरकार उचलत आहे. तेव्हा राज्याला त्याची विशेष अडचण नसली पाहिजे. तिसरे म्हणजे प्राध्यापकाचे वेतन त्याला वेळच्यावेळी व काही ठिकाणी पूर्ण मिळत नाही. त्यास सरकारी नियंत्रणाने संरक्षण मिळावे. सरकारची मदत तो आपण होऊन मागतो यातच सर्व काही आले.

**प्रा. काळे**— संघटनेच्या मागण्या बहुतांशी मान्य झाल्या आहेत. किमान सुमारे ९५ टक्के लोकांना सुधारित वेतनश्रेणीचा फायदा मिळणार आहे. त्यात ज्यांना तूर्तास गुणवत्ता व पात्रता नाही. अशांनाही सुधारणा करण्यास संधी दिली आहे. गुणवत्तेचा आग्रह धरणे अध्यापनकार्यात अटळ आहे. संघटनेने देखील हे समजून घेतले पाहिजे. आता पगारातील गैरप्रकाराबद्दल स्वत: प्राध्यापकच खंबीरपणे अन्यायाविरुद्ध उभे राहत नाहीत, आवाज उठवत नाहीत, अन्यायास—शोषणास मूक संमती देतात, त्यांच्या बाजूने कोणी झगडण्यासाठी पुढे आले तर त्यांनाच तोंडघशी पाडतात. सेवासुरक्षिततेबाबत प्रा. काळे ह्यांचे मत आहे की, संघटनेने आपल्या घटकांवर नियंत्रण ठेवून त्यांची गुणवत्ता, पात्रता, कार्यक्षमता व व्यासंगवाढीस अनुकूल भूमिका घेतली पाहिजे. हेच संघटनेचे विधायक कार्य महत्त्वाचे. ट्रेझरीमार्फत पगार देण्याच्या बाबतीत अनेक तांत्रिक स्वरूपाच्या अडचणी आहेत. ◘

शासनाने प्राध्यापकांचा प्रश्न सोडवितांना आतापावेतो कशा प्रकारे भूमिका घेतली ?

**प्रा. गुप्ते**— परीक्षा बहिष्काराचे निर्वाणीचे शस्त्र हाती घेईस्तवर शासनाने ह्याबाबतीत केलेल्या अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळे, धरणे, मोर्चा, निवेदने इत्यादींचा गांभीर्याने विचार केला नाही किंवा चालढकल केली. या विलंबास शासनातील नोकरशाहीच जबाबदार असावी, असे काही प्राध्यापकांचे मत झालेले आहे. शिक्षणाचा प्रसार करणे व उच्च दर्जा राखणे ह्यास वचनबद्ध झालेले शासन याबाबत दिरंगाई करील असे वाटत नव्हते. असो. पण उशिरा का होईना, शासनाने ह्या प्रश्नाबाबतीत आता तरी ताठर भूमिका सोडली आहे असे वाटते.

**प्रा. काळे**— प्राध्यापकांनी बहिष्कार इ. मार्गाचा अवलंब करणे किंवा त्यांना तसे भाग पडणे ह्यालाच मूलभूत विरोध आहे. खरे म्हणजे, महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठाला स्वायत्तता आहे. विद्यापीठाच्या कुलगुरूंनी हा प्रश्न स्वत:च्या निर्णायक शक्तींनी तसेच शासनाशी संवाद करून सोडवून घेणे आवश्यक होते. ट्रेझरीमार्फत पगार इ. मागण्या करून बुद्धिवंत व विद्यापीठे त्यांचे स्वातंत्र्य गमावतील अशी भीती वाटते. ◘

ह्या प्रश्न सोडविण्यासाठी उभयपक्षी कोणता निर्णय आर्थिक-सामाजिक हिताचा व सुखाचा होईल ?

**प्रा. गुप्ते**— शासनाने ह्याबाबतीत प्राध्यापकांच्या महाराष्ट्रव्यापी संघटनेच्या कृतिसमितीशी कोणताही आकस न ठेवता वाटाघाटी करून हा प्रश्न सोडवावा. तसेच प्राध्यापकांच्या मागण्यांपाठीमागचे तत्त्व लक्षात घेऊन त्यांना जास्तीत जास्त न्याय मिळवून द्यावा.

**प्रा. काळे**— शासनाने मागण्या मान्य केल्या आहेत. आता प्राध्यापकांनी बहिष्कार मागे घ्यावा. विशेषत: असे प्रश्न पुन्हा उद्‌भवले तर सोडविण्यासाठी एखाद्या कायमच्या स्वरूपाच्या मंडळाची रचना करावी. त्यात प्राध्यापकप्रति-निधींचा समावेश जरूर असला पाहिजे. ◘

शासनाने दिलेला निर्णय कृतिसमितीने मान्य न केल्यास चळवळीचे काय होईल ?

**प्रा. गुप्ते**— संघटनसामर्थ्यावर व विधायक शक्तीला अनिष्ट वळण लागू नये एवढीच इच्छा. हा संघर्ष चिघळू नये अशी माझी वैयक्तिक इच्छा आहे. कोणत्याही हाडाच्या प्राध्यापकाला, विद्यार्थी व समाज ह्यांच्या प्रेमाला पारखे होऊन, वैयक्तिक स्वार्थ साधण्याकरिता, चळवळ चालू ठेवणे, फारसे रुचणार नाही.

**प्रा. काळे**— कृतिसमितीने चळवळ चालू ठेवण्याचा दुर्दैवी निर्णय घेतल्यास ती अयशस्वी होईल. बरेच प्राध्यापक वैयक्तिक पातळीवर व छोट्या समूहाद्वारा बहिष्कार मागे घ्यावा अशा मताचे आहेत. वेतनश्रेणी ही प्रमुख मागणी मान्य झाली आहे, तेव्हा इतर तपशीलाकरता वाटाघाटींचे दरवाजे खुले असताही चळवळ चालू ठेवणे आततायीपणाचे होईल. ◘ ◘

श्रमिक

# महागाईने हैराण झालेला कामगार

एल. चंद्रकांत

**कामगार शिक्षण योजनेच्या अंतर्गत प्रादेशिक शिक्षण केन्द्र पुणे या ठिकाणी सुरू असलेल्या ४३ व्या कामगार शिक्षक अभ्यास क्रमासाठी निवडलेल्या कामगार प्रतिनिधींशी कौटुंबिक अंदाजपत्रक व सध्याची वाढती महागाई या विषयावर अर्थचे संपादक व श्री. इ. डी. लोहबरे, शिक्षणाधिकारी, कामगार शिक्षण केन्द्र पुणे, यांनी घडवून आणलेल्या चर्चेचा वृत्तान्त या लेखाद्वारे वाचकासमोर ठेवीत आहोत.**

ही चर्चा घडवून आणण्यापूर्वी कामगार प्रतिनिधींना दोन दिवस आधी एक प्रश्नावली दिली होती. त्यात जमा व खर्च या दोन्ही बाजूसंबंधीत प्रश्न दिले होते. कामगारांच्या गरजा लक्षात घेऊन त्या बाबतीत अधिक तपशीलवार माहिती मागितली होती. तपशीलामध्ये पुढील प्रमुख बाबी होत्या– अन्नधान्य, भाजीपाला, दूध, घरभाडे, आरोग्य, वाहतूक व इतर काही विशेष खर्च व बचत इत्यादी. तसेच कामगारांचे इतर महत्त्वाचे प्रश्न.

चर्चेत खालील कामगारांनी भाग घेतला–

इंडियन केबल्स हडपसरचे सर्वश्री रेणाविकर व काझी, ५१२ आर्मी बेस वर्कशॉपचे श्री. के. डी. कारंजकर, ॲम्युनिशन फॅक्टरी खडकीचे श्री. जी. पी. कनाडिया, चीफ इन्स्पेक्टोरेट ऑफ व्हेइकल्सचे श्री. डी. एल्. खांडेकर, दक्षिण मध्य रेल्वेचे श्री. टी. डी. कोळेकर, मिलिटरी इंजिनीयरिंग सर्व्हिसेसचे सर्वश्री इस्माईल अलाबक्ष, एस्. व्ही. ओव्हल, बी. जी. निम्हण, व्ही. वाय. प्रभुणे, बी. आर. डी. चे श्री. डी. जी. जोगळेकर, श्री. सी. एम. बीरकर, सेंट्रल रेल्वेचे सर्वश्री पेसाडेली, आर. एम. देशमुख, एम. आर. ओक, डी. एस. गांधी, भारत फोर्ज कंपनीचे मोहन पाटील, कवडे साठे बिस्कीट कंपनीचे एस. जे. सरडे, पुणे बस वाहतूकचे ए. टी. जगताप, हिंदुस्थान ॲंटिबॉयोटीकचे एम. एल. तायडे आणि बनाज इंजिनीयरिंगचे करमरकर ह्या कामगार प्रतिनिधींनी चर्चेत भाग घेतला. हे सर्व कामगार वयाने २५ ते ४५ वयाचे असून बहुतेक सर्व लग्न झालेले, आपल्या कुटुंबातील कर्ते व जबाबदार गृहस्थ आहेत. प्रत्येकाची नोकरीत किमान ५ ते १८ वर्षे पूर्ण झाली आहेत. ही मंडळी संघटनेत व अनेक संस्थेत कार्य करणारी आहेत.

वरील सर्व कामगारांचे उत्पन्न बघितले तेव्हा निम्म्या कामगारांचा पगार १५० रुपये ते ४०० रुपयांपर्यंत होता. तर निम्म्या कामगारांचा पगार ४०० रुपये ते ६०० रुपयांपर्यंत होता. पगारात ओव्हर टाईमचा समावेश होता.

## रोटी, कपडा और मकान !!!

सुरुवातीला जीवनावश्यक किंवा अत्यावश्यक खर्चाबाबत चर्चा झाली. चर्चेचा सूर एकच होता की, आज केवळ अत्यावश्यक गरजा–अन्न, वस्त्र व निवारा या पूर्णपणे व व्यवस्थितपणे पूर्ण होऊ शकत नाही. कामगारांचा ८० ते ८५ टक्के खर्च यावरच खर्च होतो. कंट्रोलचे मिळणारे धान्य अपुरे पडत असल्यामुळे खुल्या बाजारातून किंवा काळ्या बाजारातून धान्य घ्यावे लागते व त्यामुळे अधिक पैसा खर्च होतो. गहू व ज्वारीऐवजी अरगट बाजरी म्हणूनच खावी लागते. मुलांसाठी तांदूळ काळ्या बाजारातून सरासरी दर महिन्याला ५ ते १० किलो घ्यावा लागतो. त्यामुळे इतर खर्चात अर्थातच कपात करावी लागते.

कपड्याच्या बाबतीत बोलायचे झाले तर पूर्वी सणासुदीच्या वेळेस घरातील सर्वांना नवीन कपडे करत असत. वर्षातून ३–४ वेळा नवीन कपडे करून सण साजरा होत असे. स्त्रियांनाही

तिळसंक्रात, हरतालिका, वटपौर्णिमा, दिवाळी, दसरा, होळी वगैरे सणांना नवीन कपडे हमखास घेतले जात. आता नवीन साडी–पातळ घ्यायचेच तर ते सणाच्या वेळेसच न घेता शक्य होईल तेव्हा व फाटलेले कपडे घालताच येणार नाहीत इतके फाटल्यानंतरच सणाचे निमित्त साधून त्यावेळेस घेण्याचे समाधान मानावे लागते. पूर्वीची परिस्थिती होती–

सणाची पर्वणी ।
मिळणार पैठणी ॥
इच्छा ही मनी ।
साकार होणार ॥

पण आता काळ बदलला, प्रथा बदलल्या आणि माणूसही बदलला आणि उरले ते हे–

सणाची पर्वणी ।
व्यथा जीवघेणी ॥
सांगू व्यथा कुणा मी ।

**त्यांच्या व्यथा : त्यांच्या शब्दांत**

'नोकरी निमित्त फॅमिलीपासून लांब व वेगळे रहावे लागते, नंतर कधी कुटुंबियांच्या भेटीला जाताना आपण त्यांच्यासाठी विशेष काही घेवू शकत नाही, नेऊ शकत नाही, देऊ शकत नाही यामुळे भेटीच्या वेळी आनंदापेक्षा दुःखच जास्त होते.' या शब्दात आपली व्यथा सांगत असताना रेल्वेचे श्री. ओक यांचा कंठ भरून आला व पुढे बोलवेना म्हणून ते झट्दिशी खाली बसले.

'महागाईमुळे लोकांकडे जाणे येणे बंद झाले. लग्न समारंभात सुद्धा जाणे कमी झाले व माणसातील समाजप्रियता कमी कमी होत आहे असे वाटते. कारण इच्छा असूनही घेणे–देणे करू शकत नाही. त्यामुळे आपले लोकांकडे नातलगाकडे व त्यांचे आपल्याकडे जाणे–येणे बंद व संपर्क कमी होऊ लागला आहे.' त्यामुळे एकलकोंडेपणा व कुढेपणा वाढला आहे. **श्री. जोगळेकर**

'शहरातल्या राहणीमानाप्रमाणे व त्यामुळे नातेवाईक सगे–सोयरे व पाहुणे गावावरून येतात व त्यांचा खर्च फार जाणवतो. तो मनाविरुद्ध असूनही बोलता येत नाही. नाईलाजाने खर्च करावा लागतो. हा खर्च नेहमीच व दरमहिन्याला करावाच लागतो. त्यामुळे दर महिन्याचे बजेट अपसेट होते व सावकाराकडे धाव घ्यावी लागते.' **श्री. ओव्हाळ**

'मुलांना खाऊ बिस्किट चॉकलेट हे तर सोडा पण चांगला मुबलक भातही देवू शकत नाही याची खंत वाटते.' **श्री. जगताप**

'आवश्यक अशा वस्तू– उदा. अन्नधान्न, साखर, वनस्पती तूप, रॉकेल, कापड यांचे व्यवस्थित वाटप झाल्यास स्वस्त धान्य दुकानापुढे रांगांची लांबी कमी होईल व एक एक वस्तूसाठी ४–४ हेलपाटे पडणार नाही व त्यायोगे शारिरीक व मानसिक त्रास होणार नाही.' **श्री. प्रभुणे**

'...चैन अपने जीवनमे नही। हां जीवन मे लडते रहनेका दम अवश्य है। अभी हमने उसके आगे हथियार डाले नही। ...अपनी इस कंगाली जिसके लिये मैं सरकार और बडा व्यापारी वर्ग इन दोनो को जिम्मेदार समझता हूं। मुझे शर्म आती है महंगाईकी वजहसे मैं जितना मजबूर और तंग हूं जितना ज्यादा मुझे अपनो इच्छाओंको मारना पडता है– मां बहनो के, बीबी बच्चों के अरमानोंका गला घोटना पड रहा है। यही है मेरा (?) आजका भारत।...' **श्री. पैसाडेली** यांनी आपली व्यथा अशाप्रकारे मांडली.

**श्री. रेणाविकर** यांनी सांगितले की– 'महागाईमुळे अनेक आवश्यक गरजांना फाटा द्यावा लागतो. कुटुंबासहित कोठे जावयाचे झाल्यास आता महिन्यातून एकाच सुट्टीला जाता येते. पूर्वी प्रत्येक सुट्टीच्या दिवशी जात होतो–'

'महागाई वाढली आणि भत्ताही वाढला आहे पण तो भत्ता अपुरा पडतो. सरकारने भत्ता वाढविण्याऐवजी वस्तू पुरवाव्यात योग्य किंमतीत !! .. सध्याच्या पगारात फक्त जगता येते एवढेच काय ते समाधान !! कुठे बाहेरगावी जावे लागल्यास, काही घेणे–देणे करावे लागल्यास कुटुंबात फटफजिती होते किंवा ती कमी करण्यासाठी थोडेफार कर्ज म्हणा, उसने म्हणा हे घ्यावेच लागते...' **श्री. शेख अलाबक्ष**

ही खुली चर्चा अधिका अधिक रंगतच होती. आयोजक–प्रयोजक कामगारात त्यांच्या भावनांशी समरस होवून जास्तीत जास्त माहिती घेण्याचा प्रयत्न करीत होते. कामगारही माहिती देत होते. त्यातील काही मार्मिक व मनोरंजन प्रश्न उत्तरे अशी होती.

आपणास घालण्याचे सुट किती लोकांना आहे ?

बहुतेक सर्वांनी हात वर केले.

किती लोकांना एकापेक्षा अधिक सूट आहेत ?

एकही हात वर नव्हता. श्री. लोहोबरे यांनी हळूच सुचविले– हा एकुलता एक सुट लग्नाचाच !! सर्वांनी हसत हसत होकार भरला.

तुम्हाला बोनस मिळतो. त्याचा विनियोग कसा करता ?

'त्याची आम्ही वाटच बघत असतो...'

'हा आम्हाला प्रश्नच नसतो...'

'आमच्यापेक्षा त्याचा फायदा आमच्या सावकारांनाच होतो...'

'कर्ज चुकविण्यासाठी याचा उपयोग होतो .. ते देवून उरले किंवा उरविले तर कपडे—लत्ते करतो...'

आपण आपले कुटुंब मर्यादित ठेवले आहे काय ?

बहुतेकांनी सांगितले की तमा प्रयत्न केलेला आहे. '...पण आजच्या युगात त्यामुळे एक तोटा होतो. घरात माणसे अधिक तर अनेक ठिकाणी रांगा लावण्यासाठी उपयोग होतो.' सहज विनोद उद्भवला. स्वास्थ्य व आरोग्य या विषयावरची चर्चाही खूप रंगली. सरकारच्या कामगार राज्य विमा योजनेवर मनसोक्त मोकळी चर्चा झाली. अधिक चांगली व कार्यक्षम योजना व ती राबविणारी यंत्रणा असावी अशी उलटसुलट बरीच चर्चा झाली. चर्चा रंगतच रंगत होती.

पण काळोखाने आपले बाहू पसरून सर्व वर्ग आपल्या बाहुपाशात घेतला. तेव्हा कुणी तरी बटन दाबून दिवा लावला— तेव्हा कुठे सर्वांना जाणीव झाली वेळेची व उशीर झाल्याची. प्रत्येकाने आपल्या मनगटावरील घड्याळात बघितले व नंतर इतरांच्या चेहऱ्याकडे! वेळ संपावी व सामना अनिर्णित असावा ही परिस्थिती! चर्चा करून कुणीही दमले नाही. थकले नाही पण थांबले! नव्हे थांबविले. घड्याळातील न थांबणाऱ्या काट्यांनी!

## चर्चेत निघालेले काही निष्कर्ष

(१) कामगारांना जे वेतन मिळते त्यातील ७०–८० टक्के अन्नधान्य कपडा ह्या मुलभूत गरजांवरच खर्च होते. त्यामुळे इतर कोणत्याही गरजा ते व्यवस्थितपणे भागवू शकत नाहीत. विशेषतः अन्नधान्य, डाळी, तेल, चहा, केरोसीन ह्या पदार्थावर जास्त खर्च करावा लागतो. नेमक्या त्याच वस्तू दुर्मिळ व महाग झाल्यामुळे त्यांचे अंदाजपत्रकाचा मेळ बसत नाही. फळे-भाजीपाला आणि चांगला सकस आहार व गोडधोड हे त्यांना उपलब्ध नाही. मुलांचे शिक्षण तसेच घरातल्या सुखसोयी ह्यावर खर्च करणे अशक्य.

(२) दर महिन्याच्या शेवटास फॅक्टरीतील धंदेवाईक सावकारांची मदत घ्यावी लागते. असे कर्जबाजारी कामगार सुमारे ८० टक्के आहेत. व्याजाचे दर अफाट आणि कर्जवसुलीची पद्धत निघृण. काही फॅक्टरीत असे सावकार २००० ते २०,००० हजार रुपये उत्पन्न अशा प्रकारे शोषणांनी आयते मिळवतात. काही मॅनेजमेंट व युनियन ह्यांवर देखील ह्या लोकांचा प्रभाव असतो. हेच लोक मटका इ. खेळायला प्रवृत्त करतात.

(३) कामगारांना एकंदरीत जी निराशा वाटते त्यामुळे त्यातून मार्ग काढायला कोणते तरी व्यसन किंवा मटका ह्याचा आधार घ्यावा लागतो.

(४) कामगारांच्या आरोग्याबाबत जी विमा योजना आहे त्यातील प्रमुख अडचणी म्हणजे (१) डॉक्टरांचे दुर्लक्ष (२) चांगल्या औषध व उपचार ह्यांचा अभाव (३) सरकारी किंवा निमसरकारी हॉस्पिटलमधील डॉक्टरांची दफ्तर दिरंगाई (४) लांचलुचपत एखादे सर्टिफिकेट किंवा औषधाला मंजुरी मिळवण्याकरता (५) वशिलेबाजी.

(५) वर्षातून एक मोठी रक्कम जेवढी बोनसरूपाने मिळते ती बचत न होता कर्जफेड व व्याजापोटीच संपते. तिचा उपयोग विलंबित गरजा भागवण्याकरता तितकासा होत नाही.

(६) कुठल्याच कामगाराच्या मालकीचे घर, दागदागिने, शेअर, बँक शिल्लक इ. आढळले नाही.

(७) सुशिक्षितपणाचे कामगारवर्गातील प्रमाण वाढले आहे पण पगार तितकाच मिळूनही तितकेच शिक्षण झालेला कारकून हा मात्र ह्या वर्गात मिसळत नाही—त्यामुळे कामगारात न्यूनगंडाची भावना निर्माण झाली आहे.

(८) पॉवरकटमुळे व ले-ऑफमुळे त्यांच्या मासिक उत्पन्नात घट झाली आहे व एकीकडे भाववाढ चालूच आहे. त्यामुळे कामगार जिकीरीला आला आहे.

(९) मुलाखत घेतलेल्यांपैकी ८० टक्के कामगार देवधर्म, उपासतापास करतात.

(१०) कारखान्यात उत्पादन कमी होत आहे. पूर्वी दोन–दोन तीन–तीन पाळ्या चालत. ओव्हरटाईम भरपूर मिळत असे. मंदीमुळे कारखाने व मजूर ह्यांच्या उत्पन्नात घट होत आहे.

(११) मुले, कुटुंब ह्यांच्या बाबतीत आपली जबाबदारी पार पाडता येत नाही त्यामुळे खंत. त्यामुळे काहींच्या बाबतीत असे आढळले की—घरातल्या दुःखापासून दूर पळण्याकरता बाहेर मित्रमंडळीत पत्ते खेळत बसावे, विड्या, सिगरेट, दारूचे व्यसन करावे. ह्यामुळे परिणामी पत्नी गांजलेली, मुलांवर नियंत्रण नाही व त्यांच्या अभ्यास, आरोग्य व सद्वर्तन ह्यांकडे पित्याचे दुर्लक्ष.

३०० ते ६०० रुपये मासिक उत्पन्न असणाऱ्या शहरी संघटीत व सुशिक्षित कामगारांची ही स्थिती आहे तर ज्यांना २।३ रु. रोज अनिश्चितपणे मिळतो अशा ग्रामीण व स्वतः मोलमजूरी करून जगणाऱ्या व्यक्तींचे दारिद्र्य किती भीषण असेल ह्याची कल्पनाच करवत नाही.

●●

आलोक ; पृष्ठ ५ वरून

वाढण्याची शक्यता आहे. वीज, कोळसा व पोलाद ह्यांचे उत्पादन वाढते आहे. अन्नधान्याची सरकारी वाटपव्यवस्था करणे आवश्यक आहे; त्यायोगे किमती रोखता येतील, उद्योगधंद्यांनी त्यांच्या किमतविषयक धोरणात बदल करावा आणि निर्यातीवर जास्त भर देण्यात यावा. वरील धोरण यशस्वी झाल्यास पुन्हा एकदा स्थिरता येऊन विकासाच्या गतीस अनुकूल वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे.

## महाराष्ट्र बजेट

१९७५–७६ वर्षाचे महाराष्ट्राचे बजेट नुकतेच अर्थमंत्री मधुकरराव चौधरी ह्यांनी सादर केले. ग्रामीण रोजगार हमी योजना हे त्याचे वैशिष्टय. ह्या योजनेकरता होणाऱ्या ५० कोटी रकमेपैकी २५ कोटी रुपये राज्यातल्या बहुतेक प्रत्येक व्यक्तीकडून वसूल केले जातील. ह्या वर्षीचा अर्थसंकल्प एकूण ३५५ कोटी रुपयांचा आहे. रोजगार हमी योजनेचा कर दरमहा ४०० रुपये उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीलासुद्धा द्यावा लागणार आहे. वार्षिक ५० रु. ते २५० रु. पर्यंत, ह्या कराचा बोजा विशेषतः पगारी नोकरदारांस भासेल. जमीनसाऱ्यात ५० टक्के सरचार्ज ८ ते १२ हेक्टर जमीन असणाऱ्यांना आणि त्यापेक्षा जास्त जमीन असणाऱ्यांना १०० टक्के सरचार्ज आकारण्यात येईल. ह्याचा अर्थ शेतकऱ्यांना कराच्या ओझ्यातून बरीच सूट मिळाली आहे. त्यातल्या त्यात मोठे जमीनदार तर अधिक भाग्यवान. तथापि 'गरिबी व बेकारी' ह्यांच्या संदर्भात उचललेले महाराष्ट्र शासनाचे हे पाऊल खरोखरीच अभिनंदनास पात्र आहे. १९७२ च्या अवर्षणाच्या काळात ह्या कल्पनेचा उगम आढळतो. ७४–७५ ह्या वर्षात ह्या योजनेकरता २५ लाख रुपयांचा खर्च झाला.

साधारणपणे ७ तासांच्या कामाला ३ रु. रोज मिळतो. भूसंवर्धन, छोटया प्रमाणावरचे जलसिंचन, वनसंवर्धन इत्यादींकरता कामे उपलब्ध केली जातात. २५ कोट रुपयांची उभारणी ढोबळपणे अशी होईल : विक्रीकर ७·२० कोट, शिक्षणकर १·३० कोट, व्यावसायिक कर व पगारदारांवरचा कर मिळून १०·९२ कोट, खाजगी मोटरवाले ७५ लक्ष, साऱ्यावरील सरचार्ज २·३ कोट, बागाईतदारांकडून ३·० कोट. ८ हेक्टर शेतीचे उत्पन्न दरवर्षीचे सरासरी ४५००/– गृहीत धरून, पगारदार नोकरांचे दरमहा ४०० रु. करपात्र ठरवले आहेत. पण ५० कोट रुपयांचे उद्दिष्ट लक्षात घेता, केव्हा ना केव्हा तरी, शेतकऱ्यांवर हा बोजा बसवणे अटळ होणार आहे. शेतसारा दुप्पट करून हे उद्दिष्ट सहज गाठता येणे शक्य आहे.

१९७४–७५ ह्या वर्षाशी तुलना करता ७५–७६ च्या बजेटमध्ये ४५ लक्ष रुपये शिल्लक दाखवले आहेत. जमेच्या बाजूस रु. ८९०·४८ कोटी तर खर्चाच्या बाजूस ८८५·२१ कोट आहेत. भांडवली खात्यावर ४२·५९ कोटींची तूट आहे. तसेच भांडवली स्वरूपाची जमा ५५५·६ कोटी आणि खर्च ६०७·२ कोटी दिसतो. त्यामुळे एकूण गोळाबेरीज तूट ३७·३ कोटींची आहे. त्यांत ७ कोट रुपयांची संकीर्ण कारणांनी भर पडण्याची शक्यता आहे. आंतर-राज्य विक्रीकर धोरणामुळे महाराष्ट्राला ३८ कोट रुपयांचा लाभ होईल. महाराष्ट्रात उद्योग व व्यापार जास्त असल्यामुळे असे होणे साहजिक आहे. जिल्हा परिषदांच्या योजना व राज्य ह्यांच्यात एकसूत्रीपणा यावा अशी अर्थमंत्र्यांची अपेक्षा आहे.

२१ फेब्रुवारीला महाराष्ट्राच्या नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला; त्यांत १४ मंत्री आणि ११ राज्यमंत्र्यांचा समावेश आहे. श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या संमतीने हा बदल झाला, असे मुद्दाम सांगितले जाते.

नागपूर विद्यापीठाच्या एप्रिल १९७३ च्या पेपरफुटीबाबत चौकशी होऊन त्याबाबत कुलगुरू, कुलसचिव व उपकुलसचिव ह्यांना जबाबदार धरण्यात आले आहे. कुलगुरू व कुलसचिव ह्यांचे परस्परसंबंध व सहकार्य चांगले नव्हते, असेही अहवालात म्हटले आहे.

राज्यातील माध्यमिक शिक्षकांनी S. S. C. परीक्षेवर बहिष्कार घातला होता. १० रुपये पगारवाढ जाहीर झाल्यामुळे तो मागे घेण्यात आला. त्या आधी प्राध्यापकांचा परीक्षेवरील बहिष्कार चालू होता. सरकारने मोघम भाषेत प्राध्यापकांच्या मागण्या ४ एप्रिल रोजी मान्य केल्या आहेत. ह्यापुढे त्या दोहोंत समझोता होतो की नाही हे पाहायचे. एकंदरीत विद्यार्थ्यांना परीक्षेआधी सुटी मिळाली...सुटीचा 'हँगओव्हर' पेपरमध्ये राहील की काय, तसेच पेपर तपासताना कडवटपणा नसेल अशी आशा आहे. महाराष्ट्राच्या वीजमंडळाचे अध्यक्ष प्रकाशात आले. मालेगावची दंगल थोडक्यात आवरली. राज्याने २६ फेब्रुवारीला मटक्याविरुद्ध बिल पास केले. गुन्ह्याकरता कठोर शिक्षेचे भय दाखविण्यात आले आहे. मिनी लॉटरीप्रमाणेच 'साप्ताहिक लॉटरी' देखील सुरू होत आहे. महिन्याच्या १ ते ३० दिवसांचे वेगवेगळे संच किंवा गट करून हाच कार्यक्रम अनेकदा चालवता येईल. लॉटरीचे 'अती झाले व हसू आले' असे होईल की काय अशी भीती वाटते. राज्याच्या अर्थकारणाची थोडया प्रमाणावर का होईना भिस्त, लॉटरी व मद्यालयांचे परवाना-फी ह्यांवर आहे, असा संशय घेण्यास जागा आहे. मद्य पिणाऱ्या व्यक्तींना सामाजिक प्रतिष्ठा कितपत असावी ह्याचा मात्र मुख्यमंत्री गंभीरपणे विचार करणार आहेत. अर्थात त्याचा राज्याच्या उत्पन्नाशी प्रत्यक्षपणे संबंध नाही. ● ●

## चलन, कर्ज, बँकठेवी, आयात, निर्यात इ.

| विषय | परिमाण | दोन वर्षांपूर्वी | एक वर्षापूर्वी | डिसें. १९७४ |
|---|---|---|---|---|
| चलनातील नोटा | कोटी रुपये | ४७९४ | ५६३९ | ५९६७ |
| एकूण कर्ज | " | ८६२ | १२३६ | १६८१ |
| व्यापारी बँकाचे | " | ९ | २११ | १६३ |
| सहकारी बँकाचे | " | ३५२ | ३५० | ४२७ |
| व्यापारी बँकांच्या ठेवी | " | ८३८१ | १०,०४७ | ११४४० |
| सरकारी कर्जरोख्यांत गुंतवणूक | " | २१७५ | २४०३ | २७१७ |
| लोकांजवळील खेळता पैसा | " | ८७१६ | १०१८५ | ११,०६३ |
| भारत सरकार ट्रेझरी बिल | " | ३५२२ | ४१७० | ४६७८ |
| किमती ( सर्व वस्तू ) निर्देशांक | १९६१–६२ = १०० | २११·४ | २६२·० | ३१६·९ |
| अन्नधान्य किमती | " | २४४·० | ३००·७ | ३६९·३ |
| औद्योगिक कच्चा माल | " | २१७·९ | ३०७·९ | ३२०·४ |
| यंत्र–वाहतूक सामग्री | " | १६९·६ | १८७·७ | २७०·५ |
| कारखान्यात बनणाऱ्या वस्तू | " | १७८·१ | २१६·५ | २५४·७ |
| परराष्ट्रीय व्यापार–आयात | कोटी रुपये | ९५·० | २६७·० | ३४०·० ( नोव्हे. ) |
| परराष्ट्रीय व्यापार–निर्यात | " | १६६·० | ३०९·९ | २७६·० |
| रोजगार–विनिमय केंद्र नोंदणी | हजार | ४०६ | ३७९ | ३५० |

### व्यापारी बँकांतील ठेवी (शेवटच्या शुक्रवारी) आकडे कोटी रुपयांत

| | एकूण | भारतीय बँकांत | परपेशी बँकांत |
|---|---|---|---|
| १९६० – ६१ | २८१·८१ | २५६·१६ | २५०·६५ |
| १९७४ ( जुलै ) | २९१४·८३ | २७४९·६४ | १६५·१९ |

### केंद्रीय सरकारचे उत्पन्न, खर्च व सार्वजनिक कर्ज (कोटी रुपयात) मे १९७५चे आकडे

| आयातकर | उत्पादनकर | कॉर्पोरेशन कर | आयकर | एकूण जमा | संरक्षण खर्च | चालू खर्च | भांडवल खर्च | कर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८१·३९ | २१६·३५ | १·४७ | ७·७४ | ३७१·८ | १००·४ | १९९·३ | ५१·० | ५२५·३ |

## १९७३–७४ शेतकी उत्पादनाचे अंदाज

| | |
|---|---|
| तांदूळ | ४३·७ दशलक्ष टन |
| गहू | २२·० " " |
| ज्वारी | ८·९ " " |
| बाजरी | ३·९ " " |
| मका | ६·३ " " |
| हरबरा डाळ | ४·५ " " |
| तूर | १·३ " " |
| शेंगदाणे | ५·७ " " |

## औद्योगिक–उत्पादनाचे निर्देशांक १९६० = १००

| १९६१ | १९६५ | १९६९ | १९७० | १९७१ | १९७२ | १९७३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १०९·२ | १५३·८ | १७२·५ | १८०·८ | १८६·१ | १९९·४ | २००·६ |

## सोने–चांदी वायदे बाजार

| वर्ष | सोने ( १० ग्रॅमचा भाव ) | | | चांदी ( १ किलो ग्रॅमचा भाव ) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कमाल | किमान | सरासरी | कमाल | किमान | सरासरी |
| १९६०–६१ | १२४·४० | १०७·१२ | ११४·९१ | २०९·३ | १८१·० | १९३·६ |
| १९६९–७० | १९९·०० | १६३·५० | १७९·६२ | ५२१·०० | ४४६·०० | ४८९·१३ |
| १९७२–७३ | २८८·०० | २०२·०० | २४२·१४ | ६५५·०० | ४९५·०० | ५५४·२० |
| १९७३–७४ | ५२५·०० | २७९·०० | ३६९·२३ | १४२०·८० | ६१२·०० | ७९६·१४ |
| २७ डिसें ७४ | ५२०·०० | ५०९·०० | ५१४·२० | ११५५·०० | १०९५·०० | ११२२·६० |

## काही कंपन्यांचे रोख्यांचे भाव

| वर्ष | सेंचरी मिल | नॅशनल रेऑन | टेल्को | ACC | गेस्ट कीन्न विल्यास | बिर्ला ज्यूट | मदुरा मिल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६०–६१ | ४८७·०० | ५११·३० | २८०·५१ | १४६·४ | ४७·५ | ३०·२ | ३४·५ |
| १९६५–६६ | ५१८·८५ | २८१·४० | २१९·७७ | १४६·५ | १९·१९ | २५·२ | ३१·८ |
| डिसेंबर ७४ | ४९४·४७ | २८१·८३ | १९८·६९ | ८२·३ | २७·५ | ३४·२ | १९·७ |

( रिझर्व्ह बँक बुलेटिन, डिसेंबर १९७४ वरून )

# प्रश्नमंजूषा

## प्राध्यापक व विद्यार्थी ह्यांच्या अभ्यासक्रमातील अडचणींचे निरसन

ह्या सदरासाठी प्रा. शरद व्यंकटेश बोकील ह्यांचे सहकार्य लाभत आहे; ह्याचा अर्थला विशेष आनंद वाटतो. डॉ. प्रा. बोकील हे गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या संस्थेत रीडर म्हणून काम करतात. यापूर्वी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली येथे अध्यापन व संशोधन केले आहे. त्यांचा International Trade वरील Ph.D. चा प्रबंध तशीच अनेक पुस्तकेही प्रसिद्ध आहेत.

ह्या सदरात पी. डी. पासून ते एम. ए., एम.कॉम. परीक्षांच्या अर्थशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमावर आधारित कोणत्याही शंकांचे नियमितपणे निरसन केले जाईल. अभ्यासक्रमाला पूरक व उपयुक्त माहिती देणारी नित्य नवी पुस्तके व संदर्भग्रंथ आपले ज्ञान अद्ययावत करतात. अशी पुस्तके ग्रामीण व शहरी महाविद्यालयात उपलब्ध होतातच असे नाही. गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेत मात्र असे संदर्भ-साहित्य सुदैवाने भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. त्याचा फायदा अर्थच्या वाचकांस व्हावा, ही आमची धारणा आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात जो जो भाग अडतो, मग तो अगदी सोपा असेल तरी चालेल...जे आपल्याला अडते ते आम्हाला निःसंकोच विचारावे. त्यांचे शंकानिरसन व पूर्ण समाधान होईल. एखादे उत्तर बोजड व अवघड वाटल्यास, शंका सोडू नये. आम्हाला परत लिहा—तेच उत्तर सोपे करून पुन्हा सांगण्यात त्रास वाटणार नाही.

विशेषतः प्राध्यापकांना नवीन पुस्तके, जर्नल्स, आकडेवारी ह्यांची संदर्भाकरता आवश्यकता असते, त्यांनी देखील ह्या बाबतीत संपर्क साधावा. 'कुठे काय मिळेल' असे मार्गदर्शन तर होईलच, पण त्यांच्या ग्रंथालयात संदर्भग्रंथ व मासिके उपलब्ध नसल्यास, त्यांच्या पत्त्यावर, त्यांची इच्छा असल्यास, प्रकटपणे अथवा वैयक्तिक पातळीवर देखील मदत करण्यास 'अर्थ'ला आनंद होईल. सामान्य वाचकांसुद्धा आर्थिक प्रश्नांबद्दल कुतूहल असते. त्यांनीही ह्या सदराचा फायदा घेण्यास हरकत नाही.

**१. भारतात सध्या एकूण किती रुपयांच्या नोटा चलनात आहेत ?**

सध्या भारतात ५९३१·५५ कोटींच्या वर रुपयांच्या नोटा वापरात आहेत. हा आकडा नोव्हेंबर १९७४ चा आहे.

**२. वाढत्या लोकसंख्येचा भारताच्या विकासावर काय परिणाम झाला आहे ?**

वाढती लोकसंख्या अन्नप्रश्न गंभीर करीत आहे. त्याप्रमाणे भूमिहीन मजूर व सुशिक्षित बेकार यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातून दारिद्र्य कमी होण्याऐवजी वाढीस लागले आहे. त्यामुळे विकासाचा प्रश्न जास्त गंभीर बनत असून, त्यातून निर्माण होणारे विरोधाभास हे ठळकपणे लोकांना समजू लागले आहेत.

**३. काळा पैसा व चोरटी आयात ह्यांचे प्रमाण, किती असेल ? त्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेत कोणत्या अडचणी येतात ?**

चलनामधील एक रुपया काही ठराविक काळ अर्थव्यवस्थेत फिरून परत तो सरकारी खजिन्यात जातो. या प्रक्रियेत तो पैशामध्ये मोजता येणारे उत्पन्न (Money Income) तयार करतो. चलन व उत्पन्न यांतील प्रमाणांकास चलन—उत्पन्नगती (Income velo city of money) असे म्हणता येईल. ही गोष्ट स्थूलमानाने स्थिर असते. ती सध्या ९ आहे. यावरून भारताचे वार्षिक उत्पन्न ५५,००० रु. कोटींपर्यंत असावयास पाहिजे. पण ते सध्या ४५,००० ते ४८,००० कोटी आहे. याचा अर्थ काळा पैसा रु. ७,००० ते १८,००० कोटी इतका

सहज आहे. काळा पैसा म्हणजे दडवलेले उत्पन्न होय. चोरटी आयात किती असावी, याचा नक्की अंदाज माहीत नाही. पण एकूण आयातीच्या १० टक्के मानली तरी ३०० ते ३१० कोटी असावयास हवी.

४. पाचव्या पंचवार्षिक योजनेची वित्त-उभारणी कितपत शक्य आहे ?

पाचव्या योजनेचा पहिला आराखडा हा १९७२–७३ ते १९७४–७५ या दरम्यान झालेल्या भाववाढीमुळे पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. अशा परिस्थितीत वित्तीय उद्दिष्टे (Financial targets) जरी प्राप्त करू शकलो, तरी खरी-खुरी उद्दिष्टे प्राप्त करणे कठीण आहे.

५. 'कुंठित–चलनवाढ' (Stagflation) म्हणजे काय ? भारतातील सध्याची परिस्थिती तशी आहे काय ?

चलनफुगवटा व किमतवाढ यामुळे काही किमती अवास्तव वाढल्या तर लोकांचे वास्तविक उत्पन्न घटले जाते. त्यामुळे लोकांची क्रयशक्ती कमी झाली की, त्याचा परिणाम काही उद्योगधंद्यांवर, विशेषतः टिकाऊ व चैनीच्या वस्तूंवर होतो व मग demand recession चालू होते. यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढणे व मंदीची चाहूल लागणे, या दोन्ही गोष्टी एकत्र पाहावयास मिळतात. या प्रक्रियेस कुंठित चलनवाढ (Stagflation) असे म्हणतात. किमती अवास्तव वाढल्या तर वास्तविक बचत कमी होऊन विकास कुंठतो. ही चलनवाढ कुंठित चलनवाढ म्हणून गणण्यात येते.

६. चलनसंख्यामान सिद्धांताचे दोष कोणते ?

चलन संख्यामान सिद्धांताचे दोष गंभीर मानले जातात. एक तर हा सिद्धांत कार्यकारणभाव दाखवू शकत नाही. चलनवाढीमुळे किमती वाढतात का, किमती वाढल्या म्हणून चलनवाढ होते, ही गोष्ट स्पष्ट होत नाही. दुसरा दोष म्हणजे चलनवाढ व किमती यांचे Dynamics सांगू शकत नाही. अल्पकाळात चलनगती ही स्थिर नसते.

७. सरकारी कर्जाची परतफेड कशा रीतीने केली जाते ?

सरकारी कर्जाची फेड आणखी कर्ज उभे करून केली जाऊ शकते. कधी कधी करआकारणीचा वापर करतात. पण फक्त व्याज देण्यापुरताच त्याचा उपयोग होतो.

८. 'पिगु–परिणाम' (Pigou effect) कोणत्या पुस्तकावरून अभ्यासावा ?

पिगु परिणाम अॅक्ले (गार्डनर) किंवा पाटिनकन यांच्या अनुक्रमे Macro–Economics and Money, Interest & Prices या ग्रंथावरून अभ्यासावा.

● ●


# पॉकेट-मनी कसा पूरवावा ?

ही आजकालची तुमची अडचण आम्ही समजू शकतो. या बाबतीत आमचा तुम्हाला मित्रत्वाचा सल्ला असा की,

'विद्या बँकेत'

तुमच्या पॉकेट-मनीतून 'बचत खाते' उघडा अन् चमत्कार पाहा. तुम्हाला आपोआप बचतीची सवय लागेल. शिवाय तुमच्या बचतीवर ६% दराने व्याजही मिळेल !

विद्यार्थी, शिक्षक व पालकांची—

**विद्या सहकारी बँक लि.**

३७५, नारायण पेठ, उंबऱ्या गणपती चौक,
लक्ष्मी रस्ता, पुणे–३०.

आमच्याकडे केव्हाही या. तुमचे स्वागतच होईल !

ज. ग. नलावडे — व्यवस्थापक

प्रा. प. वि. पटवर्धन — अध्यक्ष



# तरुणांचे मनोगत

## पहिल्या 'महिला क्रिकेट कसोटी सामन्याची' भारतीय संघाची 'पहिली कप्तान'

### कु. उज्वला निकम

मुलाखत— विनेश बर्वे,
पी. डी. कॉमर्स, बी. एम्. सी. कॉलेज, पुणे.

१९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून संपूर्ण भारतभर अती उत्साहाने साजरे होत आहे. ह्या महिलावर्षाचे पहिले पाऊल फेब्रुवारीत पुण्यामध्ये पडले; ते म्हणजे पहिला क्रिकेट कसोटी सामना! ह्या कसोटी सामन्यात पुण्यातील दोन कुमारिकांनी (उज्वला निकम, शुभांगी कुलकर्णी), पदार्पण करून पुण्याची कीर्ती तर अजरामर केलीच, शिवाय उज्वलाने तर कळसच केला. पहिल्या कसोटीची पहिली कप्तान होण्याचा मान पटकवला. अशा कर्तबगार मुलीचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. तिच्या यशाची गुरुकिल्ली शोधण्यासाठी मी तिला जाऊन भेटलो. माझी कप्तान याबाबतची कल्पना वेगळीच होती. मी गेलो त्यावेळी उज्वला घरकामात रमली होती. तरी पण वेळात वेळ काढून तिने दिलेली ही मुलाखत—

मी— तुला क्रिकेटची गोडी कशी लागली ?

उज्वला— आम्ही १९७३ साली नैनिताल येथे भरलेल्या सॉफ्टबॉलच्या टुर्नामेंटकरता चाललो होतो. प्रवासात गाडीची चुकामूक झाली आणि प्लॅटफॉर्मवरच सॉफ्टबॉलची स्टिक व चेंडू ह्यांच्या साहाय्याने वेळ घालविण्यासाठी क्रिकेट खेळलो. तीच खरी पहिली सुरुवात. अर्थात क्रिकेट या खेळाबद्दल शाळेपासूनच मला आकर्षण होतेच. परंतु या प्रसंगामुळे क्रिकेट खेळण्यास चालना मिळाली.

मी— यानंतर पुण्यास आल्यानंतर तुम्ही काही तरी खटपट केली असणार.

उज्वला— हो तर! १९७३ च्या राखी पौर्णिमेच्या शुभ-मुहूर्तावर आमदार श्री. संभाजीराव काकडे ह्यांच्या हस्ते खेळाचे उद्घाटन केले.

मी— ह्यापूर्वी दुसऱ्या राज्यात क्रिकेट खेळले जात होते काय ?

उज्वला— तसं पाहिलं तर मुंबईमध्ये काही मुली हॉबी म्हणून क्रिकेट खेळायच्या. परंतु त्याला काही राष्ट्रीय स्वरूप नव्हते. परंतु राष्ट्रीय स्वरूप देण्याचा पहिला प्रयत्न आम्ही केला.

मी— यानंतर तुम्ही महाराष्ट्र लेडिज क्रिकेट असोसिएशनची स्थापना केलीत. नाही का ?

उज्वला— हो.

मी— याची स्थापना झाली कशी व त्यास मदत कोणी कोणी केली ?

उज्वला— दिलीप चिचोरे, नरेंद्र निकम, मधू तापीकर, दिलीप देशपांडे ह्या मित्रांनी असोसिएशनची स्थापना करण्याचे ठरविले. त्याला आमदार श्री. संभाजीराव काकडे, श्री. खिलारे, माजी महापौर शांताराम दिबेकर, सौ. प्रमिलाबाई चव्हाण ह्या सर्वांनी हवी ती मदत करून प्रोत्साहन दिले.

मी— क्रिकेटचा सराव कोठे सुरू केलात ?

उज्वला— आम्हाला पोलीस ग्राऊंड हे सरावासाठी मिळाले.

मी— खेळ सुधारण्यासाठी तुम्हाला मार्गदर्शनाची आवश्यकता भासली असेल नाही का ?

उज्वला— हो. सुरेश डुमके, श्री. हसबनीस, मधुकर तापीकर, श्री. दिलीप देशपांडे या नामांकित खेळाडूंचे मार्गदर्शन लाभले. त्यामुळेच आमची प्रगती झाली असे मी तरी म्हणेन.

मी— आतापर्यंत किती सामने झाले ? भारताची कप्तान म्हणून तुझी नेमणूक कोणत्या गोष्टीमुळे झाली ?

उज्वला— आतापर्यंत तीन नॅशनल्स झाल्या. पुणे, वाराणसी, कलकत्ता. पश्चिम विभागाला अजिंक्यपद मिळाले. टेस्ट सुरू होण्याच्या आधी १५ दिवस कलकत्ता येथे नॅशनल्स झाल्या होत्या. मध्यप्रदेश व कर्नाटक यांच्याविरुद्ध अनुक्रमे ३२ धावांत

९ बळी व २५ धावांत मी ५ बळी घेतले, व २५ आणि ३१ अशी धावसंख्या केली. ह्यामुळेच निवडसमितीचा अनुकूल ग्रह झाला असावा.

मी– आपल्या संघाला परदेशात निमंत्रण मिळाल्यावर त्याचा क्रिकेटच्या दृष्टीने काय उपयोग होईल ?

उज्वला– आपल्या संघाला परदेशात निमंत्रण मिळाल्यास आपला संघ चांगलीच लढत देईल. त्यामुळे निरनिराळ्या खेळपट्टयांचा अनुभव मिळेल व आत्मविश्वास वाढविण्यात त्याचा थोडाफार उपयोग होईल. संस्कृतीची देवाणघेवाणही करता येईल.

मी– क्रिकेटचा सराव करताना खेळाडूला साधारण दरमहा किती खर्च येतो ? व हा खर्च कशावरचा ?

उज्वला– प्रत्येक खेळाडूस दरमहा ३० ते ४० रुपये खर्च येतो. यात खेळास लागणारे साहित्य, वेगवेगळ्या ठिकाणी जाण्याचा खर्च व खाण्यापिण्यावरील खर्च. खरं पाहिलं तर क्रिकेट हा खेळ मध्यम वर्गातील मुलींना परवडण्यासारखा आहे.

मी– हां ! म्हणजे लोकांमध्ये असा समज आहे की, जे महिलांचे क्रिकेट वगैरे चालू आहे ते फक्त श्रीमंतांसाठीच आहे, हे चूक आहे तर !

उज्वला– होय. हा लोकांचा उगाचच गैरसमज झालेला आहे.

मी– क्रिकेटचा सराव करण्यासाठी कोणती साधना करावी लागते ?

उज्वला– पहिले म्हणजे नियमितपणा पाहिजे. रोज किमान सकाळ व संध्याकाळ १५० दोरीवरच्या उड्या मारल्या पाहिजेत. ग्राऊंडला किमान ४ फेऱ्या तरी मारल्या पाहिजेत. या सर्व गोष्टी फिजिकल–फिटनेस् व स्टॅमिना या दृष्टीने करावे लागते. आणि मनगटाच्या स्नायूसाठी तर अगदी सोपा उपाय आहे. स्वयंपाकघरातील वरवंटा हातात घेऊन त्यांनी जरी मनगटाला एक्झरसाईज दिले तरी तेवढे पुरे होते.

मी– ऑस्ट्रेलिया संघाबरोबर जो पुण्यात कसोटी सामना झाला त्याला कोणाकोणाचे सहकार्य लाभले ?

उज्वला– त्याकरता आम्हाला श्री. व सौ. काकडे, श्री. यशवंतराव मोहिते व सौ. मोहिते, श्री. बाळासाहेब ठाकरे, श्री. व सौ. पाडगावकर, सौ. प्रमिलाबाई चव्हाण, श्री. शर्मा (सेक्रेटरी, अखिल भारतीय महिला क्रिकेट असोसिएशन), श्री. चित्रोरे, डुमके, नरेंद्र निकम, देशपांडे, मधु तापीकर, प्रदीप सावंत, आनंद भानू, लाला शेख, हरीश पंजवानी, बीना शिंदे, विजया कुलकर्णी, उज्वला दळवी इत्यादींचे बहुमोल सहकार्य लाभले.

मी– त्या सामन्याचा एकंदर खर्च किती आला ? त्याची तरतूद कशी केली ?

उज्वला– कसोटी सामन्याचा एकूण खर्च सुमारे ७०–८० हजार रुपये झाला. त्यात अखिल भारतीय असोसिएशनला देण्यात येणाऱ्या गॅरंटी रकमेचा समावेश आहे. पाहुण्या संघाच्या भारतातील विमान–प्रवासाकरता सुमारे ३० हजार रु. जेवण, राहाणे ८ हजार रु. भारतीय संघाकरता ५ हजार रु. छपाई रु. ५ हजार असे काही प्रमुख तपशील आहेत. हा खर्च भरून काढण्याकरिता आम्हाला महाराष्ट्र बँकेकडून रु. ५ हजार, मुख्यमंत्री निधीतून १० हजार रु. तसेच स्मरणिका व तिकीट विक्री ह्या मार्गांनी पैसे उभे करता आले. खर्च वजा जाता असोसिएशनला अल्प फायदा झाला आहे. त्यामुळे क्रिकेट कसोटी सामन्यांचे अर्थशास्त्र आता आमच्या आवाक्यात आहे. ह्यापुढे होणाऱ्या स्पर्धांचा खर्च असोसिएशन करू शकेल इतके आर्थिक सामर्थ्य मिळण्यास सुरवात झाली.

मी– गरीब मुलींना क्रिकेट खेळण्याची संधी मिळेल काय ?

उज्वल– गुण व पात्रता असल्यास एखाद्या गरीब मुलीचा खुराक, कीट व प्रवास इ. चा खर्च असोसिएशन भागवण्यास तयार आहे.

मी– तू स्वत: किती खर्च क्रिकेटवर करतेस ते सांगा.

उज्वला– मी आपली नेहमीचेच मध्यम वर्गातले पौष्टिक पदार्थ खाते. उदा. भिजवलेले दाणे व हरबरा डाळ, दूध, तसेच केळी. कीटकरता साधारण दरमहा १०–२० रुपये खर्च होतो. विशेषत: बुटांकरता. प्रवासा करता मात्र आतापर्यंत रेल्वे कन्सेशनने जाऊनही, खूपच खर्च झाला. ह्यापुढे असोसिएशनतर्फे तो झाल्यास बरेच होईल. पण चकाट्या पिटणे, भारी साड्या आणणे, सिनेमे पाहणे, पार्ट्या करणे तसेच डॉक्टरकडे औषधाचा रतीब लावणे ह्यापेक्षा माझा दरमहा २० रुपये खर्च वाईट आहे काय ? तसे पाहिले तर इतर मुली पिकनिक, ट्रीप ह्याकरताही वर्षातून १००–२०० रुपये खर्च करतातच की ! म्हणून क्रिकेट हा बड्या श्रीमंत मुलींच्या चैनीची बाब आहे, ही समजूत भ्रामक आहे. नाही का ?

पी. डी–कॉमर्सची माझी ही मैत्रीण अर्थशास्त्र, बोलून बोर करायला लागली म्हणून मी तिला चटकन चहा करायला सांगितले व छोटीशी आग्रहाची डिश खाऊन तत्काळ पळ काढला. ● ●

# जास्तीतजास्त व्हिटॅमिन्स कमीतकमी पैशात

**श्री. व्ही. आर. राणे**

केंद्राधिकारी कम्युनिटी कॅनिंग सेंटर, पुणे १.

[ उन्हाळयाचे दिवस आहेत. संत्री, अननस, आंबा इ. फळांची सरबते दुपारच्या तलखीच्या वेळी, वाळयाच्या पडद्यावरून पंख्याची आल्हाददायक झुळूक येत असता घुटक्या-घुटक्यांनी पिताना धुंद आनंद होणारच ! पण हे केवळ श्रीमंती स्वप्न नाही. मध्यमवर्गातल्या गृहिणीला ह्या फळांचे अर्क काढण्याचे अर्थशास्त्र माहीत झाले तर प्रत्येक घर ती अधिक सुखी करू शकेल. बाजारात लिंबू, संत्री, द्राक्षे, अननस इ. सरबतांच्या बाटल्यांच्या किमती ७ रु.-१२ रु. पर्यंत आहेत. ह्याच बाटल्या २॥ ते ४ रुपयापर्यंत कॅनिंग सेंटरच्या मदतीने तयार करून आपले पैसे तर वाचतीलच, पण सुखी जीवनाचा आस्वाद व चांगला व्हिटॅमिन्सयुक्त आहार आपल्या कुटुंबाकरता आपण मिळवू शकू. विशेषत: महिला वाचकांनी ह्या लेखाची सत्यता प्रत्यक्ष अनुभव घेऊन पडताळून पाहावी. ]

आपण भारतीय फार भाग्यवान आहोत. कारण तुलनेनं पाहिलं तर आपल्या देशात सर्व प्रकारची फळे लागवडीस आणली जातात. फळाचे स्थान आपल्या आहारात फार मोठे आहे. कारण आपल्या आहारात अत्यावश्यक असा 'जीवनसत्त्व' हा घटक निरनिराळया फळांमध्ये फार मोठया प्रमाणात उपलब्ध असतो. जीवनसत्त्वांच्या अभावामुळे निरनिराळया प्रकारचे रोग संभवतात. उदा. जीवनसत्त्व 'अ'च्या अभावामुळे रातांधळेपणा येतो. याचा प्रादुर्भाव भारतात फार मोठया प्रमाणात आहे. आंबा, पपई, गाजर वगैरे मुबलक प्रमाणात असूनही या जीवनसत्त्वाचा अभाव आहे हे विशेष. याचे कारण एकच की, या फळांचं महत्त्व आपल्या आहारात काय आहे हे आपण जाणून घेत नाही. त्या दृष्टीनं फळांचा आपल्या आहारात आपण उपयोग करून घेत नाही. फळाकडे आहाराच्या दृष्टीने पाहायची दृष्टी जर ठेवली तर आपले आरोग्य निश्चितच सुधारेल यात शंका नाही.

फळातील या घटकामुळे A fruit a day keeps doctor away अशी म्हण रूढ आहे. पण रोज एक फळ खायचं सामान्य माणसाला परवडण्यासारखे नाही. प्रत्येक फळाचा विवक्षित असा एक हंगाम असतो की, त्यावेळी फळ बाजारात इतक्या मुबलक प्रमाणात येतात की, त्यामुळे त्याचे भाव आपोआप खाली येतात व ती नाशवंत असल्याने येईल त्या भावात ती विकावी लागतात. सामान्य मनुष्य बहुधा अशावेळीच ती फळं विकत घेऊन आपली हौस फेडून घेतो. एरवी हा हंगाम सोडला तर ह्यास ते फळ विकत घेणं परवडत नसते. याचे उदाहरण लिंबाचे देता येईल. ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये लिंबू फार स्वस्त असतात, त्यावेळी सामान्य माणूस ते घेऊ शकतो. पण उन्हाळयात मात्र जरूरी व इच्छा असूनही तो त्याकडे पाहणेही टाळतो. सामान्य माणसाला जर या फळांच्या गुणधर्माचा वर्षभर उपयोग करायचा असेल, इच्छा व जरूर पडेल तेव्हा त्याचा आस्वाद घ्यायचा असेल तर त्यावर एक अतिशय सोपा व सहजशक्य असा उपाय आहे व तो म्हणजे त्या फळांचे टिकाऊ पदार्थ तयार करून ठेवणे व त्या पदार्थांचा वापर वर्षभर करणे. या पदार्थांच्या द्वारे त्या फळामध्ये असलेल्या गुणधर्माचा शरीरास फायदा होईल व त्या फळाची चव हवी तेव्हा घेता येईल. फळे स्वस्त असतानाच हे पदार्थ करायचे असल्याने हे पदार्थही कमी किमतीत तयार होऊ शकतात. याशिवाय या पद्धतीचा एक आणखी फायदा आहे. ताजे फळ कापले म्हणजे लगेच संपवावे लागते. पण फळापासून केलेले सरबत किंवा जॅमसारखे पदार्थ बरेच दिवस वापरता येतात.

फळांपासून निरनिराळे पदार्थ तयार करून ठेवायची प्रवृत्ती यामुळे वाढायला हवी. अशी प्रवृत्ती जर प्रत्येक गृहिणीच्या मनात उत्पन्न झाली तर वर सांगितलेले फायदे तर होतीलच, पण आपल्या देशाचाही एक फायदा होईल; व तो म्हणजे फळभाज्यांचा नाश होतो तो थांबेल. फळे व भाज्या ही देशाची एक नैसर्गिक संपत्तीच आहे. आपल्या भारतात

होतात, वाहतुकीत व साठवणीत जवळजवळ ३० टक्के फळ-भाज्या वाया जातात असे आढळून आले आहे. म्हणून फळ-भाज्या संरक्षित करून ठेवण्यामुळे हा नाश काही प्रमाणात कमी होईल. पण ही प्रवृत्ती वाढण्यासाठी फळे व भाज्या संरक्षित करून ठेवण्याचे ज्ञान आवश्यक आहे. अशा प्रकारचे शिक्षण देणाऱ्या संस्था भारतात बऱ्याच आहेत. पण त्या गृहिणींना फारशा उपयोगी नाहीत. म्हणून या ज्ञानाचा गृहिणींना जास्तीत जास्त फायदा मिळावा या उद्देशानं भारत सरकारने 'कम्युनिटी कॅनिंग अँड प्रिझर्व्हेशन सेंटर' नावाचे सेवाकेंद्र कृषिविभागातर्फे चालविण्याचे ठरविले. प्रथम अशी केंद्रे फक्त मुंबई, दिल्ली, मद्रास व कलकत्ता या चार मोठ्या शहरात स्थापन झाली. त्यास गृहिणींनी फारच चांगला प्रतिसाद दिला व अल्पावधीतच ती केंद्रे फार लोकप्रिय झाली. इतर शहरांतही अशी केंद्रे स्थापन करावी अशी मागणी झाली व त्याप्रमाणे भारत सरकारने या केंद्रांचे जाळे वाढविले. आज भारतात अशी ३२ केंद्रे निरनिराळ्या शहरात कार्यान्वित झालेली आहेत. या केंद्रामध्ये दोन आठवडे मुदतीचे प्रशिक्षण-वर्ग चालविले जातात व ते मुख्यत: गृहिणींसाठी असतात. त्यात फळे व भाज्यांचे निरनिराळे टिकाऊ पदार्थ घरच्या घरी कसे करता येतील या दृष्टीने हे प्रशिक्षणवर्ग आयोजित केले जातात. प्रशिक्षण घेतल्यानंतर थोडीशी अत्यावश्यक सामुग्री घेऊन पदार्थ घरच्या घरी तयार करता येतात.

या केंद्राची दुसरी सेवा म्हणजे फळभाज्यांचे टिकाऊ पदार्थ करण्यासाठी जी निरनिराळी सामुग्री लागते, जी रसायनं लागतात ती प्रत्येकास घेणं हेसुद्धा एखादेवेळी परवडत नसल्याने गृहिणींच्या सोयीसाठी सामुग्री, रंग, इसेन्स व रसायनं सरकारने केंद्रात ठेवली आहेत. आपणास एखादा पदार्थ करायचा असेल तर त्यासाठी फळे, साखर इ. सामुग्री योग्य प्रमाणात आणून आपण या केंद्रात येऊन ते पदार्थ करू शकता. त्यासाठी केंद्राधिकाऱ्यांशी संपर्क साधून आधी वेळ ठरवून घ्यावी लागते. नंतर त्या ठरलेल्या वेळी जाऊन गृहिणी या केंद्रातील निरनिराळ्या यंत्रांचा उपयोग करू शकतात. रंग इसेन्स, टिकाऊ रसायन केंद्रातून दिले जाते, गॅस, भांडी वगैरेही केंद्रातूनच मिळतात. यासाठी १ किलो पदार्थास ५० पैसे असा चार्ज घेतला जातो. यामागची खरी कल्पना अशी आहे की, एका इमारतीतील किंवा महिला मंडळातील किंवा ओळखीच्या अशा ८-१० गृहिणींनी मिळून पदार्थ तयार करावे. जास्त प्रमाणावर फळे घेतल्याने स्वस्तही मिळतात. हातयंत्राऐवजी विजेच्या यंत्राचा वापर करता येतो. त्यामुळे श्रमही वाचतात व तुलनेनं तयार पदार्थही जास्त होतो. समाजातील निरनिराळ्या व्यक्तींनी एकत्र येऊन 'एकमेका साह्य करून' 'जीवन सुसह्य' करावे, हा खरा कम्युनिटी कॅनिंग सेंटरचा अर्थ आहे.

बाजारात असे फळांचे पदार्थ बरेच मिळतात. साधारणत ७५ टक्के लोकांची अशी समजूत असते की हे पदार्थ आपल्यासाठी नाहीत. कारण ते फार महाग असतात. लिंबाच्या सरबताची बाटली ९ ते १० रुपयास मिळते. पण या केंद्रात जर हे सरबत केले; तर ते स्वस्त पडते. ५० लिंबापासून साधारणपणे ४ बाटल्या सरबत होतात. त्यासाठी ५० लिंबांची किंमत रु. ३-००, साखर १॥। किलो–रु. ७-०० व केंद्राचा चार्ज ४ किलो सरबतासाठी रु. २–म्हणजे एकंदर रु. १२-७० खर्च आला. म्हणजे एक बाटली ३ रु. २० पैसे किंमतीत पडते. एका सरबताच्या बाटलीपासून २० ग्लासेस् पिण्यायोग्य सरबत तयार होते, म्हणजे एक ग्लास १६ पैशाला पडला. एवढ्या अल्पशा किंमतीत पडणारे पेय स्वस्त नाही असे कोण म्हणेल ?



कॅनिंग सेंटरमध्ये सरबत तयार होत आहे.

या केंद्रात निरनिराळ्या फळांपासून सरबते, जॅम, रस, जेली, मार्मलेड, टोमॅटोचा सॉस, मुरब्बे, चटण्या, लोणची वगैरे पदार्थ तयार करण्याच्या सोयी आहेत. सरबतासाठी लिंबू, संत्री, मोसंबी, अननस, आंबा या फळांचा मुख्यत: उपयोग होतो. जॅम, आंबा, पपई, अननस, सफरचंद, रास्बेरी, गुजबेरी वगैरे फळांचा करतात. पेरू, कवठ, सफरचंद, फणस या फळांची जेली छान होते. लोणची आंबा, लिंबू, मिरची, फ्लॉवर, कोबी, बीन्स, कारली, वांगी यापासून करतात.

याशिवाय फळे-भाज्या हवाबंद डब्यांत टिकवून ठेवण्याची सोयही येथे आहे. त्यासाठी लागणारे विशिष्ट प्रकारचे डबे केंद्रात उपलब्ध केले जातात. फळे-भाज्या हवाबंद डब्यात भरून ठेवल्याने फळांचा हंगाम नसतानाही त्याचा आस्वाद घेणे शक्य झालं आहे. फळांचा हंगाम नसताना त्याची चव घेण्यात वेगळीच मजा येते. आंब्याचा रस हवाबंद करून ठेवला की पाहिजे तेव्हा आपल्या सेवेस आंबा तयार ! आणि सोयीस्कर किती ! त्यासाठी बाजारात जायला नको, भाव बघायला नको व अवास्तव किंमतही मोजायला नको. नुसता डबा उघडला की मुलं खुष !

फळे व भाज्या वाळवून ठेवण्याची सोय सुद्धा येथे उपलब्ध आहे. त्यासाठी लागणारे यंत्र ' डिहाइड्रेटर ' या केंद्रात आहे. साधारणत: द्राक्षे, अंजीर, गाजर, कोबी, फ्लॉवर, बीटस, वाटाणा, कांदा, बटाटा असे पदार्थ यंत्राने वाळवून ठेवता येतात. आपल्या आहाराच्या दृष्टीने आपणास या यंत्राचा फार चांगला उपयोग करून घेता येईल. पालेभाज्या आपणाकडे हंगामात खूप मिळतात. त्यात जीवनसत्त्व व खनिज पदार्थ भरपूर असतात. पालक, मेथी, करडई, कारली, कोथिंबीर, हिरव्या मिरच्या वगैरे जर गृहिणींनी हंगामात वाळवून ठेवल्या तर वर्षभरात केव्हाही उपयोग करता येईल. मात्र या यंत्राचा उपयोग करण्यासाठी पूर्ण यंत्र मालाने भरावे लागते. त्यासाठी एकावेळी साधारणत: २० ते २४ किलो तयार माल आणावा लागतो.

आपल्याकडे आंबा, संत्री, लिंबू, अननस वगैरे फळांप्रमाणेच आणखीही बरीच फळे येतात. पण त्यांपैकी काही फळे दुर्लक्षित अशी आहेत. वास्तविक त्या फळांमधे जीवनसत्त्वे इतर फळांच्या तुलनेनं खूपच जास्त प्रमाणात असतात. पण तरीही आपण त्यांचा विशेषसा उपयोग करून घेत नाही. कवठ, आवळे, फणस, कोकम, फाल्सा, चिंच वगैरे फळांचा यात निर्देश करता येईल. आवळ्यामध्ये जीवनसत्त्व ' क ' चे भांडारच आहे. त्यात २०० ते ६०० मि. ग्रॅम/१०० ग्रॅम इतके ' क ' जीवनसत्त्व असते. याचा आणखी एक विशेष म्हणजे यातील जीवनसत्त्वाचा नाश होत नाही. याशिवाय जीवनसत्त्व ' अ ', कॅल्शियम, फॉस्फरस, लोह वगैरे खनिज पदार्थांचे प्रमाणही या दुर्लक्षित फळांमध्ये जास्त प्रमाणात आहे. फळांचे टिकाऊ पदार्थ तयार करण्याचे ज्ञान आत्मसात केल्यावर त्याच तत्त्वाप्रमाणे याही फळांचा आपणास उपयोग करून घेता येईल.

पुणे येथे हे कम्युनिटी कॅनिंग सेंटर १९६९ साली सुरू झाले या केंद्राने येथपर्यंत केलेल्या सेवेची कल्पना खालील माहितीवरून येईल.

| वर्ष | केंद्रास भेट देणाऱ्यांची संख्या | तयार केलेले पदार्थ (किलो) | प्रशिक्षण वर्ग | शिक्षण घेतलेल्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १९६९ (ऑक्टो. पासून) | ३९६ | १०५१·७५ | ४ | ११२ |
| १९७० | १९७९ | ८८०८·६६ | १२ | ३४७ |
| १९७१ | १८९६ | १०९६१·६५ | १० | २७५ |
| १९७२ | १७८२ | ९०३७·२५ | १३ | २१७ |
| १९७३ | ११७३ | ११०४२·९५ | १३ | २२९ |

जसजसे गृहिणींना या विषयीचे महत्त्व पटेल तसतसे ह्या केंद्राची सेवा घेण्याचे प्रमाण वाढत जाईल. पुण्यात हे केंद्र कॅन्टोन्मेंट मार्केटजवळ १९७४, गफारबेग स्ट्रीट येथे आहे. बऱ्याच गृहिणींनी असे केंद्र मध्यवर्ती ठिकाणी असावे अशी इच्छा प्रदर्शित केली आहे. याठिकाणी मला पुण्यातील जनतेला एक विनंती करावीशी वाटते की, या केंद्राचे महत्त्व ओळखून या केंद्रास सुयोग्य अशी जागा मिळवून देण्यास आपण हातभार लावावा. पुण्यात जागेची टंचाई असल्यानेच आम्हास हे केंद्र पाहिजे त्या ठिकाणी नेता येत नाही. पण मला आशा वाटते की, सरकारने अंगीकारलेल्या या समाजसेवेसाठी कुणीतरी या केंद्रास जागा देऊन मदत करील. पुण्यात जर या केंद्रासाठी योग्य अशी जागा मिळाली तर आम्हीही जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे आपली सेवा करू शकू व कृषिमंत्रालयाच्या ' कम्युनिटी कॅनिंग सेंटर ' सारख्या इतरही ज्या योजना आहेत, त्याही पुण्यात आणू शकू.

## केवळ महिलांसाठी

गृहोपयोगी अर्थशास्त्र हे सदर आपल्याकरता आहे. (अर्थात इतरांनी वाचण्यास हरकत नाही.) ह्या सदराची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने आपले लेख व सूचना पाठवाव्या. स्वयंपाकघर व घरखर्च ह्यात तुम्ही केलेल्या काटकसरी व त्यासंबंधीचे अनुभव जरूर लिहा. अशा उत्कृष्ट लेखास प्रसिद्धी देऊ.

## BORA AND COMPANY

PHARMACEUTICAL DISTRIBUTORS

712, SHUKRAWAR PETH, POONA 410 002

PHONES

24796 • 22536

## BORA TRANSPORT CO.

FLEET OWNERS & TRANSPORT CONTRACTORS

"PREMA CHAMBERS"

156, GANESH, PETH, POONA 410 002

PHONE : 24686

# INDUSTRIAL X-CHANGE

DEALERS FOR

HINDUSTAN PETROLEUM CORPORATION LTD.

•

All Kinds of Lubricants & Industrial Oils

**AUTO X-CHANGE**

AUTO SPARES DEALERS

1023/24 A, SHUKRAWAR PETH, BHUSHAN BHAVAN

TILAK ROAD, POONA 410 002

PHNOE : 42705

# SHA KESHARIMAL DEVICHAND

INDUSTRIAL NONFERROUS METAL SUPPLIERS

PHONE : 27010


•

**HIRA METAL CORPORATION**

METAL MERCHANTS & COMMISSION AGENTS

PHONE : 27010 • 26037

307 RAVIWAR PETH, POONA 410 002



चित्रपट
क्रीडा
मनोरंजन

# पाच - तीन - दोन

राजस परचुरे

## पाच चुटकुले

### १. आधुनिक चार्वाक

'अरे यार, जरा पन्नास रुपये उसने देता येतील का—प्लीज !'

'नाही रे बुवा, मी पण फार कडकीत आहे. चाळीस रुपये दिले तर चालतील ?'

'ठीक आहे—नेव्हर माइंड ! मग देऊन टाक चाळीस रुपये आत्ता. बाकीचे दहा रुपये 'तुझेकडून येणे' म्हणून माझ्या हिशोबी लिहून ठेवतो. ते मात्र मागायला लावू नकोस हं !'

### २. वायदे बाजार

पपांचे मित्र पोंक्षेकाका एकदा कोकणातून आमच्याकडे आले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ते फक्त दोन दिवसांच्या कामाकरता आले होते पण चांगले पंधरा दिवस झाले तरी त्यांचा मुक्काम हलेना. ह्या गोष्टीचा निषेध घरात आईच्या चेहेऱ्यावर काकांना दिसल्यानंतर त्यांना असे वाटले की, आपण काही तरी केलं पाहिजे की जेणेकरून आम्ही मंडळी खुश होऊ. म्हणून सर्वांना ऐकू जाईल अशा आवाजात ते म्हणाले, 'चल, राजू, आज मंडईतून झकास भाजी आणू.' त्यांचा हा विचार बदलेल ह्या भीतीने, मीही झट्कन तयार झालो. वाटेत एक, बाग पाहताच काका म्हणाले, 'राजू, मंडईतून जाऊन शिळी, पाणी मारलेली भाजी घेण्यापेक्षा आपण ह्या बागेतील ताजी घेऊ. ताज्या भाजीला काय मस्त चव असते. खरं म्हणजे तुम्हा शहरी लोकांना पैसा कसा खर्च करायचा ह्याचं डोकंच नाही.' एवढं म्हणत काका चक्क मळ्यात घुसले आणि मांडवावरच्या काकड्या न्याहाळून पाहू लागले. तेवढ्यात माळी आला, त्यापुढे झालेला माळ्याचा व काकांचा संवाद मनोरंजक आहे.

पोंक्षेकाका—(एका फार मोठ्या काकडीकडे बोट दाखवून) ह्या काकडीचे काय घेणार रे.'

'१ रुपया ४० पैसे घेईन मास्तर. खरं पाहिलं तर मला इकायची परमिशण नाही—पर जाऊ द्या, तुमचा बी मान राखला पाह्यजं,

काका—(मध्यम आकाराच्या काकडीकडे बोट दाखवून) बरं रे—पण मग—ही केवढ्याला देणार ?

माळी—(जरा घुश्शात) हिला ऐंशी पैसे घेईन, कमी नाही, हां.

काका—अरे दहा पैशात मिळेल, अशी नाही का तुझ्याकडे एखादी काकडी ?

माळी—(अगदी वैतागून आणि फक्त बोटभर लांब असलेल्या काकडीकडे बोट दाखवून) पाह्यजे आसलं तर ही घ्या न् फुटा !

काका—ह्यात्तिच्या ! हे घे माझे दहा पैसे—हिच्यावर मी खूण करून ठेवतो. मात्र दहा दिवसांनी येईन आणि मग घेऊन जाईन. मधात मात्र बदल करायचा नाही हं—वायदा म्हणजे वायदा !

काका चक्क अजून दहा दिवस राहणार ह्या विचारानेच मी मात्र मळ्यात पडलेला एक कांदा हुंगायला घेतला.

### ३. समाजशास्त्राची नोंद

स्कॉटलंडमध्ये ज्यू कधीच राहिले नाहीत. स्कॉटलंडमध्ये येऊन धंदा करण्याचे धाडस त्यांच्याकडून होणे कठीण.

### ४. संपत्तीचे प्रदर्शन की संरक्षण ?

फॅशनेबल मुलींचे कपडे एखाद्या तारेच्या कुंपणासारखे असतात. त्यांच्यामुळे मालमत्तेचे संरक्षण होते, पण त्याचबरोबर हवे तितके प्रदर्शनही साध्य होते.

### ५. कडक स्कॉच जोक

तीन स्कॉच एकदा रविवारी चर्चमध्ये प्रार्थनेसाठी गेले. प्रार्थना झाल्यावर धर्मगुरूने एका चांगल्या कार्याकरता देणगी द्यावी असे आवाहन केले. 'प्रत्येकाने निदान एक डॉलर तरी

ह्या कार्याकरता द्यावा ' असे ते म्हणाले व वर्गणीकरता थाळी फिरू लागली. थाळी जशी जवळ आली तसे तिघेही चांगलेच नर्व्हस झाले. शेवटी त्यातल्या एकाला घेरी आलीआणि उरलेल्या दोघांनी त्याला उचलून बाहेर नेले !

☘

## तीन कोडी

१. दोन अरब प्रवासी ओॲसिसला येऊन पोहोचतात. तेथून दोन वाटा फुटतात. त्या ठिकाणी त्यांना त्यांच्याबरोबर आणलेले तेल वाटून घ्यायचे असते. त्यांच्याकडे एकच बुधला आहे त्यात १० लिटर तेल आहे. त्यांच्याकडे कोणतेही वजन अथवा मापाचे भांडे नाही, मात्र दोन रिकामी भांडी आहेत. की ज्याच्यात अनुक्रमे सात व तीन लिटर तेल राहू शकते. त्यांना सारखी वाटणी करायची आहे. आपल्याजवळ असलेल्या दोन भांड्यांच्या साधनाने ५–५ लिटर तेल त्यांनी कसे वाटून घ्यावे ?

२. एक सात माणसांचा क्लब आहे. ते ठरवतात आपण रोज एकत्र जेवायचं पण दररोज टेबलावर वेगळ्या रचनेत बसायचं. अशा एकूण विविध तऱ्हेच्या किती रचना त्या सातात होऊ शकतील ?

३. एक श्रीमंत मनुष्य मृत्युशय्येवर असता आपले मृत्युपत्र करतो. त्यात तो असे लिहितो की त्याच्या गरोदर पत्नीला त्याच्या मृत्यूनंतर मुलगा झाल्यास २/३ प्रॉपर्टी मुलाला मिळावी आणि १/३ पत्नीला. ह्याऐवजी तिला मुलगी झाल्यास पत्नीला २/३ आणि मुलीला १/३ असे भाग मिळावे. पण त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या पत्नीला जुळे झाले त्यात एक मुलगा व मुलगी होते. श्रीमंत माणसाच्या ३०००० डॉलर्सची वाटणी विलपत्राप्रमाणे त्याची पत्नी, मुलगा व मुलगी ह्यात कशी करावी ?

☘

## दोन विचार

१. गद्धेपंचविशीत घोडचुका होतात. मध्यमवयात त्या निस्तरण्याकरिता झगडावे लागते. आणि म्हातारपणी केवळ पश्चात्ताप करण्याखेरीज गत्यंतर नसते.

२. जिथे बढाई संपते तिथे खरा सन्मान सुरू होतो. ● ●

---

### ग्रंथपालांकरिता

सोप्या भाषेत अर्थशास्त्रावर माहिती देणारे आमच्या माहितीप्रमाणे मराठी भाषेत दुसरे कोणतेही मासिक नाही. आपल्या ग्रंथालयात येणाऱ्या विद्यार्थी, प्राध्यापक व सर्व-सामान्य वाचक ह्यांच्या निदर्शनास अर्थ मासिक कृपया आणून द्यावे. तसेच त्यात अशा प्रकारचा मजकूर असावा ह्या संबंधीच्या त्यांच्या सूचना लक्षात घेऊन त्यांच्यावतीने आम्हाला कळविण्याचे ग्रंथपालाचे कर्तव्य पार पाडताना आपल्याला आनंद होईलच व आम्हालाही आपला जवळून परिचय होण्याची संधी मिळेल अशी आशा वाटते.

अर्थ हे संदर्भास उपयुक्त साहित्य आहे—लोकनेते, प्रशासक, समाजधुरीण, प्राध्यापक व अर्थशास्त्राचे विद्यार्थी ह्यांना त्यांचे अभ्यास अद्ययावत ठेवण्यासाठी त्याची गरज भासेल. अर्थच्या १२ महिन्यांचे अंक, तसेच विशेष पुरवण्या आपण बांधणी करून घेऊन ग्रंथालयात सुसज्ज ठेवल्यास बरे होईल. अंकाच्या प्रारूपासंबंधी ग्रंथपालनशास्त्राप्रमाणे आवश्यक त्या उपयुक्त सूचना कराल अशी आशा आहे.

आपल्या ज्या मित्रांना 'अर्थ' आवडेल असे आपणास वाटते त्यांचे संपूर्ण पत्ते कळवावे म्हणजे अर्थचे नमुना अंक त्यांच्याकडे पाठवू. जून १९७५ पूर्वी लिहा. ☘

### नवीन यंत्रे, प्रकल्प व प्रक्रियांच्या संशोधकांसाठी

आपल्या शोधाची व त्यामुळे होणाऱ्या खर्चातील बचती संबंधीची व आर्थिक लाभाची माहिती पाठवा. आम्ही ती आनंदाने छापू; नव्या संशोधक व कारखानदारांना ती प्रेरक व उपयुक्त होईल; तसेच आपल्या शोधाला प्रसिद्धी मिळून बाजारपेठही प्राप्त होईल.

☘

### शेती–सहकार–ग्रामीण लघुउद्योग व्यावसायिकांसाठी

आपल्याला आपल्या व्यवसायात काही अडचणी व तज्ज्ञांचे मार्गदर्शन हवे असल्यास, तसेच जोडधंदे सुरू करावयाचे असल्यास त्यासंबंधी माहिती घेण्याकरता अर्थशी संपर्क साधा.

☘

### तरुणांसाठी–

आपण कोणते कोर्सेस घ्यावे, तसेच कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या उपलब्ध आहेत, ह्यासंबंधी आम्ही साहित्य देणार आहोत. तसेच नवीन धंदा, व्यवसाय सुरू करण्याबाबतचे प्राथमिक स्वरूपाचे मार्गदर्शनही करू.

☘

# धनाढ्य ओनॅसिसला 'अंतकाळीचे नाही कोणी"

अतिरिक्त महत्त्वाकांक्षी धनिकांच्या शब्दकोशात 'पुरे' हा शब्द नसतोच मुळी. काही ठराविक संपत्ती मिळविल्यावर अधिक संपत्तीला फारसे महत्त्व उरत नाही. पण त्या जादा संपत्तीचा मनःपूत वापर करून इतरांना हेवा वाटेल असे आपण काय पैदा करू शकतो, इकडे त्यांचे लक्ष लागते. त्यासाठी अचाट साहसे करण्यासही ते प्रवृत्त होतात. संपत्तीने साध्य करता येण्याजोग्या दुर्मिळ चिजा संपादन करण्यासाठी अशा धनिकांची एकमेकात स्पर्धा सुरू होते. त्यात पुरातन मूर्ती, चित्रे, ग्रंथ, आर्ट गॅलऱ्या, तसेच मोठमोठे बंगले, विलास-नौका, चैनीची नवी नवी साधने, थाटाच्या मेजवान्या, ह्यांचा समावेश होतो. त्याबरोबरच श्रीमंत, सुंदर, कलावंत स्त्रियांच्या सलगीसाठी प्रयत्न चालतो. त्याची आणखी पुढची पायरी म्हणजे जगाला वेड लावणाऱ्या लावण्यवती स्त्रियांना इतरांकडून मिळणे कठीण असे काहीतरी देत राहून, त्यांना त्यांचे व्यसन लावून स्वतःच्या अंकित करणे, ही होय.


अमेरिकेचे एक भूतपूर्व अध्यक्ष केनेडी ह्यांच्या खुनानंतर विधवा झालेल्या, गुलजार जॅकीशी विवाह करून, सर्वांच्या कौतुकाचा विषय बनलेल्या स्वतःचा दिमाख जगात दाखविणारा ग्रीक धनिक ओनॅसिस, हा अशा श्रीमंतांचे एक उद्‌बोधक उदाहरण आहे. ॲरिस्टॉल सॉक्रेटिस ओनॅसिसने व्यावहारिक जीवनाला प्रारंभ ग्रीसमधून अर्जेंटिनामध्ये जाऊन केला, तेव्हा तो फक्त १७ वर्षांचा होता. टेलिफोन ऑपरेटरचे काम त्याने पत्करले आणि जोडधंदा म्हणून तो बाल्कन तंबाखू विकू लागला. वयाच्या चोविसाव्या वर्षी त्याने सहा मालवाहू आगबोटी खरीदल्या आणि लवकरच त्याची वार्षिक प्राप्ती एक कोटी रुपयांच्या घरात गेली. वयाच्या ६९ व्या वर्षी तो ब्रॉंको-न्युमोनियाच्या विकाराने नुकताच मरण पावला, तेव्हा तो जगातील एक अग्रेसर धनाढ्य म्हणून प्रसिद्ध होता; किमान तीन ते चार अब्ज रुपये किमतीच्या मालमत्तेचा तो धनी होता.

संपत्ती कमविण्यात ओनॅसिस जसा तरबेज होता, तसाच तो चैनीसाठी निर्लज्जपणे संपत्ती खर्चण्यातही निष्णात होता. नव्या नव्या चैनी तो शोधून काढीत असे. बकरीच्या गर्भात वाढणाऱ्या पिलाचे मांस त्याला आवडे. त्यासाठी एका किलोला हजार-बाराशे रुपये पडत असत! त्याच्या काळातील रथी-महारथींना हवीशी वाटणारी पण मिळू न शकणारी ऑपेरा सिंगर मारिया कॅलस हिला तो स्वतःच्या नादी लावू शकला; पुढे जॅकी केनेडीलाही त्याने आपल्या जाळ्यात ओढले. तो स्वतः खुजा, काळाबेंद्रा, रानवट होता तरी! धनिकांतील चढाओढीची ही हकीकत उद्‌बोधक आहे. १९४६ मध्ये त्याने एका गर्भश्रीमंत तरुणीशी विवाह केला. तेव्हा त्यांच्यावर कुरघोडी करण्यासाठी त्याच्या मेव्हण्याने त्या तरुणीच्या बहिणीला मोठ्या हिरीरीने पटकाविले. प्रतिस्पर्ध्याने १९६५ साली अमेरिकन श्रीमंतीण शार्लोटी फोर्ड हिच्याशी विवाह केला, तेव्हा त्याचे नाक कापण्यासाठी ओनॅसिसने जॅकी केनेडीला स्वतःची पत्नी बनविले, असे निरीक्षक सांगतात. धनाढ्य लोकांच्या विवाहात प्रेमाचा भाग किती कमी असू शकतो; दुर्दम्य महत्त्वाकांक्षेचा भाग किती मोठा असू शकतो, ह्याचे हे उदाहरण आहे.

अशा वृत्तीच्या लोकांना जीवनात चटकेही सहन करावे लागणे अपरिहार्य असते. काही बेकायदा व्यवहाराबद्दल ओनॅसिसला १९५४ मध्ये ७ कोटी रु. दंड झाला होता. त्याचे खासगी जीवन दुर्दैवीच होते. ऑपेरासिंगर मारिया कॅलस ह्या प्रेमपात्रामुळे त्याच्या पहिल्या पत्नीने १९६० साली घटस्फोट घेतला. त्याच्या तीव्र विरोधाला न जुमानता त्याच्या मुलीने १९७१ साली २० व्या वर्षी ४७ वर्षांच्या एका कोट्याधीशाशी विवाह केला आणि लवकरच घटस्फोट घेतला. त्याचा एकुलता एक मुलगा विमान अपघातात मरण पावला. जॅकीशी ओनॅसिसचा झालेला विवाह मोडला नव्हता, म्हणूनच केवळ तो टिकून होता. ओनॅसिस पॅरिसमधील इस्पितळात मृत्युशय्येवर असताना त्याला सोडून न्यूयॉर्कला जाणे जॅकीला महत्त्वाचे वाटले—तिची मुलगी कॅरोलिन केनेडी हिचे काम असलेल्या एक टी. व्ही. चा कार्यक्रम पाहण्यासाठी! त्याच्या मृत्यूच्या वेळी त्याच्यापासून हजारो मैल ती दूर होती. त्याच्या दफनाच्या वेळी ती तातडीने आली आणि घाईने निघून गेली.


जगातील दोन महासमर्थ पुरुषांना—प्रेसिडेंट केनेडी आणि अब्जाधीश ओनॅसिस ह्यांना—अक्षरशः पुरून उरणारी जॅकी आजही वयाच्या ४५ व्या वर्षी, तरुण आणि आकर्षक आहे. तिचा हात धरून जाण्यासाठी अद्यापही ओढाताण होण्याची शक्यता आहे. प्रेसिडेंट केनेडीची ही श्रीमंत विधवा ओनॅसिसशी पुनर्विवाह झाल्यानंतर अधिकच श्रीमंत झाली आणि दुसऱ्यांदा वैधव्य आल्यामुळे तिच्या संपत्तीत आणखी प्रचंड भर पडली आहे.

भौतिक सुखांच्या अतिरेकी नादात मानसिक स्वास्थ्य लाभत नाही, ही गोष्ट 'हरेकृष्ण, हरेराम'च्या गजराने जाहीर झाली आहे. मनःशांतीच्या अतिरेकी भुलवणीने आपण नाही का आर्थिक अस्वास्थ्य कवटाळीत? भुकेकंगाल बनत?



सत्यशिवसुंदर प्रकाशनाच्या मालकीचे हे मासिक संपादक प्रा. कमलाकर परचुरे ह्यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव, पुणे ३०. येथे छापून ९०६ शिवाजीनगर, पुणे ४. येथे प्रसिद्ध केले.


Swastik
SERVES HOME & INDUSTRY
Through a wide and varied range of rubber and P.V.C. products—for domestic and industrial use.
Footwear and hoses, gloves, moulded products and oil seals, foam rubber... mattresses, pillows and cushions, erasers and G.R.P. helmets.
Over 4000 products in all—each one built as only Swastik can, highly dependable and full of utility.
SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.,
Pune -411 003.
Datteram-SRP-29A


लहानशा जलाशयात,
आकाशाचे प्रतिबिंब !
छोट्या गोष्टीतही कितीतरी मोठी शक्ति दडलेली असते. रोज फक्त वीस पैशांची बचत करा पाच वर्षांनी ४२५ रुपये परत घ्या.
बँक ऑफ महाराष्ट्रची
लोकमंगल
दैनिक ठेव योजना
● २० पैशांची छोटी बचत बँकेचा अधिकृत प्रतिनिधी रोज तुमच्या घरी येऊन घेऊन जाईल.
● चार वर्षांनी ६ टक्के व्याजासह तुमची रक्कम परत केली जाईल
तुमच्या व्यक्तिगत गरजा भागविण्यासाठी तयार केलेल्या वरीलप्रमाणेच आणखी अनेक योजना आमच्या जवळ उपलब्ध आहेत. सविस्तर माहितीसाठी आमच्या नजिकच्या शाखेस भेट द्या. तुमच्या संकटकाळात उपयोगी पडणारा एकमात्र जिवलग मित्र.
बँक ऑफ महाराष्ट्र
११७७, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.
PRATIBHA 7414